IRBK-0100277

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र २७७

IRBK-0100277

दा. क्र. २७५

संगीत

# हाच परिणाम !

हें नाटक,

संगीत 'अघोरतृष्णा,' संगीत 'भक्तिप्रभाव,' संगीत 'नवजीवन,'
संगीत 'अलौकिक दिव्य,' संगीत 'वंदे मातरम्,' इत्यादि
नाटकांचा कर्ता,

रा० रा० कृष्णराव नानाजी अस्नोडकर,
यांनीं लिहिलें.

प्रकाशक,
रा० रा० हरि भास्कर आपटे,
आनंदविलास संगीत नाटक मंडळी.

( या नाटकाच्या प्रयोगाचे हक्क फक्त आनंदविलास संगीत नाटक मंडळीकडेच आहेत )

सन १९२१.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें
नौपाडा शाखा. २७५
अ. क्र.
विभाग
क्रमांक,
IRBK-0100277

किंमत एक रुपाया.

मुद्रक,
**चिंतामण सखाराम देवळे**, मुंबई वैभव प्रेस, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीज् बिल्डिंग, सँढर्स्ट रोड, गिरगांव–मुंबई.

प्रकाशक,
रा. रा. **हरि भास्कर आपटे**, नासिक, आनंदविलास संगीत नाटक मंडळी.

# दोन शब्द.

नाटक हें प्रेक्षकांच्या अंतःकरणावर एखाद्या वस्तुस्थितीचें खरेंखुरें चित्र उठविणारें सुलभांतलें सुलभ साधन आहे. आरसा दृष्टीपुढें धरला असतां जसें आपलें प्रतिबिंब आंत स्वच्छ दिसूं लागतें व चेहेऱ्यावर एखादा डाग दिसल्यास आपण तो पुसून काढतों, त्याचप्रमाणें नाटक पहात असतांना अंतःकरणाची चित्ररेखा दृष्टीसमोर उभी रहाते व अंतःकरणावर एखादा डाग जडलेला असल्यास तो पुसून काढण्याकडे मनाची प्रवृत्ति होते. सभ्यपणाच्या वस्त्राखालीं अधोगतीला नेणारे कैक गलिच्छ प्रकार नेणत्या व कोत्या बुद्धीच्या लोकांची दिशाभूल करित आहेत. त्यांचें करमणुकीच्या द्वारें परिणामकारक चित्र जर नाटकरूपानें समाजापुढें धरिलें तर हितकर होईल, अशी खात्री वाटल्यावरून **हाच परिणाम** नाटकाचा विषय मी माझ्या अल्प बुद्धिप्रमाणें समाजापुढें मांडला आहे, तो कितपत साधला आहे, हें पहाण्याचें काम मी रसिक व मर्मज्ञ प्रेक्षकांवरच टाकतों. माझी ही अल्पसेवा गौरवाला जरी नाहीं, तरी निदान आदराला पात्र झाली तरी मी कृतार्थ होईन.

या नाटकाची तालीम चालू असतां आपला अमोल्य वेळ खर्चून वेळोवेळीं सूचना दिल्याबद्दल माझे परम स्नेही सुप्रसिद्ध कादंबरीकार श्रीयुत **नाथ माधव** यांचा मी अत्यंत ऋणी आहे. या नाटकांतील पदांच्या सुरस चाली देऊन पदें नीट बसविल्याबद्दल आनंदविलास संगीत मंडळींतील प्रमुख नट रा. रा. **गंगाराम अप्पाजी डवरी** व रा. रा. **वामन वासुदेव गोवित्रीकर** यांचा मी आभारी आहे. तसेंच या नाटकांतील निरनिराळ्या प्रसंगाचे फोटो दिल्याबद्दल आनंदविलास संगीत नाटक मंडळींतील नटवर्गाचाहि तितकाच आभारी आहे. आनंदविलास संगीत नाटक मंडळीचे मालक रा. रा. **हरि भास्कर आपटे** व रा. रा. **गणेश विनायक वीरकर** या उभयतांनीं नाटक सुव्यवस्थितपणें रंगभूमीवर आणण्यास घेतलेल्या श्रमाबद्दल मी उभयतांचा अत्यंत आभारी आहे. ही माझी अल्पकृति रसिकांच्या आदराला पात्र होवो, अशी त्या **परमेश्वराजवळ** प्रार्थना करतों.

नाशिक,
ता. १ जुलै १९२१.

**कृ० ना० अस्नोडकर.**

K. V. Dalal
Bombay No. 2
22/2/1924

हरी भास्कर ....
....

# हाच परिणाम !

स्वस्तिक वाचनालय,
....पाडा - ठाणें
विभाग क्रमांक
.....२३ ....
अनुक्रमांक १९०

## अंक पहिला.

### प्रवेश पहिला.

स्थलः—दिवाणखाना.

( अमृतराव, मालती, मनोहर, रघुनाथ, मंगल वगैरे मंडळी जन्मोत्सवाप्रीत्यर्थ जमली आहेत असा देखावा. )

सर्व०—

१ पद ( कर सुखकर० ) चाल.

कर शुभकर संसार प्रभु हा जडभार । लाभो वर
संतत तव हाच साधार ॥ ध्रु० ॥ जार मार भयाकार
दुर्धर अरि झणिं निवार । राहो मति चंचल तव पायिं
अविकार ॥ १ ॥ वास ध्यास घडो खास सज्जन
सहवास आस । लागो जनकारणिं मति स्वार्थ परि-
हार ॥ २ ॥ सदुपकार सदभिमान वितरो जनिं गुण-
निधान । गाजो रव मंगल नरनारि अवतार ॥ ३ ॥

अमृत०—आज या भयंकर तापाच्या सांथींत आपणा सर्वांना सुखी ठेऊन, माझ्या मनोहराचा हा अकरावा जन्मोत्सव आनंदानें पार पाडला, हे त्या परमेश्वराचे केवढे थोर उपकार!—परमेश्वर माझ्या लाडक्याचा जन्मोत्सव प्रतिवर्षी असाच आनंदानें साजरा करो.

२ पद ( नाथ हा माझा. ) चाल.

**काल हा आला लोकीं भला उदयाला । देहीं त्याला भाग्यमाला, करिं मम लाभला ॥ धृ० ॥ कांता सुंदर गुणवति चतुरा, पुत्राहि तैसा रविसा झाला ॥ १ ॥**

( सर्वजण मनोहराला पुष्पहार घालतात व पानसुपारी घेऊन जातात. )

**अमृत०**—रघू, सुंदर गृहिणी, जिवाला जीव देणारा मित्र आणि सद्गुणी पुत्र यांची प्राप्ति पूर्वसुकृता वांचून होत नसते असं एक कवि म्हणतो. पण मलातर या तीन बहुमोल रत्नांचा लाभ होऊन विपुल संपत्तीहि मिळाली आहे, तेव्हां मी किती थोर भाग्याचा !

**रघु०**—प्रेमाचीं लांबलचक वर्णनं करणारे कवि म्हणजे 'वेडे पीर' अशीं विधानं टोकणारे अमृतराव ते आपणच का ? महाराज, अविवाहित रहाण्याचा आपला निग्रह, शिराळ शेटीच्या औट घटका राज्या इतकाच टिकणार, हें मी पूर्ण जाणून होतों. अमृतराव , अलोट संपत्ति, सदृढ प्रकृति आणि तारुण्याची स्फूर्ति अनुकूल असतां तरुणीच्या मोहाला वश न होणारा शुकमुनी पुराणांतच सांपडणार ?

**अमृत०**—जगाचा पूर्ण अनुभव घेतल्यावांचून लग्नाच्या भानगडींत पडूं नये अशी एकाकाळीं माझ्या मनाची वृत्ति होती खरी, पण मालती सारख्या चंद्रिकेचं दर्शन घडतांच माझ्या शुष्क हृदयांत प्रेम कमलिनी प्रफुल्लित झाली.

**रघु०**—म्हणूनच स्वतःचं अवसान न ओळखून उतावळेपणानें उडी मारणारा जगाच्या कुचेष्टेला कारण होत असतो !

**अमृत०**—पण आतां हा वादविवाद कशाला ? माझी निवड अस्थानीं झाली नाहीं, यांतच स्वतःला मी मोठा भाग्याचा समजतों. मालतीच्या प्रेमाची नुसती कल्पनाहि मला हर्षानं रोमांचित करते

३ पद ( होरि खेलत मुसे० ) चाल.

**मधुमोहन मधु प्रेमीं । सदा अभिरामी । विहरे विलसे रमणी मनोधामीं ॥ धृ० ॥ अनुरागि कमलिनी सदा फुलोनी, रमवी मना प्रेमी ॥ १ ॥**

**रघु०**—यक्षिणीच्या कांडीनं तुझ्या सारख्या काव्यहिनाला प्रेमी बनविल्यावर, कवीचं कोणतं काव्य आतां रसमय भासणार नाहीं ? पण त्या काव्याच्या पोटांत रसहानी करणारे किती बदसूर भरले आहेत, ते जाणून घेतलें आहेस ना ?

**अमृत०**—ज्यांत असले बदसूर निघतात तें मुळीं काव्यच नव्हे ! रघुनाथ, या स्वर्गीय काव्याचा माझ्या हृदयांत उदय होण्यापूर्वी तुझ्या एका मित्रप्रेमावांचून अन्य प्रेमाची कल्पनाहि नव्हती. तरुणीचं प्रेम, म्हणजे कवीच्या काल्पनिक भराऱ्या, या पलीकडे मी त्याला महत्व देत नव्हतों; पण सुदैवानं मालतीसारख्या प्रेममय अप्सरेची गांठ पडतांच प्रेमाचा मी दास बनलों व संसारी झालों.

**रघु०**—( स्वगत त्वेषानें ) पण तुझा संसार म्हणजे माझ्या हृदयाला अंगार !

**अमृत०**—रघुनाथ, लग्न होईपर्यंत मी अरसिक होतों खरा पण—

**रघु०**—पण काय, तुझ्या काव्यमय सृष्टीला एक तप पूर्ण झालं, तरी अज्ञन प्रेमाचीच चर्पटपंजरी आळवीत बसणार कीं काय ?

**अमृत०**—खरं आहे. सध्यां तुमचं आमचं प्रमाण व्यस्त असल्यामुळें प्रेमाचे मधुर आलाप तुला चर्पटपंजरी वाटावेत यांत कांहीं नवल नाहीं !

**रघु०**—( स्वगत ) द्वेषाच्या भरांत काय मी हें बोललों ! ( उघड ) अमृतराव, तुझ्या या प्रेममय संसाराकडे पाहून माझं हृदय कठोर होत नसून आनंदानें भरून येत आहे. गड्या, बाळपणींचा तुझा मी एक गरीब खेळगडी व तूं ऐश्वर्याच्या राशीवर लोळणारा ! पण परस्परांतील भेदाभेद विसरून मला आपल्या पाठीचा बंधू, जिवाचा सखा मानून व वेळोवेळीं सहाय्य करून समाजांत उभे रहाण्या इतकी स्थिति प्राप्त करून दिलीस, या तुझ्या उपकाराची फेड—

**अमृत०**—तुझं हें मित्रत्व असंच कायम ठेविलंस कीं, झाली म्हणून समज ! रघू, तूं माझे उपकार मानावेस किंवा तुला ऋण्याच्या ओझ्याखालीं अंकित ठेवावें या अधम इच्छेनें मी कोणतीहि गोष्ट हा वेळपर्यंत केली नाहीं. माझ्या मित्रधर्माला उचित तेंच करीत आलों आहे व पुढेंहि करीन अशी आशा आहे.

**रघु०**—याची मला खात्री आहे ( स्वगत ) भोळ्या सांबा, असाच शेवटपर्यंत भ्रमांत रहा !

**अमृत०**—रघुनाथ, या माझ्या सुखापेक्षां स्वर्गसुख अधिक असेल का ?

**रघु०**—छे, छे, मालती सारखी सुशील गृहिणी, मनोहरासारखा सुंदर पुत्र, कुबेरासारखी संपत्ति आणि समाजांत मानमरातब याहून स्वर्गसुख तें आणखी काय असणार ?

( मालती येते. )

**माल०**—पण त्या स्वर्गसुखाला मित्रप्रेमाची नको का जोड मिळायला ?

**अमृत०**—शाबास, आमच्या रघूनें बहिष्कार घातलेल्या मित्रप्रेमाच्या लहरी माझ्या मालतीनें एकरूप केल्या.

**रघु०**—एकरूप करणारी असली देवता प्रगट झाल्यावर कोणत्या लहरी एकरूप होणार नाहींत ? एकूण काव्यमाधुर्य मालतीच्याहि हृदयांत पूर्ण बिंबलेलें दिसतं.

**माल०**—का वरं ? काव्य माधुर्यावांचून जगांतलं कोणतं कार्य घडतं ?

४ पद ( मम आत्मा गमला. ) चाल.


**शशि येतां उदयाला । फुलविति खुलविति, सहज हसविति कविलीला हृदयाला ॥ धृ० ॥ कमलवंधनीं मधुकर मोहिला । काव्यसुधारस प्याला । जीवजिवा कळला । प्रेमं काव्यमया झाला सकल जगाला ॥ १ ॥**

रघुनाथराव, या काव्य माधुर्यामुळेंच चंद्राचा उदय होतांच पुष्पकलिका खुदकन हंसतात, जगाला हंसवितात व प्रेमी जीवाला एकजीव करतात! ( थट्टेनें )आपल्याला असेलच याचा अनुभव ? ( वक्रदृष्टीनें स्वगत ) भोळेच अगदीं !

**अमृत०**—( विनोदानें ) काय, समजला ना अरसिकराज ? हें काव्यमाधुर्य नसतं तर जगांतून सुखाचा मुळीं अस्तच झाला असता !

**रघु०**—( त्रासानें ) पण असल्या सुखदुःखाच्या अस्तावरोबर मला काय करायचं आहे ? चंद्रिकेच्या स्पर्शानें सरोवरांतील कमलिनी तुझ्यासारख्या रसिकाला कितीजरी हसवीत असल्या, तरी माझ्या शुष्क हृदयांत हास्यहि नाहीं व रसस्यहि नाहीं. ( स्वगत ) मात्र तुझ्या एका मत्सराग्नीचा वणवा भडकला आहे !

**माल०**—नाहीं वरं, रघुनाथराव, काव्यमाधुर्य जर आपल्या हृदयांत नसतं तर–



मालती:–आपल्याला असेलच याचा अनुभव! [ अं. १ पृ. ५

K. V. Datar

**रघु०**—तर काय, भूलोकींच्या एखाद्या देवयानीच्या शापाला बळी पडण्याची पाळी आली असती हेंच ना ? पण मालती, ही वृषपर्व्याची नगरीहि नव्हे व मी तो बृहस्पतिपुत्र कचहि नव्हे !

**माल०**—खरंच का ? बरं झालं बाई ! हा वेळपर्यंत मी आपली स्वप्नांतच होतें; पण जागी केलीत म्हणायची !

**अमृत०**—( थट्टेनें ) तें कसं काय बुवा ?

**माल०**—( विनोदानें ) हं, आपण नाहीं वरं मध्येंच बोलायचं ! रघुनाथराव देतील माझ्या प्रश्नाला उत्तर.

**अमृत०**—आज्ञा सरकार !

**माल०**—रघुनाथराव, प्रियवल्लभाच्या प्रेमाकरतां बापाच्याहि जिवाची पर्वा न करणारी कविकन्या देवयानी पुनः कचालाच शाप देते, हें विचित्रच नव्हे का ?

**रघु०**—जगच जर मुळीं सचित्र आहे, तर त्याला वैचित्र्यावांचून कसा रंग चढणार ! मालती, मनुष्याच्या सुखचैनी आड जोंपर्यंत एखादी गोष्ट येत नाहीं, तोंपर्यंत त्या वस्तूला काय वाटेल तें स्वरूप देऊन तिचे तो डोलारे माजवीत असतो. पण थोडी कांहीं कमतरता पडली कीं, लगेच वृत्ति पालटते ' ( स्वगत ) आज काव्यरसाला बराच ऊत आला आहे.

**माल०**—प्रेमी जिवाला एका काव्या खेरीज कांहींच दिसत नाहीं असं म्हणतात.

५ पद. ( फुल मंगावो. ) चाल.

**प्रेमहि हालें प्रेमहि चालें प्रेम मधुर मधु बोलें ॥ ध्रु० ॥**
**काव्य नसें जरि । प्रेम फसे तरि । काव्य सुरस रस**
**झालें ॥ १ ॥ काव्य खुलें जरि । प्रेम फुलें तरि । काव्य**
**रसिक जन डोलें ॥ २ ॥**

मग ज्या प्रेमाला विकार, विहार आणि संहार सुचतात, त्याला प्रेम म्हणतां येईल का ? कचाच्या प्रेमानं वेडी झालेली देवयानी त्या काव्यहिनानं तिचा प्रेमभंग करतांच कशी वरं काव्यहीन बनली ?

**रघु०**—तें देवयानीला जाऊन विचार.

**माल०**—यांत विचारायला कशाला हवं ? काव्याचा रसभंग करणाऱ्या अरसिकांना आपल्या अकलेचे हे तारेच तोडलेले दिसतात ! काव्यमाधुर्याला वेडावलेला भ्रमर—

**रघु०**—बस्स, पुरे कर या काव्यमाधुर्याच्या शुष्क गप्पा ! मालती, असल्या काव्यमाधुर्याचा मी भुकेला नाहीं.

**अमृत०**—( विनोदानें ) मालती, तूं किती कठोर आहेस. तुझ्यासारखी रूप-नगरची रूपकन्या आपली मैत्रीण बनवून माझ्या रघू शेजारीं बसावयाची सोडून काव्यमाधुर्याच्या नुसत्या बाता काय झोडीत बसली आहेस ? उगा बरं रघू ! एखादा काव्यखना आपण लवकरच शोधून काढूं.

**रघु०**—( स्वगत ) भोळ्या, ती काव्यखनी मी केव्हांच माझी केली आहे !

**माल०**—( विनोदानें ) अगबाई, पाहिलात का रघुनाथरावांचा चेहरा कसा चढला तो ! पुरे गडे आतां हा विनोद ! उगाच ब्र म्हणतां ब्रह्महत्या व्हायची !

**रघु०**—( त्रासानें ) असल्या पोकळ विनोदानें उत्साहहीन होणारा हा रघुनाथ नव्हे बरं मालती. माझ्या अमृतरावाचं सुख—

( त्रिंबकराव येतो. )

**अमृत०**—कोण त्रिंबकराव, कसा काय तो मुलगा आहे ?

**त्रिंबक०**—रावसाहेब, बिचाऱ्या ज्ञातारींचं घर साफ बसलं तो मुलगा नुकताच आटपला !

**अमृत०**—( दुःखानें ) अरेरे, काय या तापाच्या सांथीनं हा अनर्थ मांडला आहे ! जा, त्रिंबकराव त्या मुलाच्या दहनक्रियेची सर्व व्यवस्था करा.

**त्रिंबक०**—बरं आहे. ( जाऊं लागतो. )

**रघु०**—अहो कारकूनसाहेब, आज तरी त्या इनामदाराकडे खेप टाका.

( त्रिंबकराव जातो. )

**अमृत०**—रघुनाथ, आपले सारखे प्रयत्न चालू असतां सांथ वाढतच आहे, तेव्हां हा केवढा ईश्वरी क्षोभ ! ही साथ थांबवण्याकरितां माझ्या सर्व संपत्तीचा जरी विनियोग करावा लागला तरी तो मी मोठ्या आनंदानें करीन, पण दीन दुःखि-तांच्या यातना माझ्यानं पहावत नाहींत !

K. V. Datar



**रघु०**—अमृतराव, सांथ बरीच जोरावलेली दिसते, तेव्हां यापुढें रोग्यांच्या शुश्रूषेकरतां तूं जाऊं नयेस, अशी माझी तुला आग्रहाची सूचना आहे.

**माल०**—खरंच, यापुढें मी आपल्याला मुळींच जाऊं देणार नाहीं.

**अमृत०**—तुझी दोघेहि अगदीं मित्रे आहांत. मालती, केवळ ऐपआरामांत लोळण्याकरतांच का परमेश्वरानें आपणास जन्माला घातलें आहे? नाहीं, परमेश्वर जी एखाद्याला अनुकूल परिस्थिति प्राप्त करून देतो, ती जर त्यानें स्वतःच्या सुखचैनी-खातर खर्च केली, तर ईश्वराचा तो मोठा गुन्हेगार ठरतो. समाजऋणांतून मुक्त झाल्यावांचून कोणत्या सुखाचा आपल्याला अधिकार आहे?

**रघु०**—वाः! स्वतःचा बळी देऊन अतुल ऐश्वर्याला पराङ्मुख होणारा तूंच एक खरा समाजसेवक अढळलास! अरे, कसली समाजसेवा आणि कसला स्वार्थत्याग! लौकिकप्रदर्शनानं दांभिक वृत्तीवर पांघरूण घालण्याची ती एक क्लृप्ति आहे या पलिकडे त्यांत काहींच अर्थ नाहीं.

**अमृत०**—रघू, हें काय वडबडत आहेस! सर्वांच्याच अंतःकरणाची मर्यादा जर इतकी अकुंचित असती तर अधम स्वार्थाच्या अहमहमिकेनें या भूगोलाचे तुकडे तुकडे झाले असते! पण स्वार्थाला तिलांजली देणारे लोकमान्य महात्मे जगांत आहेत, म्हणूनच सृष्टिदेवता आपलं कार्य सुयंत्रित चालवीत आहे.

**माल०**—महाराज, आपण केला आहांत इतका स्वार्थत्याग पुरा नाहीं का? मग प्राण संकटांत लोटण्यांत तो कोणता पुरुषार्थ!

**अमृत०**—मालती, तुझं कोमल हृदय भीतीनें व्याकुल व्हावं यांत काहीं नवल नाहीं! पण पुरुष म्हणविणाऱ्या आम्हीं तरुणांना रंजल्या गांजलेल्यांचे आर्तस्वर कानीं येत असतां, श्वानाप्रमाणें शय्येवर लोळत पडणें, यासारखा नामर्दपणा तो कोणता? मालती, अशा विपत्तीच्यावेळीं लोकसेवा करतां करतां जर मला मृत्यु आला तर तुझं सौभाग्य अमर होईल आणि जिवंत राहिलों तर आपण समाजाच्या प्रेमाला पात्र होऊं! मग सांग, अशा सत्कार्यीं पतीनें जो धर्म योजिला असेल त्यांत त्याला सहाय्य देणें गृहिणीचें कर्तव्य नव्हे का?

**रघु०**—( स्वगत ) अलबत्, माझ्या सुखाचा मार्ग मोकळा होण्याकरतां तरी तें कर्तव्याहून आदि कर्तव्य आहे!

**अमृत०**–( ऐकलेसें करून ) हा पहा लोकांचा गलबला ऐकूं येत आहे. कोणी-तरी जवळपास सांथीच्या आहारी पडलेला दिसतो. रघुनाथ, चल लवकर—

**माल०**–माझं ऐकायचंच एवढं. आज आपण जाऊं नये असंच माझं मन मला सांगत आहे.

**६ पद ( कान्हा मुखसेन ) चाल.**

**माना विनतीस आतां काल ना सुधा हा ॥ धृ० ॥ जन हे सुखाचे । दिल्या घेतल्याचे ॥ १ ॥ स्वहिता जपावें । परार्था त्यजावें ॥ २ ॥**

**रघु०**—अमृतराव—

**अमृत०**—रघुनाथ दीनदुःखितांच्या कळवळ्यापेक्षां जर तुला आपले प्राण अधिक वाटत असतील तर खुशाल घरीं बैस. मी एकटाच जातों.

**रघु०**—छे, छे अमृतराव, तुझ्या आधीं हा मी तयार आहे. ( एकीकडे ) तुला चकवायला कितीसा अवकाश !

**अमृत०**—चलतर. मालती, भिऊं नकोस. परमेश्वरावर विश्वास ठेव—

**७ पद ( बिरजुमे धूम. ) चाल.**

**प्रियतमे देइ मना आराम । हरिल भया प्रभु तो निष्काम ॥ धृ० ॥ स्वार्थ न झाला सुखद कुणाला । जनहित मोक्षविराम ॥ १ ॥**

( दोघे जातात. )

**माल०**— ( श्वास टाकून ) हें मी काय करीत आहे ! या उदार, निष्पाप प्रेमी जीवाचा विश्वासघात करीत आहेना ? पण मी तरी काय करूं ? अशी दूर झालें म्हणजे मला माझ्या वर्तनाचा खेद होतो पण पुनः पुनः त्यांच्या आहारीं पडते । स्वैर एकांतच नाहींका मला घातुक झाला ! गोडभाषणाच्या जर मी आहारीं गेलें नसतें तर माझा मार्ग का चुकला असता ? मन दुबळं होऊं लागतांच सावध झालें असतें तर हें असं का घडतं ?—पण चंचल मनाला स्वैर वांवरूं दिल्याचाच हा सारा परिणाम !

८ पद ( रामसो कर प्रीत. ) चाल.

**वासना खल मोहिया दारुणा। विषम विकारी विषमया दावि स्वैरा मार्ग जगता दारुणा ॥ ध्रु.॥ खलसहवासें खलतर झाला। जीव उदासि विलासी वासना० ॥ १ ॥**

( जाते. )

---

## प्रवेश दुसरा.

**स्थल**—अप्पासाहेब इनामदाराचें घर.

( अप्पासाहेब व त्रिंबकराव. )

**त्रिंब०**—माफ करा बुवा! आज सहा महिने दारीं खेटे घाल घालून जोडे झिजले तरी पण तुमचे म्हणून कांहीं वायदे संपत नाहींत.

**१ इना०**—पण असे भिता कां? नवा करकरीत मिळाला म्हणजे तर व्हालना खूष?

**त्रिंब०**—कसले खूष होतां? तुमचा हा नन्नाचा पाढा वाचूं लागलों म्हणजे आमचे अमृतराव धनीसाहेब जरी कांहीं बोलत नाहींत तरी रघुनाथरावांचे चार वेडे वांकडे शब्द ऐकून घेतल्या वांचून भागत नाहीं.—काय हो इनामदार, एवढं हें हजार दीड हजाराचं कर्ज घेऊन केलंत तरी काय?

**१ इना०**—महाराज, माफ करा, चार शिव्या द्या, वाटल्यास दोन थोबाडींत भडकवा पण कर्ज कर्ज म्हणून टाहो फोडूं नका!

**त्रिंब**—का वरं, रकमा देऊन आम्हीच चोर?

**१ इना०**—तसं नव्हे हो! आज माझी इभ्रत काय आहे ती तुम्हाला नव्यानें सांगायला नको. मग आमच्या भांडवलाचं गाठोडं जर तुम्ही चव्हाट्यावर सोडूं लागलां तर एवढा डोंगर पोंखरून उंदीरच बाहेर पडणार कीं नाहीं? ( त्याच्या हनुवटीस हात लावून ) त्रिंबकराव, जा आतां. कोणी आल्यास भ्रमाचा भोंपळा फुटायचा ' यंदाची तुमची दिवाळी ताजी करतों.

त्रिंब०—पहा बुवा, सांगतों रघुनाथरावांना चार समजूतीच्या गोष्टी ! पण लवकर तजवीज करा. ( जातो. )

१ इना०—अप्पासाहेब इनामदार. इनाम जाऊन सामान लीलांव करायची पाळी आली आहे. छे, छे, छे, छे, हा कर्जाचा ससेमिरा टळणार कसा ? इनामदारीची घमेंड राखण्याकरतां कोणी कांहीं मागो, काढ सावकाराचं कर्ज, ओत फुकट्यांच्या पदरांत ' ओढ घराकडे कीं कर ताट पुढें ! रोज इनामदाराचं वारसं ! जगांत ज्याचं कुठं कांहीं साधत नसेल त्यानें अप्पासाहेब इनामदार यांच्याकडे खुशाल तेल द्यावा आणि तळीराम गार करून पळ काढावा. पौराणिक भाकडकथा झोडणारे भट कर्णाचे पोवाडे गातात पण हा इनामदार म्हणजे या विसाव्या शतकांतील मूर्तिमंत दघिकर्ण ! काय वाटेल तें करतो पण मोठेपणा गाजवितो ! लोक तरी काय विलंदर असतात हो ! हातीं लागेपर्यंत मला इनामदार इनामदार म्हणत हरवऱ्याच्या झाडावर चढवितात पण पुनः म्हणून तोंड नाहीं ' आतां काय करूं, कसं करूं, हा अष्टाक्षरी मंत्र सारखा घोकीत बसलों आहे कारण इनामाच्या येणार अवघ्या टिकल्या बारासें, त्यांत सोळा हिस्से आणि आमचे हे सतरासें तमासे पण करतां कसं ? मिशी झडली तरी हरकत नाहीं, पण तूप जिरतां कामा नये, तरच खरे पिढीजाद इनामदार !

( दोन गृहस्थ येतात. )

१ गृ०—नमस्कार–इनामदार नमस्कार !

१ इना०—हो हो पंत, कुणिकडे रस्ता चुकला ?

१ गृ०—आपल्याच भेटीकरतां ! म्हटलं दर्शन घडतं कीं, नाहीं ? हो, आधींच चोवीस तास कामाला जुंपलेले आणि त्यांत ही नाटक मंडळी आलेली ! पण गांठ पडली म्हणायची

२ गृ०—खरोखर, शौक वाळगावा तर आमच्या इनामदारानींच. गांवांत सांथीनें कोण कहर उसळलेला पण इनामदारानीं बदसुरांत टाकलीच संगीत सुराची भर ! मंडळी पण दिंडा गंधर्व आहे !

१ इना०—(स्वगत) म्हणजे ?–पण इनामदार आहे ! ऐट घालवितां कामा नये. ( उघड ) अहो, गांवांत कोण सांथीचा कहर आणि मंडळी आली आपली माझ्या नांवावर मग करता कसं, मिठापासून तिखटापर्यंत मला पुरवावं लागतं. नुकतेच मालक म्यानेजर येऊन गेले.

१ गृ०—अहो, का येणार नाहींत आणि कोण येणार नाहीं! इनामदार तोंडावर स्तुति करतो असं समजूं नका. इनामदार म्हणजे आमच्या गांवचं नाक आहे नाक! तमासगीर येवोत, बहुरूपी येवोत कीं, बादरायण ओळखीचे पाहुणे येवोत, इनामदारांच्या इकडे सर्वांची बरदास्त. जसं कांहीं सार्वजनिक अन्नसत्र!

१ इना०—कशाचं-कशाचं! आहे आपलं कांहीं तरी!

२ गृ०—इनामदार, आज मानापमान आहे म्हटलं.

१ इना०—मग यांत नवल तें काय सांगितलंत. अहो, आजकाल मुलांच्या मुर्खा शाळेंतील धडेहि घोळत नसतील इतकीं नाटकें व सिनेमांची वंशावळ आबालवृद्धांच्या तोंडीं खिळलेली असते.

१ गृ०—मग रात्रीं येतों म्हटलं आम्हीं.

१ इना०—खुषाल-खुषाल! पण आजच एवढी गर्दी का? नुकता कुठें दहावा खेळ आहे. बाकी माझी कांहीं हरकत नाहीं हो. एक सोडून शंभर इसम हाताला धरून बसवीन.

२ गृ०—वा, याची खात्री असल्यावांचून का आलों इनामदार? पण आज आम्हीं दोघेच येतों. पुढल्या खेळाला घरची सर्व मंडळी आणूं.

१ इना०—बरं, थिएटराजवळ भेटा.

१ गृ०—छे, छे! इनामदार, संध्याकाळीं इकडे फराळालाच येतों म्हणजे त्रास नको.

१ इना०—( स्वगत ) जावयींच माझ!

२ गृ०—बरं आहे इनामदार, घेतों आपली रजा.

१ इना०—या. ( दोघे जातात ) हें असं! नाहीं म्हणावं तर ऐट जाते आणि हो म्हणावं तर गळीं झोंबतं, फुकट नाटक आणि वर पुन्हा दक्षणा. पण करतां कसं इनामदार आहे. कोणा लेकाची या नाटक कंपनींत ओळख आहे आणि कोण कोणाला फुकट सोडतो? पण ( मिशीला हात लावून ) या पिळाकरतां हात ढिला सोडावा लागतो.

( रेणुका येते. )

रेणु०—पण मानेवर विळा फिरतो ना? अहो, म्हतारपणीं हें कसलं अंगांत वारं शिरलं आहे?

१ इना०—अग ए चूप. सुगंधी तेलं वापरून वापरून कुठें एखादा पांढरा केस डोकावूं लागला तेवढ्यावरून म्हातारा झालों नाहीं.

रेणु०—देवा ! देवा ! घराचं वाटोळं झालं तरी तुमची अक्कल गेली कुठें ?

१ इना०—हेंच हेंच ! पूर्वींच्या बायका नव्हत्या बुवा अशा बोलक्या !

रेणु०—वर्मी घाव दिला कीं, बायका बोलक्याच वाटायच्या !

१ इना०—खरोखर, तुम्हा बायकांना उठता लाथ अन् बसतां बुकी यांखेरीज एक क्षणहि जाऊं देतां कामा नये.

रेणु०—तर तर बायका म्हणजे गोठ्यांतल्या म्हशीच ! आले गेलेल्यानें तुडवाव्यांत !

१ इना०—यांत काय संशय. बायको म्हणजे बायको आणि पुरुष तो पुरुष !

रेणु०—अहो, आल्यागेल्याकरितां जे तुम्हीं मोकळं सोडलं आहांत, तेव्हां उद्यां करणार काय ? मधाला मुंगळे चिकटत आहेत पण सावकाराचे इंगळे डसत आहेत ना ? कर्णाचा गऽऽऽवाई अवतार !

१ इना०—शाबास. आतां खरी रत्नपारखी. अग, आपले अमृतरावच पहा. वाटेल त्याला सढळ हातानें देत आहेत म्हणूनच ना चार चौघांच्या तोंडीं गर्जत आहेत ? टांकीचे घाव सोसल्यावांचून देवकळा येत नसते ?

रेणु०—अहो, देवानं त्यांना तितकं दिलं तरी आहे; पण आपल्याजवळ काय आहे ?

१ इना०—( मिशा पिळीत ) काय आहे ? हा इनामदार आहे बरं ! जात घटवील पण ऐट घटविणार नाहीं. नेवढे चुलत्याचे डोळे मिटूं देत कीं, दाखवितों पाणी ! सोन्यांतच तुला गाढतों. काय बुवा म्हातारा फारच कणखर !

रेणु०—पण त्यांच्या प्राणावर का आपली इतकी उदारता !

१ इना०—का म्हणजे ? म्हाताऱ्याकोताऱ्यांनीं जगायचं तें किती ! आमची चाळिशीची सर्दी झाली तरी यांची साठीची गर्दी संपत नाहीं, म्हणजे काय ? पक्का भस्मभोगी !

रेणु०—चांगली इच्छा !

१ इना०—पण हो—तूं आज जा पाहूं तिकडे. दोन महिने इकडेच या, प्रकृतीचा भरंवसा नाहीं, घरांत कोणी मायेचं माणूस नाहीं, असा चुलत्याचा सारखा आग्रह चालला आहे.

रेणु०—आणि आपण नाहीं का येणार !

१ इना०—मी चार आठ दिवसा नंतर येतों.

रेणु०—तें का ? असं काय मेलं काम नड्न बसलं आहे ?

इना०—इनाम गांवीं वसुलीला जायचं आहे वसुलीला. आहेस कुठें ?

रेणु०—खरंच का ? मग आधीं माझी सरीची हौस पुरवायची गडे. हो, मी नाहीं ऐकायची !

इना०—हात्तिच्या ! सरीच काय गोट, पाटल्या, वाक्या, तुशा काय म्हणशील ती हौस पुरवितों. फुकटच का इनामदारीण शोभणार ?

रेणु०—चला, कांहीं तरी मेली थट्टा करायची !

१ इना०—बरं पण त्या लुगडेवाल्याला काय सांगितलंस ?

रेणु०—काय सांगणार ! आजचा वायदा केला आहे.

१ इना०—हेंच तें ! बायकांना धोरण नसतं तें हें अस्सं ! दोन दिवसांकरितां तो आतां दारीं ठोकीत बसणार—( दारावर थाप ऐकूं येते. पडद्यांत "इनामदार आहेत का घरांत ? " ) अग जा, जा घरांत नाहींत, गांवीं गेले आहेत म्हणून सांग—

रेणु०—कोण—तें ?

( पडद्यांत ) दार उघडा मग दिसेल कोण तें !

१ इना०— ( दांत ओंठ चावून ) अग नाहीं म्हणून सांगना !

रेणु०—तें किनई ( त्यांस ) कोणत्या गांवाचं नांव सांगू ?

१ इना०—मसणाचं !

रेणु०—मसणगांवीं गेले आहेत.

( पडद्यांत ) अरेरे ! फार वाईट झालं !

रेणु०—कोण मेला अभद्या !

१ इना०—हं जाऊं दे. कोणी आपल्या नांवानं शंकध्वनि करूं लागला कीं, तितकी कीर्ति वाढते. बरं पण तेवढी लुगडेवाल्याची ब्यादा काढून टाकिली असतीस तर बरं झालं असतं !

**रेणु०**—मग त्याला मी काय करूं? कुठे चार पैसे लपवून ठेवावेत तर त्यावर तुम्ही गिधाडासारखी झडप घालता. आतां नसते का उपयोगी पडते ?

**१ इना०**—पण अशी भितेस का ? इनामगांवाहून तर येऊं दे कीं, अशी मढवितों कीं थेट सांबाचीच पार्वती ! माझी गुणाची लाडकी ती.

**रेणु०**—हो आहे ठाऊक, कामापुरता तेवढा प्रेमाला पाझर फुटतो ( जवळची पैशाची पिशवी काढून ) हें पहा, शेजारणीचे माझ्याजवळ वीस रुपये आहेत ते देते पण परत करायचे हो ?

**१ इना०**—हो हो, पण तूं जा पाहूं, निघायची तयारी कर.

**रेणु०**—जाऊंच ह्मणतां ?

**१ इना०**—हं जा-( रेणुका जाते ) चला, थाप देऊन नाटकाचं संकट तर टाळलं आतां या ह्मणावं एक सोडून चार. किती झालें तरी इनामदार आहे.

( जातो. हेलकऱ्याच्या डोकीवर ट्रंक वगैरे सामान दिलेला असा नं०२ इनामदार मंजुळेसह येतो. )

**२ इना०**—श्रीहरी ! श्रीहरी ! श्रीहरी !

**मंजु०**—जळो तुमचा श्रीहरी ! ( हेलकऱ्यास ) काय बाबा, अझून किती दूर आहे ?

**हेल०**—हाच नव्हं का इनामदाराचा वाडा ( ट्रंक जोरानें खालीं ठेवतो ) हं काढा पैसे ?

**मंजु०**—मेल्या, आदळतोस केवढ्यानें ? हळू ठेव.

**२ इना०**—श्रीहरी !

**मंजु०**—अरे, वाटेंतच काय ट्रंक ठेविलीस ? आंतल्या अंगाला ठेव.

**हेल०**—( ट्रंक उचलीत ) वय्रा मोठी कुरेवाज दिसातिया ! ( आंत जातो. मंजुळा त्रासिक चेहरा करते इनामदार श्रीहरी ह्मणतो. हेलकरी येतो. त्यांस इनामदार पैसे देतो. तो निघून जातो. )

**२ इना०**—( दाराजवळ जाऊन ) घरांत कोणी आहे का ? इनामदार आहेत का ? मी त्यांचा भाऊ आहे. फार दूर देशाहून आलों आहे. दार उघडा.

K. V. Datār



**मंजु०**—अहो, इकडेतर मेला सारा शुकशुकाट आणि तुम्ही बोलतां कोणा-बरोबर ?

**२ इना०**—होय का ? मग कुठेंतरी बाहेर गेला असेल. बैस जरा. येईल इतक्यांत. श्रीहरी !

**मंजु०**—नकोग बाई ही प्रवासाची यातायात !

( एक लुगडीवाला येतो. )

**लुग०**—राम राम इनामदार.

**२ इना०**—राम राम.

**लुग०**—( नीट नीरखून ) वा इनामदार, आज अगदीं नवरदेव बनला आहांत !

**मंजु०**—कोण मेला धटिंगण ! ना ओळख कीं, पाळख ! अन् लागला थट्टा करयला !

**२ इना०**—श्रीहरी ! श्रीहरी ! श्रीहरी !

**लुग०**—वा, इनामदार आज चिलमीला उदार आश्रय दिला आहांत कीं, काय ? पण या कोण ?

**२ इना०**—कोण म्हणजे, श्रीहरी,— आमचं कुटुंब.

**लुग०**—कुटुंब ! अर्ध कीं, मुर्ध ! एकूण यांतहि आपली गति आहे तर !

**२ इना०**—अहो श्रीहरी, तुम्ही मला समजता कोण ?

**लुग०**—बडा घरका पोकळ वासा ! कांहीं भितो कीं काय ? एक साल झालं तरी वायकोच्या लुगड्याची फेड होत नाहीं आणि असलं अंगवस्त्र—

**मंजु०**—कोणरे मेल्या अंगवस्त्र ? आणि कोणी तुझं लुगडं घेतलं ?

**लुग०**—कोणी म्हणजे या या तुमच्या यजमानांनीं. इनामदार कमाल केलीत बुवा. आज नाटकाची तालीम चालली आहे वाटतं ?

**२ इना०**—अहो श्रीहरी, तुमचं डोकं ठिकाणावर नाहींसं दिसतं. अहो कोणी तुमचं लुगडं घेतलं आणि कोणाजवळ पैसे मागता ?

**लुग०**—इनामदार, आज भारीच रंगांत आला आहांत ? काकू मायेरी गेल्या आहेत वाटतं ? तरीच ! उडवा उडवा बुवा खुशाल मौज उडवा. मी कशाला काकूंना सांगायला जातों.

**मंजु०**—मेल्या !—

**लुग०**—हं तोंड संभाळा. इनामदारांचे आम्ही एक सोडून दहा शब्द ऐकून घेऊं पण त्यांच्या अंगवस्त्राचा एकहि शब्द सहन करणार नाहीं.

**मंजु०**—देवा, देवा हा मेला आहे तरी कोण ?

**२ इना०**—श्रीहरी !

**लुग०**—वा—तुकारामबुवा, हाच का तुमचा श्रीहरी ? ( हात जोडून ) जय श्रीहरी. पण जाऊंद्या मला काय करायचं आहे !

**२ इना०**—अहो, श्रीहरी जा आतां घरीं. उगाच माझं पित्त भडकवूं नका.

**लुग०**—ठीक आहे. आतांची वेळ जातों. उगाच तुमच्या रंगाचा बेरंग करीत नाहीं पण पुढच्या खेपेला जर पैसे मिळाले नाहींत तर सख्या बापालाहि ऐकणार नाहीं.

( जातो. )

**मंजु०**—अहो, तुमचा हा सांभाचा अवतार संपणार तरी केव्हां ? मेल्यानं मला अंगवस्त्र म्हटलं तरी तुम्ही आपले—

**२ इना०**—श्रीहरी.

**मंजु०**—मरो तुमचा श्रीहरी.

**२ इना०**—हें बघ, नको आपल्याला हें भावाचं घर ! या गांवांत माझा एक चुलता आहे. तूं बैस इकडे. मी त्याचा पत्ता काढून येतों नंतर आपण त्याच्याच घरीं जाऊं.

**मंजु०**—नका गडे, मला एकटीला भीति वाटते.

**२ इना०**—कांहीं नाहीं. ती बघ वाड्यांत एक खोली मोकळी दिसते तींत बैस. मी लवकर शोध करून येतों. श्रीहरी ! श्रीहरी ! श्रीहरी !

( दोघे दोन बाजूला जातात. )

## प्रवेश तिसरा.

स्थलः—वाड्याबाहेरील बाग.

( रघुनाथराव येतो. )

रघु०—काल अनुकूल असला कीं, मुसळांलाहि अंकूर फुटूं लागतो. पण तोच एकदां उलटला कीं, धर्म करतां कर्म उभें रहातें. सरस्वतीच्या नवऱ्याची शुश्रूषा करतां करतां अमृतराव स्वतःच सांथीच्या आहारीं पडला व माझा भाग्यरवि आशेच्या क्षितिजरेषेवर डोकावूं लागला. भोळा बिचारा ! अझून मालतीच्या अंध-प्रेमांत वेडाच राहिला आहे. तिच्या कोंवळ्या मनाला धक्का बसेल अशा समजुतीनें दुखण्याची बातमी गुप्त ठेवण्याची मला ताकीद देऊन सरस्वतीच्या घरीं पडला आहे. खरोखर ईश्वरी नेमानेम असे कांहीं विलक्षण असतात कीं, इच्छा असो वा नसो वेळ भरली कीं, कालचक्र आपोआप कार्याला लागतें. मालतीपुष्पांचा हार एकट्या माझ्याच गळीं शोभावा अशी दैवीघटना असल्यामुळें भवितव्यतेनेंच सांथीच्या रूपानें अमृतरावावर झडप घातली व माझा मार्ग मोकळा केला. अमृतराव, मालतीपुष्पाच्या सुगंधानें बेहोष होईपर्यंत हा रघुनाथ, आपल्या मित्रधर्माला जागृत होता. तो तुझे उपकार विसरला नव्हता पण कनक आणि कांता यांचा मोह जर ब्रह्मदेवाला आवरतां आला नाहीं तर त्याला मी तरी काय करणार ? मयासुराचाबाजार जर मी शिताफीनें उघडला नसता तर मालती कधींहि माझ्या इच्छेला वळी पडली नसती. पण आतां पाप बाहेर फुटूं नये एवढ्याचकरतां तिला निमुटपणें माझ्या आहारीं पडावें लागत आहे. पण या आंधळ्याकोशिंबिरीचा मला आतां पुरा वीट आला आहे. अमृतराव जगांतून नाहिंसा झाल्यावांचून मालती व संपत्ति केव्हांहि पूर्णपणें आधीन होणार नाहीं. औषधाचें निमित्त सांगून मी निघून आलों पण औषधाचा एक थेंबहि त्याच्या पोटांत जाऊं देतां कामा नये. चतुर विधात्यानें अनायासें प्राप्त करून दिलेली ही संधी जर का मी फुकट घालविली तर माझ्यासारखा मूर्ख शिरोमणी मीच ! मालतीला थाप देऊन तर गार केलीच पण तो म्हातारा कोल्हा मंगल मात्र स्वस्थ बसणार नाहीं. अमृतराव आला नाहीं असें

कळतांच सारा गांव पालथा घालील व थांग लावील. तेव्हां कांहीं तरी युक्तीनें त्याला चार आठ दिवस कुठें तरी दूर पिटाळला पाहिजे. तसाच हा दैवयोग जर साधला तर माझा पुढला व्यूह सिद्धीस नेण्याकरतां मला कोणाचें तरी सहाय्य घ्यावें लागेल, करतां सर्व रकमेची सूट देतों असं मघांच बोट दाखवून इनामदाराला तयार करून ठेवावा व वेळ येईल तसा फांसा टाकावा.

( मंगल येतो )

**मंग०**—रघुनाथराव, तुम्ही आलांत आणि माझा अमृतराव कुठें आहे ?

**रघु०**—मंगलबुवा, भारीच बुवा तुम्ही कोंवळ्या दिलाचे ! जरा कुठें अमृतराव दृष्टीआड झाला कीं लगेच कावरेबावरे होऊं लागता.

**मंग०**—मला म्हाताऱ्याला आतां कोठून कठोरता येणार ? आज सकाळपासून नाहीं नाहीं ते विचार येत आहेत. म्हणतातना 'मन चिंती तें वैरि न चिंती !' परमेश्वर माझ्या पोरांना सुखी ठेवो म्हणजे झालं !

**रघु०**—अहो, सुखी न ठेवायाला काय झालं ? असे काय आम्ही पापानीं पाय धुतले आहेत ?

**मंग०**—माझा अमृतराव पांच वर्षांचा असतांना थोरले धनीसाहेब आम्हांला सोडून गेले. त्यावेळीं मुलासारखा सांभाळ असें मोठ्या काकुळतीनें सांगून त्यांनीं अमृतरावाला माझ्या स्वाधीन केला. त्या दिवसापासून त्याला उरापोटाशीं धरून वाढविला आहे. अंगाखांद्यावर खेळविला आहे. पोटच्या मुलाहूनहि मला तो अधीक आहे. कधीं एका शब्दाबाहेर जात नाहीं. परमेश्वर, माझ्या बाळाला उदंड आयुष्य देवो !

**रघु०**—( स्वगत ) तीच वेळ आतां आली आहे. ( उघड ) अहो, त्याला देखील इतक्या कळकळ्यानें वाढवायला तुमच्यावांचून मायेचा दुसरा कोण होता ? तेव्हां वडिलासारखा त्यानें तुमचा मान राखावा हें त्याच्या सौजन्यतेला इष्टच आहे !

**मंग०**—कसलं इष्ट अन् अनिष्ट घेऊन बसलां अहांत ! अलीकडली मुलं सख्या बापाला जुमानीत नाहींत, मग माझ्यासारख्या म्हाताऱ्याला आणि त्यांत चाकराला कोण ओळखणार होता ? पण माझा अमृतराव—

**रघु०**—शहाणा आहे म्हणूनच त्याला तुमची किंमत कळत आहे.

**मंग०**—माझं बाळ नांवासारखं अमृताच आहे.

**रघु०**—मंगलवुवा, आज तुम्हांला एका सफरीवर जावं लागणार आहे.

**मंग०**—तें कां? पोरांना अशा सांथींत सोडून मला म्हाताऱ्याला कसली आली आहे सफर?

**रघु०**—कायहो मंगलवुवा, तुमच्या अमदानींत असली एखादी सांथ पाहिली होतीत का?

**मंग०**—कशाला विचारतां महाराज! कुठं ती पूर्वीची अमदानी आणि कुठं आजची नवी पिढी! एकाच्या शब्दांत शब्द असेल तर शपथ. जो पहावा तो आपला दुसऱ्याचा गळा कसा कापावा या विचारांत चूर. पापाची भीति नाहीं, धर्माची चाड नाहीं कीं खऱ्या खोट्याची कदर नाहीं! पण माझा अमृतराव कसा अझून येत नाहीं?

**रघु०**—खरं आहे! म्हाताऱ्या माणसांचा शब्द म्हणजे लाखानें तोलला जातो तें कांहीं खोटं नाहीं. मंगलवुवा, तुमचं म्हणणं अगदीं तंतोतंत पटलं! आमचा अमृतराव तसाच सदाचारानें वागत आहे म्हणूनच गव्हरनरसाहेबांकडूनही त्याची चहा होत आहे.

**मंग०**—काय, काय? गव्हरनरसाहेबांकडून माझ्या अमृतरावाची चहा?

**रघु०**—एकट्या गव्हरनरसाहेबांकडूनच काय, उद्यां बादशहांकडूनहि होईल.

**मंग०**—देव तुमचं तोंड गोड करो!

**रघु०**—ऐकलंत का मंगलवुवा, आम्ही वाड्याकडे येत होतों इतक्यांत गव्हरनरसाहेबांची मोटारगाडी तिकडून आली. अमृतरावाला पहातांच साहेबांनीं गाडी उभी केली व अमृतरावाला जवळ बोलावून आपल्याबरोबर साताऱ्यास येण्याकरतां आग्रह केला. गव्हरनरसाहेबांचा शब्द कोण मोडणार! अमृतराव निमुटपणें त्यांच्याबरोबर गेला.

**मंग०**—माझा अमृत आहेच सर्वांचा आवडता. बरं पण तो परत केव्हां येणार?

**रघु०**—साताऱ्याहून परभारेंच इनामगांवीं जाणार आहे आणि तुम्हालाहि त्यानं तिकडे बोलाविलं आहे.

मंग०—होय का ? तर मग आजच निघतों. एक दिवस आधीं पोंहचलेलं बरं म्हणजे त्याच्या खाण्यापिण्याची मनासारखी व्यवस्था ठेवतां येईल.

रघु०—आजच कांही जायला नको. उद्यां निघालांत तरी चालेल.

मंग०—छे हो, माझा कुठें जीव रहाणार आहे. तुम्ही आहांच इकडे. मनोहराला मात्र कुठें बाहेर जाऊं देऊं नका बरं !

रघु०—इकडील मुलींच काळजी करूं नका. अगदीं निर्धास्त जा.

मंग०—मग लागतों तर निघण्याच्या तयारीला.

रघु०—पण अमृतरावाला घेऊन लवकर या हो आम्हांला इकडे चैन पडणार नाहीं. ( मंगल जातो. )

रघु०—जा, थेरड्या आतां आठ दहा दिवस तिकडे खुशाल माल जपत बैस. तूं येण्यापूर्वीच सारी उलटापालट करून टाकतों आणि यदाकदाचित् अमृतराव या आजारांतून निभावला तर त्याचीच विद्या त्याला चकवायला अमलांत आणतो. या माझ्या कृतीला कोत्या बुद्धीची माणसं पाप म्हणतील पण माझ्यासारखे खंबीर पापपुण्याची सूत्रें वेळप्रमाणें बोटावर नाचवीत असतात. भोळ्या अमृता, तुझ्यासारख्या फुटक्या नशिबाच्या माणसानं जगांत जिवंत रहाण्यांत देखील अर्थ नसतो. मालतीच्या अंध प्रेमांत आज नाहीं उद्यां तुझा मनोराज्याचा डोलारा कडाडून त्याखालीं तुझ्या अंतःकरणाच्या ठिकऱ्या उडण्यापूर्वीच मूठ झांकलेली आहे, तोंच तुझा अंत होणें उभयतांना इष्ट आहे आणि माझ्या भाग्याचाहि हाच जीवनप्रभात आहे !

( जातो. )

---

## प्रवेश चौथा.

### स्थलः—सरस्वतीचें घर.

(अमृतराव अंथरुणावर पडलं आहे, बाजूला सरस्वती उभी आहे असा देखावा.)

अमृत०—( खोल स्वरानें ) सरस्वतीबाई, माझ्याकरतां किती श्रम घ्याल ? जा थोडी विश्रांती घ्या. आतां मल बरं वाटतं !

**सरस्व०**—यांत कसले श्रम. महाराज, आपणावरून माझा प्राण जरी ओंवाळून टाकला तरी आपल्या उपकाराची किंचित् तरी फेड होईल का ?

**अमृत०**—यांत कसले उपकार ? एकानें दुसऱ्याच्या उपयोगीं पडणें हा तर सृष्टिधर्म आहे. त्यांत मी तें काय अधिक केलं ?

**सरस्व०**—आज दिवस किती भयंकर ! प्रत्यक्ष रक्ताचीं माणसं तीं देखील एकमेकांच्या वाऱ्याला उभी रहात नाहींत. पण आपण दीन अनाथांच्या रक्षणाकरतां द्रव्यानं व देहानं सारखे झिजत आहांत. महाराज, देवासारखे आपण धांवत येऊन तिकडचा प्राण वांचविला नसता तर या सरस्वतीचा संसार आज अंधःकारमय झाला असता. महाराज, या गरीब सरस्वतीवर दया करून तिला चुडेदान दिलंत पण तें देतांना आपला प्राण कि हो सांथीच्या आहारीं पडला ! देवा ! किती मी हतभागी !

**अमृत०**—काय हा तुमचा भोळेपणा ! सरस्वतीबाई. कोण कुणाकरतां संकटांत पडतो ? तुमच्या पतीचा प्राण वांचला यांत मीं काय केलं ? परमेश्वराचीच जर तशी इच्छा नसती तर माझ्यासारखे शेंकडों प्राण बळी पडते किंवा द्रव्याचा वर्षाव होता तरी काय झालं असतं ? बरं पण माझा रघुनाथ आला का ?

**सरस्व०**—औषध आणण्याकरितां ते गेले आहेत. इतक्यांत येतील. पण आतां आपल्याला अम्मळ बरं वाटतं ना ?

**अमृत०**—होय, तुम्ही जा–स्वस्थ पडा.

**सरस्व०**—महाराज, आपल्याला माझी एक विनंति आहे, ऐकणं होईल तर सांगतें.

**अमृत०**—तुम्ही मला वहिणीसारख्या आहांत. या भावाचा तुमच्या सुखाकडे कांहीं उपयोग होण्यासारखा असल्यास मन मोकळं करून सांगा. माझ्या मनाला मोठें समाधान वाटेल.

**सरस्व०**—माझ्या पतीचा प्राण वांचविलात याहून अधिक तें काय उरलं आहे?

**१ पद ( सखि मानत नाहीं ) चाल.**

**पतितारक हेचि पद कृपासार । शुभकर बहु मज जगीं महाधार ॥ ध्रु० ॥ चरण थोर तव पुजुनि अंतरीं, जणुं प्रभुसमान । स्मरिन सतत मग सदुपकार ॥ १ ॥**

महाराज, देवानं आपल्याला पूर्ण ऐश्वर्य दिलं आहे, सेवेला शेकडों माणसं तत्पर आहेत शिवाय आपल्याला तरुण पत्नी असून सुंदरसा एक पुत्रहि आहे, तेव्हां इकडे रहाण्याचा आपण कां हट्ट धरिला आहांत तो कळत नाहीं. कोमलहृदयाची आपल्याला कल्पना आहे ना ?

**अमृत०**--ती आहे ह्मणूनच माझ्या दुखण्याची बातमी गुप्त ठेऊन मला माझ्या वाड्यांत नेऊं नका असा मी हट्ट धरिला आहे. सरस्वतीबाई, माझ्या मालतीच्या हृदयाची तुह्मांला कल्पना नाहीं. ती फार कोंवळ्या मनाची असून तिचं माझ्यावर अतिशय प्रेम आहे. माझं नुसतं डोकं दुखत आहे, इतकं जरी तिला कळलं तरी ती जीव सोडील.

**सरस्व०**--पण आह्मां गरिबांकडे आपल्याला कसं बरं सुख लागणार ?

**अमृत०**—सुख सात माडीच्या राजमहालांत किंवा मऊ शय्येंत नसतं. सरस्वतीबाई, जिकडे निष्पाप प्रेम आहे, सत्य आहे व समाधान आहे ती फाटकी तुटकी झोंपडी असली काय कीं, रानावनांतील गुहा असली काय, तिकडे आनंदी-आनंद भरलेला असतो. बरं पण तुमच्या पतीची प्रकृति कशी काय आहे ?

**सरस्व०**—आपल्या कृपेनं बराच गुण पडला आहे. नुकताच अम्मळ डोळा लागला आहे.

**अमृत०**--भिऊं नका. परमेश्वर सर्व कांही चांगलं करील.

**सरस्व०**—देवा—

१० पद ( माधु बनमें मोर ) चाल.

**धांव प्रभुरे धांव आतां । मारि हांका विकल दुहिता ॥ धृ० ॥ नाथ हा दीना-जनांचा । अवन करिया धरुनि हाता ॥ १ ॥**

**अमृत०**—सरस्वतीबाई, आला का माझा रघु ?

( रघुनाथ येतो. )

**रघु०**—होय, हा आलों.

**अमृत०**—रघुनाथ !

**रघु०**—अमृतराव, आतां तुला कसं काय वाटतं ?

**अमृत०**—सरस्वतीबाई, गेल्या कां? मला तुझ्याजवळ कांहीं बोलायचं आहे.

**रघु०**—सरस्वतीबाई, तुम्ही आतां विश्रांति घ्या, मी आहें जवळ.

**सरस्व०**—पण कांहीं काम लागल्यास हांक मारा वरं (जाते.)

**अमृत०**—रघुनाथ, मालतीला कांहीं कळविलं नाहींस ना?

**रघु०**—इतका मी वेडा नाहीं, तूं स्वस्थ रहा.

**अमृत०**—रघुनाथ जवळ ये.

**रघु०**—( जवळ जाऊन ) काय म्हणतोस?

**अमृत०**—या दुखण्यांतून मी बरा होऊन माझ्या मालतीला भेटेन असं नाहीं रे मला वाटत.

**रघु०**—( स्वगत ) यांतच तुझं भाग्य आहे.

**अमृत०**—रघू, मी अझून का आलों नाहीं, या चिंतेनें माझी मालती भयभीत झाली नाहीं ना?

**रघु०**—ती काळजी करूं नको म्हणतों ना? अमृतराव, हें एक औषध आणलं आहे तें घे म्हणजे लवकर हुषार होशील.

**अमृत०**—रघुनाथ, प्राणाच्या आशेनं काडीचा आधार धरणाऱ्या बुडत्या-जहाजावरील प्रवाशाची धडफड जितकी निष्फळ असते तितकीच माझ्या प्राणाची आशा आतां व्यर्थ आहे. हा तुझा बाळमित्र—

**रघु०**—नको, असं कांहीं तरी भलतंच बोलूं नकोस. अमृतराव, तुझ्यावांचून या जगांत मला काय आहे आणि मालतीला तरी कोण आहे?

**अमृत०**—राज्या, मानवी जीवित आकाशपटलाच्या रंगाइतकंच चंचल आहे, त्याचा खेद कसला! रघू, मला एक वचन देशील काय?

**रघु०**—या रघूचा प्राण सर्वस्वी तुझ्या करितां असतां असा शंकीत का होतोस? सांग, तुझी काय आज्ञा असेल ती मोकळ्या मनानें सांग, हा रघू प्राणापलीकडेहि ती पाळील.

**अमृत०**—रघुनाथ, माझ्या मागें माझ्या स्त्रीपुत्राला कसलीहि उणीव पडणार नाहीं इतकी विपुल संपत्ती परमेश्वरानें दिली आहे पण त्यांच्या जिवाची खरी कळकळ बाळगणारा एका तुझ्यावांचून मायेचा कोणी नाहीं रे!

**रघु०**—असा धैर्य सोडूं नेकास.

**अमृत०**—रघू, तूं तरुण आहेस, तुला अजून संसारी व्हायचं आहे. तरी पण माझ्या मागें माझ्या मालतीच्या व मनोहरच्या, संरक्षणाची जबाबदारी तूं आपल्या शिरावर घ्यावीस, अशी या बालमित्राची तुला आज्ञा आहे. गड्या, मृत्यूशय्येवर पडलेल्या आपल्या बालमित्राला एवढी भिक्षा घालशील ना ? जगाचा शेवटचा निरोप घेणाऱ्या आत्म्याची इच्छा पूर्ण करशील ना ?

**रघु०**—हाय! शेवटीं या अफाट जगांत मला एकटाच सोडून जाणार ना !

**अमृत०**—त्याला इलाज नाहीं. एका जहाजांतून सफर करणारे प्रवासी कमी अधिक अंतरानें जसा एकमेकांचा आनंदानें निरोप घेतात, त्याचप्रमाणें या संसाराच्या अफाट जहाजावरील आम्हां प्रवाशांना आज नाहीं उद्यां आपापल्या मुक्कामाला गेलंच पाहिजे ! दे वचन दे—जीव घाबरा होऊं लागला.

**रघु०**—बालमित्रा अमृतरावा, या काळरात्रीला साक्ष ठेऊन वचन देतों—

**अमृत०**—तुझा हात कां बाजूला गेला ?

**रघु०**—ऐक, देहांत चैतन्य असेपर्यंत हा रघू मालतीला अंतर देणार नाहीं !

**अमृत०**—आतां माझा आत्मा समाधानानें तुझा निरोप घेईल. रघुनाथ, माझा प्राण निघून गेल्यावर माझ्या प्रेताची बिनबोभाट विल्हेवाट लाव व प्रसंग पाहून हळू हळू माझ्या मृत्युची बातमी मालतीच्या कानावर घाल. तिला दुःख करूं देऊं नकोस. धीर दे. माझ्या मनोहराला आपलाच समज. याहून तुला अधिक काय सांगूं ? गड्या, या क्षणभंगुर जगाचा मोह विकट आहे पण परमेश्वराचं पाचारण आलं कीं, सर्व पाश तोडून जावं लागतं ! हाय ! मालती ! मालती—

( मूर्छित पडतो. )

**रघु०**—( तो मेला अशा समजूतीनें ) जा, काळाच्या जबड्यांत अक्षयचा गडप हो ' एकाचा नाश तोच दुसऱ्याचा उत्कर्ष हें तत्व तुला दिलेल्या वचनानं हा रघुनाथ जगाच्या अनुभवाला लवकरच आणून देईल. अमृतराव, तुझ्या स्मशान-यात्रेच्या भानगडींत पडून या सांथीच्या काळांत जीव धोक्यांत घालण्याइतका हा रघुनाथ मूर्ख नाहीं. शिवाय तुझ्या कुलमुखत्यारीचं मृत्युपत्र हातीं असल्याखे-रीज राजरोसपणें मला वाटेल तें करतांहि येणार नाहीं. तेव्हां इनामदाराच्या हस्तें

तुझ्या प्रेताला अग्नि देऊन बनावट मृत्युपत्रावर त्याची साक्ष घेतली कीं, हा रघुनाथ तुझ्या सर्वस्वाचा मालक झाला! भोळ्या अमृता! पुनः या जगाच्या रंगभूमीवर येण्याची जर तुला इच्छा झाली तर आपली भूमिका नीट सजवून हुषारीनें ये, हाच तुला माझा जीवनसंदेश आहे!

(पडदा पडतो.)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा
क्र. ...२.७८ . नों. दि ..............
वि. ............
5112

## प्रवेश पांचवा.

स्थल—इनामदारांच्या चुलत्याच्या वाड्याबाहेरील प्रदेश.

( दोन गृहस्थ येतात. )

**१ ला०**—आतां चरफडतां कशाला? तुमच्या नादीं लागून मी मात्र रात्रीं फजेती करून घेतली. रात्रभर तिची समजूत करतां करतां पुरेवाट झाला!

**२ रा०**—अहो, परवांच्या मानापमानाला नव्हतों का गेलों? मग काल रात्रींच काय झालं असेल तें हरी जाणें!

**१ ला०**—हरीच्या आधीं आम्हालाच चांगलं जाणवलं! पण तुम्हाला तरी बोल लावण्यांत काय मतलब! फुकटे आम्हीं, मारे निघालों बायकापोरें घेऊन नाटकाला! जसं कांहीं घरचंच नाटक! बिचाऱ्या बायकामुलांचा मात्र उगाच हिरमोड झाला.

**२ रा०**—पण तुम्हाला एकट्यालाच कांहीं खवळायला नको. तुमच्या ग्रामीच्या बाट्यांत आमचाहि होताच अर्धा भाग.

**१ ला०**—ह्मणे नाटक कंपनींत माझं दांडगं वजन आहे. काय ऐकता त्या गप्पीदासाचं! अशी एका एकाची फुकटावळ जर सोडूं लागले तर बिचाऱ्या नाटक मंडळीला पडदे विकून जायची पाळी येईल. इनामदार एक लोणकडी चढवितो पण आम्हा फुकट्यांना कांहीं अक्कल पाहिजे कीं नको?

**२ रा०**—त्या इनामदाराची गांठतर पडूं द्या, कशी उडवितों पहा.

**१ ला०**—( पड्याकडे पाहून ) अहो तो पहा. तो इनामदारच नव्हे का?

१ रा०—भला सांपडला. गुलामाची अशी खरड काढतों कीं, देखते रेहना !

( नं. २ इनामदार येतो )

२ इना०—श्रीहरी, भटकून भटकून पायाचे तुकडे पडले.

१ ला०—मग पैशाची खडीसाखर वाटा.

२ रा०—( हात जोडून ) छान् छान् इनामदार ! कोणत्या गुरूजवळून विद्या वेदा केलीत ?

२ इना०—का बुवा, माझ्या विद्येची का एवढी चवकशी ?

२ रा०—नाहीं, ह्मटलं आपला गुरुबंधू तरी व्हावं ह्मणजे उद्यां थापबाजीचा एखादा प्रसंग आला तर उमेदवारी नको !

२ इना०—ह्मणजे ? तुमची भाषा नाहीं मला उमगत.

१ ला०—अहो बरोबर ! आमची भाषा तुह्माला कशी उमगणार ? चोराचीं पावलं चोरच उमगूं जाणे !

२ रा०—इनामदार, असली फुकटी ऐट मिरवायला तुमच्या मानेवर कोणी सुरी का ठेवली होती ?

२ इना०—अहो श्रीहरी, तुमची माझी ओळख नाहीं कीं पाळख नाहीं आणि हें बडबडतां काय ?

२ रा०—इनामदाराचं डोकं आज ठिकाणावर नाहीं.

१ ला०—जाऊं द्या हो. तुह्मी काय या चिलीमबाजाबरोबर डोकं फोडीत बसलां ? ह्मणे इनामदार ! पत नाहीं कवडीची आणि सुटले साऱ्या गांवाला नाटकाचं आमंत्रण देत !

२ इना०—नाटक ? श्रीहरी, तुमचं कीं, माझं ?

२ रा०—इनामदार, असं वेड पांघरून पेडगांवीं जातां येत नसतं. नाटक कंपनींत जर तुमची पत नव्हती तर आह्माला व्यर्थ त्रास देऊन मिळवलंत काय ?

१ ला०—इनामदार, आतां तरी पुढें असल्या थापबाजीला सोडचिठी द्या. आह्मी अब्रूदार ह्मणूनच स्वस्थ बसलों दुसरा एखादा असता तर शोभाच करता.

२ रा०—चला, यांचं तोंडहि पहायला नको. ह्मणे इनामदार.

( दोघे जातात. )

२ इना०—श्रीहरी, हे माथेफिरू कीं, गांजेकसू? या गांवांतले लोक आहेत तरी कोण? जो भेटेल तो माझ्या प्रश्नाला सरळ उत्तर न देतां लागतो आपला कांहीं तरी बडबडायला! या सांथीच्या आजारानें या लोकांचीं डोकीं फिरलीं आहेत कीं काय? सारखी खानेसुमारी चालविली आहे. पण चुलत्याचा पत्ता लागत नाहीं कीं, भावाची भेट होत नाहीं! परत मागें जाईन म्हटलं तर माया महा खोटी! अशा सांथींत भावाची काय विल्हेवाट लागली ती कळण्यावांचून येथून पायच निघत नाहीं. पाहूंया आणखी थोडे दिवस. वाड्यांत सोय लागलीच आहे; नाहींपेक्षां शेवटीं आहेच प्रयाण!

( जातो. दुसऱ्या बाजूनें नं. १ इनामदार गात येतो. )

१ इना० —(वेड्यावांकड्या ताना मारीत) **'पाहि सदा मी परि कंवि नाथ भासे मला। नवोनव।'** छे आमच्या या फुटच्या नळकंडींतून कुठला तो खळखळाट निघाला? अहाहा! कोकिळेला हाणून पाडणारे ते मंजुळ आलाप, खवळलेल्या समुद्राच्या लांटासारखा मुखावरील तो अभिनय, तोफांच्या धूमधडाक्यासारख्या भेदरून टाकणाऱ्या त्या मधूर ताना, किती गोड, किती मधूर, किती रसाळ! भामिनी! भामिनी! अमृतरावाच्या प्रेताला अग्नि देण्याची कामगिरी रघुनाथरावानें कालरात्रीं मोठ्या विश्वासानें माझ्यावर टाकिली होती. पण तुझ्या मधुरगानाच्या नादें प्रेत तसेंच नदींत फेंकून धांवत थियटराकडे आलों तों फुकट्यांची यात्रा गोळा झालेली, हाय हाय करीत मागच्या पावलीं पळ काढावा लागला. भामिनी! तूं आपल्या मधुर कंठानें या इनामदाराला अगदीं घायाळ करून टाकलें आहेस. बोल, तुझ्या मधुर कंठाच्या तिलभर प्राप्तीकरतां मी तुझी कोणती आराधन करूं! खरोखर जन्माला यावं व पाणक्या का होईना वाढपी आचारी बनून तुझे पाय चुरीत रहावं असं वाटूं लागलं आहे. छे! छे! इनामदार आणि गायनवादनांत ढ म्हणजे केवढी घोडचूक झाली. एखाद्या वजवण्याकडून सधपचे दोन धडे घेतले असते तर प्रति भामिनी बनून मी मी म्हणविणारांना वेड लावलं असतं. आहा! भामिनी! भामिनी! भामिनी दे तव चरणीं—( मोठ्यानें खदखदां हसून ) अरे वा, संगीताबरोबर मी कवि बनलों! ( टाळ्या पिटीत ) वाहवा, सांपडली—सांपडली—सांपडली!

( एक गृहस्थ येतो. )

**गृह०**—इनामदार काय सांपडली ?

**१ इना०**—सांपडली ! ( त्याचा गळा दाबीत ) तुमच्या गळ्या शपथ सांपडली.

**गृह०**—अहो काय सांपडली ?

**१ इना०**—कवीची किल्ली.

**गृह०**—ती कशी ?

**इना०**—जावें कवीच्या वंशीं तेव्हांच उमगेल.

**गृह०**—म्हणजे ?

**१ इना०**—म्हणजे, घोडयाच्या खिंखाळण्यासारखी का होईना संगीताची एक तान रडतां आली कीं कवि बनतां येतें.

**गृह०**—तें कसं काय बुवा ?

**१ इना०**—तीच तर कविकिल्ली आहे. हं, लागा पाहूं संगीतांत रडायला. हं–रडा–भेकाड पसरतां येईल इतक्या जोरजोरानें रडा. निघेला तो सूर कवीचं काव्य. मारा हाणा फोडा जोडा, हाणा हाण. दाणादाण–ह ळ क्ष ज्ञ ! ट ला ट आणि अडेल तिथें कचटतप कोंबलें कीं, झालं कवींचं काव्य ! प्रासमयकादिक मोरयाबाप्पाला बहिष्कार घातला आहे. कारण सुधारणेचा काळ आहे.

**गृह०**—वा ! एकूण कविबाळांना ३६५ खून माफ आहेत म्हणतां ?

**१ इना०**—नुसत्या खुनांना काय चाटतां? महाराज, एकदा कां संगीताचं वावटळ कवीच्या डोक्यांत सुरू झालं कीं, काव्याचा धबधबा फुटूं लागतो आणि त्याच्या प्रवाहांत गटांगळ्या खात खात एखाद्या खडकरूपी तरुणीवर कवीचा कपाळमोक्ष होईपावतों तो वाहत जातो.

**गृह०**—तर मग सध्यां आपण तरुणीच्या वेडांत आहांत म्हणायचें !

**१ इना०**—छे, तुमच्या राठ भाषेत त्याला तरुणीचें वेड असें म्हणतात. पण कविकाव्याचा गिलावा दिला कीं, ' विरहाग्नीनें होरपळत आहोंत ' असं सुंदर काव्यरूप प्राप्त होतं !

**गृह०**—इनामदार, या पिकलेल्या मिशीची तरी कांहीं मुरवत ठेवा.

**इना०**—वा, मिशी पिकली म्हणून इच्छा पिकते कीं काय ? अहो, हल्लीच्या काळांत विशींतच मिशा पिकतात. त्यांत काय मोठंसं ?

( एक वैदू येतो. )

K. V. Datar



वैदू०—वाइलाओऽऽखाद! सरदिलाओऽऽखाद! दम्याचा, माथ्याचा, पोटफुगीचा, मूळव्याधीचा, भसमरोगाचा वाइलाओऽऽखाद. ऐका—तमाम म्हातारे, थेरडे, करडे, कान लंबे करूनशानी ऐका—पांढऱ्या केसाचा काजळी मलाम! चामडी काळी पडत नाय, पुरल उठत नाय. आग होत नाय. एकदा चोपडला कीं, जनम टेप! लइसस्ता. एका बुदल्याचा दाम सात आना नऊ पया. वाइलाओऽऽखाद.

(जातो.)

गृह०—इनामदार, पहातां काय? ह्या आश्रय आणि ह्वा काजळीकल्लेदार.!

(चित्रविचित्र पोशाखांत गळ्यांत पाटी, हातांत घंटा व पेटी. घेऊन एक फिरस्ता येतो.)

फिरस्ता०—वाचा, वाचा डोळे फाडफाडून वाचा. मदनविलास लोहभस्म कर्पूर मिश्रित शृंगार मंजरी गुटिका. कसल्याहि असाध्य रोगावर या गोळ्या तावडतोब चमत्कारिक गुण दाखवितात. यांच्या सेवनानें साठ वर्षांचा खप्पड थेरडा तरणाताठ बनतो. एका सप्तकांत मुखावर लिंबवर्ण चढूं लागतो. अगांत तरतरी येते. शिथिलगात्रें जोरदार बनतात. स्वस्तपणाची कमाल! ३२ गोळ्यांच्या एका डबीची किंमत अवघी आठ आणे. एकदम तीन डब्या मागविणारास पोष्टेज माफ. घ्या घ्या कामोत्तेजक, वीर्योत्तेजक, बलोत्तेजक, मदनमंजरी गुलशनजोबन बादशायी गुटिका. आमचा छाप पाहून घ्या. नकली मालाला फसूं नका. (जातो.)

गृह०—अरे वा! इनामदाराचं दैव आज चोंहिकडून फळफळलेलं दिसतं. आतां एखादा वशीकरणमंत्रतंत्रसिद्ध ताईतवाला आला कीं, इनामदारांना वधूवराच्या जाहिरातींत फडकायला कांहीं हरकत नाहीं.

१ इना०—(स्वगत) काय पण उत्तम संधी आली आहे. एका दगडांत दोन पक्षी.

गृह०—इनामदार, पहातां काय दोघहि अजून दूर गेले नाहींत. ठोका धूम.

१ इना०—ऐका हो, थट्टा कसली करतां? (स्वगत) दोघेहि गांठावेत.

(जातो.)

गृह०—कसा आहे उल्लू म्हातारा.! (जातो.)

---

# प्रवेश सहावा.

स्थलः—नदी किनारा.

( अमृतराव व संन्यासी. )

**अमृत०**—महाराज, आपले उपकार मी आजन्म विसरणार नाहीं.

११ पद [ क्षण मधुना ] चाल

**जड रसना गाया ऋण अनुपम । चिर पद अंकित दास हा ॥ धृ० ॥ विकसवि रजनिमुखा विधू । हांसवि जगंत सकल सुखसंगम । भवभयहारक साधु-समागम । चिरसुख चिरहित-दायक हा ॥ १ ॥**

मला जायला आतां आज्ञा द्या. आडवूं नका. मी मेलों या समजूतीनें माझ्या स्त्रीनें—

**संन्या०**—मोठा आनंदोत्सव केला असेल-

**अमृत०**—आपण संन्यासी आहांत शिवाय नदीच्या उदरांतून बाहेर काढून दिव्यऔषधीनें मला नवजीवन दिलं आहांत, एवढ्याचमुळें माझ्या स्त्रीविषयीं काढलेले कठोर उद्गार सहन करावे लागत आहेत नाहींपेक्षां—

**संन्या०**—माझा प्राण घेतला असतास हेंच ना ? बाबारे, आम्ही सर्वसंगपरित्यागी वनवासी ! आम्हांला कोणाच्या रोपातोषाची पर्वा नसते. आपला अनुभव जगाला सांगावा, डोळेझांक करून चालत असलेल्या डोळसाला पुढें असलेल्या खांच खळग्याची सूचना द्यावी व झोंपी गेलेल्यास जागं करावं याहून अन्य कर्तव्य नसतें.

**अमृत०**—आपण योगी, संन्यासी प्रेमबंधनें तोडून टाकिलीं आहांत, तेव्हां प्रेमाच्या दृढग्रंथि आपल्याला कशा कळाव्यात ?

**संन्या०**—त्या चांगल्या कळल्या आहेत, म्हणूनच तुला सावध करीत आहें. बोल, तूं आपल्या स्त्रीचं प्रेम कसोटीस लाऊन पाहिलं आहेस काय ? तुझ्या मित्राच्या प्रामाणिकपणाची तुला खात्री आहे काय ?

**अमृत०**—तुम्हापुढें उभा असलेला हा अमृतराव म्हणजे मृताची छाया आहे, असं जर मला कोणी सांगितलं, तर एकवार मी तें खरं मानीन, पण माझ्या माल-

K. V. Datar



तीच्या गैरवर्तनासंबंधी प्रत्यक्ष आकाशवाणी झाली, तरी तीवर माझा विश्वास बसणार नाहीं.

**संन्या०**—झूट, पूर्ण परीक्षा केल्यावांचून स्त्रीच्या शुद्धचरणाची खात्री देणारा पुरुष म्हणजे तिच्या हातांत नाचणारं कळसूत्री भावलंच समजलं पाहिजे. पति जिवंत असून मुबलक संपत्ति असली कीं, चंचल मनाच्या स्त्रीला वाटेल तो थैमान घालतां येतो. तिच्या विरुद्ध एक ब्र उच्चारण्याची कोणाला छाती नसते.

**अमृत०**—पण निदान माझ्या मालतीला तरी हा नियम लागूं पडणार नाहीं. प्रेमरूपानें अवतीर्ण झालेली स्वर्गीची ती एक देवता आहे !

**१२ पद ( करीन यदुमनी. ) चाल**

**करीत शशिमुखी चतुरा । सुगम विकट भव-पथ पसारा ॥ धृ० ॥ पतिचरणांबुज सतत मधुपाना । करी सार्थ उदारा ॥ १ ॥**

महाराज, आपण एकवार जर तिला पहाल तर त्या देवीची साधारण स्त्रीकोटींत गणना केल्याचा आपणांस खेद होईल.

**संन्या०**—कादंबरींतील नायिकेच्या अचरट प्रेमाला भुरळणारा हा वेडापीर नव्हे. मनाला बेहोष करणाऱ्या तरुणीच्या सौंदर्याला प्रेम प्रेम समजून तुझ्या सारखे उन्मादाचे मद्यपी कांहीं जरी वरळत असले, तरी तें प्रेम म्हणजे प्रेम नसून शरीराला दाह देणारें जहाल विष आहे, असाच शेवटीं अनुभव येतो. पति, तरुण, सुंदर व गुणवान जरी असला तरी जिच्या मनावर चांगले संस्कार घडलेले नसतात, ती स्त्री कोणत्या वेळीं काय करील याचा बिलकूल भरंवसा नसतो. शेणांतला किडा पुष्पांच्या राशींत जरी ठेवला तरी शेवटीं तो शेणांतच जातो.

**अमृत०**—हा वादविवादानें सुटणारा प्रश्न नव्हे. ज्यानें त्यानें स्वतःच्या अनुभवावरूनच काय तो निर्णय लावला पाहिजे. महाराज, आपले माझ्यावर अनंत उपकार झाले आहेत, माझ्या बरोबर चला व लागेल तितकें द्रव्य घेऊन जा पण कृपाकरून मला जायला आतां आडवूं नका.

**संन्या०**— ( हंसून ) मी जो हा वेश धारण केला आहे, तो द्रव्याच्या किंवा विषयसुखाच्या मोहाला भुरळणारा त्रिदंडी समजतोस काय ! ( त्याचा हात धरून )

ऐक, एकाकाळीं मीहि तुझ्यासारखा प्रेमवेडा बनलों होतों. माझ्या एका स्त्रीवांचून जगांतील सर्व स्त्रिया मला दुर्वर्तनी वाटत होत्या. परमेश्वरानें असलें दिव्य रत्न दिलें या उन्मादांत मी घोरत पडलों होतो.

**अमृत०**—मग तुम्हीहि माझ्यासारखेच भाग्यशाली होता.

**संन्या०**—कसलं भाग्य ! कालसर्पिणीला कितीहि दूध पाजलं तरी शेवटीं ती विषच ओकत असते. ती आपल्या स्वभावावरच गेली आणि त्यांतल्यात्यांत मोठ्या खेदाची गोष्ट म्हणजे ज्याला मी प्रतिष्ठित सद्गृहस्थ समजत होतों अशा एका बेरडानेंच-

**अमृत०**—काय प्रतिष्ठित सद्गृहस्थानें !

**संन्या०**—कसला प्रतिष्ठित. हे समाजांतील भुजंग संभावितपणाच्या ढोंगाखालीं अशीच एखाद्याच्या संसाराची राखरांगोळी करीत असतात.

**अमृत०**—किती नीच वासना ! एका सद्गृहस्थानेंच तुमच्या स्त्रीला भ्रष्ट केलें हं ?

**संन्या०**—ती जर खऱ्या शीलाची असती तर तिला भ्रष्ट करण्याची त्या हरामखोराची काय मगदूर होती ! पण दोघेहि नीच, दुराचरणी, हलक्या मनाचीं. विषारी बीजापासून विषारींच फल निपजायचीं !

**अमृत०**—अरेरे ! त्यावेळीं तुमच्या मनावर केवढा भयंकर आघात झाला असेल ? माझ्यासारखा कोंवळ्या दिलाचा पुरुष तर वेडाच बनला असता.

**संन्या०**—कोणी वेडा बनत नाहीं. प्रसंग आला कीं, प्रत्येकजण पाषाणाहूनही पाषाण बनतो.

**अमृत०**—पण आपल्या इतका मी दुर्भागी असेन असं मला वाटत नाहीं. मला माझ्या स्त्रीची व मित्राची पूर्ण खात्री आहे.

**संन्या०**—कसली खात्री घेऊन नाचत आहेस ? तुझ्या मित्राचं जर तुझ्यावर खरं प्रेम होतं तर तूं मेलास किंवा नाहीं याची पुरी खात्री करून घेतल्यावांचून तुला नदींत का फेंकून दिला असता ?

**अमृत०**—कांहीं काळ मूर्छितावस्थेंत असल्यामुळें खरा प्रकार काय घडला असेल तो मला कांहींच सांगतां येत नाहीं. पण एका अर्थी त्याचा हा उपकारच नाहीं का झाला ?

**संन्या०**—भोळ्या, यांतच त्याच्या कपटाचा छेडा हातीं लागत आहे. पाप लपविण्याकरतां दुष्ट माणसें एखादी गोष्ट मोठ्या शिताफीनें करीत असतात, पण तीच

त्यांच्या नाशाला कारण होत असते. ऐक असा भांबाऊ नकोस. तूं मेला आहेस, अशीच आज सर्वांची कल्पना झाली आहे. तेव्हां ही बहुमोल संधि फुकट घालवूं नकोस. हा वेश टाक व अन्य वेशानें आपल्या वाड्यांत जा. तुझ्या बायकोनें दुःखाश्रूंचे किती पाट फोडले आहेत ते पहा. मित्राच्या प्रामाणिकपणाची खात्री करून घे आणि नंतर प्रेमाच्या मगरमिठ्या मारीत बैस. पण संभाळ, दुर्दैवानें जर कांहीं विपरीत अनुभव आला तर बेफाम होऊं नकोस. विवेकानें वाग. जा—तुला सावध केला आहे. शहाणा असलास तर जागा हो, नाहिंपेक्षां असाच भ्रमांत रहा !

( जातो. )

**अमृत०**—या संन्याशानें काय ही माझ्या मनाची द्विधा वृत्ति केली. हा जर ढोंगी असता तर मी देत असलेल्या द्रव्याचा धिक्कार करून चालता झाला नसता. परमेश्वरा, या दुर्दैवी संन्याशाच्या भवितव्यतेप्रमाणें माझ्या नशिबीं कांहीं विपरीत प्रकार तर लिहिला नाहींस ना?

१३ पद ( मम सुखाची ठेव. ) चाल.

**मज यशाचा लाभ द्यावा न हो कांहीं हेवा । ही धृति मनिं ठसावी मम हेतु तो सफल व्हावा ॥ ध्रु० ॥ अघटित कर्मगति ही रावरंकआदि खेळवी करिं सकला न दे कुणा-ठावा ॥ १ ॥**

( पडदा पडतो. )

## अंक पहिला समाप्त.

---

स्वस्तिक वाचनालय

# अंक दुसरा.

## प्रवेश पहिला.

### स्थलः—अमृतरावाच्या घरांतील एक भाग.

( मंगल दुःखानें प्रवेश करतो. )

**मंग०**—अरे अभद्या ! ज्याला लहानाचा थोर केलास, अंगाखांद्यावर नाचविलास, त्याची मृत्युवार्ता ऐकण्या करतांच का जिवंत राहिलास ! अमृतराव, या मंगलानें तुमच्या घराण्याची सेवा करतां करतां काळ्याचे पांढरे केले, त्याला तुमच्या ह्यातून सद्गति मिळण्या ऐवजीं तुम्हीच कसेहो या म्हाताऱ्याच्या मुखांत माती कालवून एकाएकीं निघून गेला ! देवा, परोपकारार्थ देह झिजवीत असतां हजारांचा पोशिंदा हिरावून काय मिळविलंस ? पण तुला तरी मी काय म्हणून दोष द्यावा ? दुर्गंधांतून अमृताचा प्याला तूं जेथल्या तेथें नेलास ! रध्या, हरामखोरा ! ज्यानें तुला आपला भाऊ मानून एवढ्या थोर पदाला चढविला, त्याच्याच स्त्रीबरोबर बदकर्म करायला धजलास काय ? आपला दुष्ट हेतू साधण्याकरतां मला इनामगांवीं दाठवून माझी व माझ्या अमृतरावाची ताटातूट केलीस. माईसाहेब, तुमची पण दानत कशीहो बिघडली ! सत्त्याच्या परमेश्वरा, संसार बागेंतील हीं कुजकीं फुलें नाहींशीं करण्याऐवजीं सुंदर फुलें हिरावून दुर्गंध पसरविण्यांत तुझा हेतू तरी काय असावा ? तें कोमल मनोहर—

( मनोहर रडत येतो. )

**मनो०**—मंगल, माझे बाबा कधीं हो येणार ?

**मंग०**—बाळ, तुझे बाबा फार दूर देशीं गेले आहेत. ते इतक्यांत कसे बरं परत येतील ?

**मनो०**—दूर देशीं गेलेला बाप लाडक्या मुलाकरतां नाहीं का लवकर येत ?

**मंग०**—लाडक्या मुलाकरितां लवकर येण्याची जरी त्याची इच्छा असली तरी—

K. V. Dalal



**मनो०**—नका, माझी कांहींतरी समजूत करून मला फसवूं नका. माझे बाबा लवकर यावेत असें कोणालाच कांहीं वाटत नाहीं ?

**मंग०**—वाटून काय उपयोग बाळ! आपल्या इच्छेप्रमाणें जर सर्व गोष्टी घडून येत्या, तर परमेश्वराची कोणाला आठवण झाली असती ? तूं अजून लहान आहेस. या गोष्टी कळायला तुला अजून अवकाश आहे.

**मनो०**—मी लहान असलों म्हणून मला मूर्ख समजलां काय ? मंगल, तुम्हाला पण माझी कशी ही दया येत नाहीं ?

**मंग०**—( त्यास जवळ घेऊन ) मग हा मंगल तरी कोणा करतां जिवंत राहिला असता ?

**मनो०**—तर मग माझे बाबा कुठें गेले आहेत तें का खरं सांगत नाहीं !

**मंग०**—तुझे बाबा ज्या दूर देशीं गेले आहेत, त्या देशाची तुला कल्पनाहि करतां येणार नाहीं म्हणून सांगतों कीं, कांहीं दिवस धीर धर म्हणजे आपोआप सर्व कांहीं कळेल.

**मनो०**—माझे बाबा मला नेहमीं देवाच्या गोष्टी सांगत असत. देवाजवळ गेलेलीं माणसं पुनः परत येतात काहो !

**मंग०**—त्या पुण्यस्थलीं गेलेलीं माणसं पुनः या नर्कवासांत कशाला येतील ? पण तुझे बाबा–

**मनो०**—या नरकांतून मुक्त झाले असेंच ना ? मंगल ! मंगल ! माझे बाबा मला सोडून गेले हो ?

**मंग०**—नाहींरे माझ्या लाडक्या, असा रडूं नकोस.

**मनो०**—मग आईसारखा नाचूं म्हणतां? पण मला माझ्या बाबावांचून नाचण्या-बागडण्याला काय आहे ! मंगल, मी पोरका झालों हो ! पोरकीं मुलें बापाच्या मागें जिवंत रहाण्यापेक्षां तीं आपल्या बापाजवळ गेलेलीं बरीं नाहींतका ?

**मंग०**—मग या सृष्टीचे व्यापार कसे चालतील बाळ ! झाड झडून जाण्यापूर्वी परमेश्वर आधीं त्याच्या बीजाची व्यवस्था करतो. तुझ्या उदार बापानें परोपकाराचा मळा लावला आणि त्याच्या मशागतीचा भार तुझ्या शिरावर टाकून तो विश्रांति घ्यायला गेला. मग बापाचं सत्कार्य अपुरतं टाकून त्याच्याकडे जाणाऱ्या भ्याड मुलाला कोणता बाप जवळ करील !

**मनो०**—माझे बाबा जाऊन पुरते दहा दिवस झाले नाहींत; माझ्या रडण्याचा पहिला हुंदकाहि जिरला नाहीं; तोंच आईनं मला दूर दूर करावं ना! पोरक्या मुलावर कोणीच कांहो माया करीत नाहीं !

**मंग०**—पोरक्या मुलांवर परमेश्वराची माया असते म्हणूनच तीं स्वतःच्या पायावर उभीं राहून थोर पदाला चढतात. आमची स्वार्थी माया असून नसून सारखीच बाळ !

**मनो०**—पोरक्या मुलाचं दुःख तुम्हाला कसं कळावं !

**मंग०**—वडील माणसं सांगतात, त्यावर लहान मुलांनीं विश्वास ठेवावा म्हणजे परिणाम गोड होतो, आईबाप, भाऊबंद कोणी कोणाच्या जन्माला पुरत नसतो. ध्रुव सात वर्षांचाच होता पण स्वतःच्या पायावर केवढ्या वरं थोर पदाला गेला ?

**मनो०**—पण तो माझ्यासारखा पोरका नव्हता.

**मंग०**—पोरक्या मुलांचीच परमेश्वराला अधिक काळजी असते. बाळ, जगांत जे जे थोर पुरुष निपजतात, त्यांपैकीं बहुतेक पोरके, अनाथ व गरीब स्थितींतलेच असतात—पण हा पहा रघुनाथरावाचा शब्द ऐकूं येत आहे.

**मनो०**—(त्वेषानें) काय, या अचरट खिदळण्याला तुम्हीं शब्द समजता ? चला, मंगल दुसरीकडे चला. माझ्याच्यानें हें ऐकवत नाहीं.

[ जातात. ]

---

## प्रवेश २ रा.

### स्थळ—बगीचा.

( अमृतराव वेशांतरानें येतो. )

**अमृत०**—काय हा विलक्षण कर्मखेळ ! त्या संन्याशानें जर माझं मन संशयी केलं नसतं, तर हा अस्सा धांवत जाऊन सर्वांना वेड लावलं असतं. पण त्याची आज्ञा उल्लंघन करण्याचं मला धैर्यच होत नाहीं—अरेरे ! या वेळीं माझी मालती दुःखांत चूर होऊन धाय धाय करीत पडली असेल. माझ्या

करतां रडून रडून तिचं मुखकमल म्लान झालं असेल. तिच्या नाजुक शरीरांत उभे रहाण्याचीहि शक्ति उरली नसेल. माझा मनोहर, माझा रघू— ( पडद्याकडे पाहून ) पण हा कोण ? तोच नव्हे का ? पण त्याच्या हातांत कमलाच्या देठांसारखा नाजुक हात कोणाचा ? कोण माझी मालती ? होय. तीच ! तो पहा तिनें आपल्या नाजुक शरीराचा तोल रघुनाथाच्या अंगावर टाकला—तोहि तिला जवळ ओढूं लागला—माझ्या मतीला भ्रम तर पडला नाहीं ना—छे, मला वाटतं माझ्या दुःखानं माझी मालती वेडी झाली असावी—तिला देहाचं भान उरलं नसावं. क्षणभर आराम वाटावा म्हणून माझा मित्र तिला बागेंत घेऊन येत असावा—वहिणीनें भावाच्या खांद्यावर मान टाकली किंवा हातांत हात दिला तर त्या दोन पवित्र आत्म्यांकडे कुत्सित दृष्टीनें का पहावं ?— जगांत सर्वांचीच अंतःकरणं पापानें भरलीं आहेत काय ?— पण हें काय ? —गळ्यांत गळा, मुखाशीं मुख, ओष्ठाओष्ठांचें मीलन—काय मी हें पहातों ? ज्यांच्या भेटी करतां जीव टाकीत धांवत आलों, तीच का ही माझ्या कलिजाचीं चित्रें ! छे, पहावत नाहीं—लाथेच्या एका ठोकरीसरशीं जेथल्या तेथें नाहींशीं करून टाकतों !— पण थांब—हृदया ! असा बेहोश होऊं नकोस—संन्याशाची सूचना विसरूं नकोस—बदकर्मांचा धिक्कार करणारे पुरुष तुझी ही शिथिलता पाहून काय वाटतील तीं दूषणें देवोत. पापाचा मोबदला हृदय छिनून छिनून विवेकानेंच घेतला पाहिजे. पायांनों, मागें परता; हृदया, पाषाणाहूनहि पाषाण हो; नेत्रांनों, नरकाचा देखावा पहाण्याकरतां असेच ताठ रहा. ( बाजूला उभा रहातो. मालती व अमृतराव येतात. )

**रघु०**—मालती—मालती—मालती !

**माल०**—काय म्हणतां रघुनाथराव ?

**रघु०**—माझ्या हृदया, पुनः खिन्न का ?

**माल०**—चोर, रात्रीच्या गाढ अंधःकारांत मानेवर सुरी ठेऊन पळून जातो म्हणून परमेश्वराची दृष्टि त्याला चुकवितां येते का ? ज्यानीं तुम्हांला जिवाभावाचा गडी म्हणून हातीं धरलं होतं, त्यांचीच मी धर्मपत्नी ना ? मग त्यांना मरून अजून दहा दिवसहि झाले नाहींत, तेव्हां मनलज्जा तरी नको का बाळगायला ?

**अमृत०**—( एकीकडे ) कपटी–हडळ !

**रघु०**—कसली मनलज्जा ! लौकिक विवाह म्हणजे कांहीं प्रेम नव्हे. बाजारांत विक्रीकरतां मांडलेल्या भावल्या जशा वाटेल त्याला विकत घेतां येतात, तशी जबरी जुल्मानें अगर पैशानें ही लग्नरुढी वाटेल त्या स्त्रीला पशुसारखी गुलामगिरीच्या दाव्यांत अडकविते. पण प्रेमाच्या गांठीं पूर्वार्जित ऋणानुबंधनानींच घडत असतात.

**माल०**—पण ते आपणास मित्र समजत होते.

**रघु०**—असेल–काय वाटेल तें समजायला ज्याचा तो पूर्ण मुखत्यार असतो म्हणून दुसऱ्यानें असल्या फुसक्या नात्यागोत्याला भुरळून दैवघटनेचा काय म्हणून उपक्रम करावा ? ईश्वरीकृपेनें अदृष्टांत योजिलेली सुंदर कलिका हातीं आली असतां ती दूर झुगारण्या इतका कोण मूर्ख असेल ? मालती, ज्याला या जगांत चार दिवस सुखानें काढायचे असतील, त्यानें स्वतःच्या सुखापुढें प्रत्यक्ष बापालाहि ओळख देतां कामा नये. मी तर स्वार्थापुढें स्वतःलाहि ओळखत नाहीं.

**अमृत०**—( एकीकडे ) अरे काळसर्पा, तुझा फुत्कार जर मला किंचित् ऐकूं आला असता तर त्याच वेळीं तुझं मुंडकं जेथल्या तेथें ठेंचून जगांतलं एक पाप नाहींसं केलं असतं. पण अंधविश्वासाचा हाच **परिणाम** !

**रघु०**—मालती, ही मधुमालती पाहिलीस का किती पुष्पवती झाली आहे ? पण आपल्या प्रियकरापासून दूर असल्यामुळें शून्य भासत आहे. पण तीच ती रानवेल पहा वृक्षाच्या बाहुपाशांत ( तिला हृदयाशीं धरून ) अशी गुरफटल्यामुळें किती मनोहर दिसत आहे ?–

**माल०**—पण त्या वृक्षाचे विषारी कांटे पाहिलेत ना तिला कसे बोंचत आहेत ते.

**१४ पद** ( तुमिसंग लागि. ) चाल.

**अशुभचि भासे नयनाला । विहरता ही वेला ॥ धृ० ॥**
**तळमळ देहीं । नाहीं शांति तिळभरी अनुसरता ती**
**दुरिताला ॥ १ ॥**

**रघु०**—हा पाप-पुण्याचा बागुलबोवा म्हणजे कोत्या मनाचा निव्वळ खेळ होय. जी गोष्ट एखाद्याला पाप वाटते तींतच दुसऱ्याचा स्वर्ग असतो. मालती, हें पाप-

पुण्याचं जाळं इतक्या गुंतागुंतीचं आहे कीं, शाहाण्यानें तें सोडविण्याच्या मुळीं भरीसच पडूं नये.

**अमृत०**—( एकीकडे ) जगा, ही पापपुण्याची व्याख्या ऐक व सावध हो ! नाहिंपेक्षां तुझ्याहि भोळेपणाचा **हाच परिणाम** !

**माल०**—रघुनाथराव, आपल्या गुप्त-प्रेमाचा त्यांना किंचितहि संशय न येतां इतका दीर्घकाळ निर्विघ्नपणें पार पडलाहीं. परमेश्वराची कृपाच म्हणायची! नाहींपेक्षां केवढा अनर्थ ओढवता !

**रघु०**—तितका मी दुधखुळा नव्हतों. त्याच्यावर तसाच शह बसविला होता. मालती, कपटाच्या मोहिनीनें जिकडे राष्ट्रांचीं राष्ट्रें पालथीं पडतात, तिकडे अमृतरावासारख्या कच्च्या दिलाची ती काय कथा ?

**माल०**—एकूण कपटानेंच तट फोडलात म्हणायचा ?

**रघु०**—असले मनोहर किल्ले दृष्टीस पडल्यावर त्याचे तट फोडायला परमेश्वरहि कपटाचा बंदा गुलाम बनेल. मालती, तुझं हें प्रेम असंच कायम राहील ना ? माझं आयुष्य क्लेशमय तर करणार नाहींस ना ?

**माल०**—परमेश्वर मला काय शिक्षा करणार असेल ती करो. होऊं नये तें घडलं खरं ! पण आतां तुमच्यावांचून तरी मला कोणाचा आधार आहे ?

१५ **पद.** ( मारे डेरे आवो. ) चाल.

**आसरा कृपेचा । मानुनी मजला जाया द्यावा ॥ ध्रु० ॥**
**सतत हेचि पद पतिसे सेवुनी । निराधार निशिदिनीं**
**वाहिन काया ॥ पाया ॥ १ ॥**

**अमृत०**—( एकीकडे )–हृदया, स्थिर रहा, स्थिर रहा, संन्याशाची सूचना विसरूं नकोस.

**रघु०**—मालती , स्नेहधर्माचीं बंधनें तोडून जो मी तुझ्या प्रेमपाशांत गुरफटला गेलों, तें माझं प्रेम जर कामुक असतं, तर मत्सराग्नीच्या वणव्यांत केव्हांच जळून खाक झालं असतं ! पण माझं प्रेम तुझ्या बाह्यसौंदर्यावर नसून आत्म्याच्या दिव्यतेजावर आहे म्हणून तें अझून निश्चल राहिलं आहे.

**माल०**—हें मला कळत का नाहीं पण—

**रघु०**—पण काय, मीच तुला पुनः पुनः सांगतों कीं, माझं हृदय भग्न करूं नकोस.

**माल०**—माझ्या प्रेमाची जर आपल्याला शंका असेल तर अंतर्यामी वास करणाऱ्या प्रेमरूपी नारायणाला साक्ष ठेऊन पुनः वचन देतें-( वचन देण्याकरतां हात उचलते, तों तो गळून पडतो. ) हात गळून का पडला ! रघुनाथराव, हा अपशकूनच नव्हे का ?

**रघु०**—छत् , शकुनादिक कल्पना म्हणजे दुबळ्या मनाचा पोकळ भ्रम ! मालती प्राणोत्क्रमणाच्यावेळीं त्याच्या हातावर हात ठेवतांना माझाहि हात असाच गळून पडला होता पण त्यांत काय—

**अमृत०**—( एकीकडे ) नीचा, पापी मन कोणत्याहि कार्याला धीरानें सरसावत नसतं !

**माल०**—रघुनाथराव, ते जिवंत होते त्यावेळीं आपण सर्व दिवस जरी एकांतांत बसत होतों तरी तें खपत होतं; पण आतां मी विधवा असून तरुण आहे. जनदृष्टीला तुम्ही परके आहांत. तेव्हां लोकनिंदेला जपलं पाहिजे.

**रघु०**—लोकांच्या निंदास्तुतिकडे पहाणाराला या जगांत एक क्षणहि जिवंत रहातां येणार नाहीं. लोक काय जसा स्वर निघेल तशी री ओढणार आणि म्हणूनच सांगतों कीं, आपण पुनर्विवाह लावून टाकूंया म्हणजे लोकांचीं तोंडं आपोआप आंवळलीं जातील. काळाचे एक दोन फेरे निघून गेले कीं, हेच लोक पुनः आपली पाठ थोपटूं लागतील.

**माल०**—नाहीं, मला पुनर्विवाह लावतां येत नाहीं. मला मुलगा आहे.

**रघु०**—आहे, मुलगा आहे ( स्वगत ) मार्गांत हा एक जबरदस्त कांटा आहे. पण तो उपटून काढण्याचं हत्यारहि माझ्याजवळ तयार आहे.

**अमृत०**—( एकीकडे. ) राक्षसा, माझ्या मनोहराच्या नांवाबरोबर तुझ्या चेहऱ्यावर उमटलेला खूनशी विचार पार पाडण्या इतका आतां मात्र हा अमृतराव गाफील उरला नाहीं !

**माल०**—रघुनाथराव, मनोहर जन्मास येईपर्यंत मी स्फटिका इतकीच शुद्ध होतें पण पुढें तुमच्या नादानें जी मी भ्रष्ट झालें, ती त्यांच्यांत कांहीं दुर्गुण होते किंवा तुम्ही त्यांच्याहून सुंदर होता म्हणून झालें नाहीं. तर माझी वासनाच हलकी!

**रघु०**—पण आजचा हा दिवस अशा दुःखांतच घालविणार काय ?

**माल०**—आजचाच काय, आतां सर्व जन्म तेंच माझ्या कपाळीं आलं आहे! रघुनाथराव, खूनी मनुष्य समुद्राच्या तळीं जरी दडून बसला तरी त्याच्या मनाला शांति मिळते का ? त्यांना मरून पुरते दहा दिवसहि झाले नाहींत. त्यांची छायाहि माझ्या दृष्टिसमोरून अझून किंचित हलली नाहीं, तेव्हां माझं मन कसं प्रसन्न रहावं ? –ऐकिलं आहे कीं, मृताची जर एखाद्या वस्तूवर इच्छा राहिली, तर ती पिशाच्च रूपानें त्या वस्तुसभोंवार घिरट्या घालीत असते. त्यांचाहि आत्मा या वेळीं, याच बागेंत–( भीतीनें थरथर कांपू लागते. रघुनाथ तिला हृदयाजवळ धरतो. )

**अमृत०**—( एकीकडे ) कर्माचं प्रायश्चित्त द्यायला तुझ्या समोर आहे!

**रघु**—मालती, त्याच्या आठवणीनं तुझं मन भयभीत झालं आहे. चल, थोडी विश्रांति घे.

( दोघे जातात. )

**अमृत०**—जा–पापाचा घडा पूर्ण भरण्याकरतां असेंच नरकांत लोळत रहा! तुमच्या पापी हृदयाच्या बदसूर तारा नानापरीनें छेडून छेडून तुम्हाला तुमच्या कर्माचं प्रायश्चित्त देईन. हे जगाच्या सूत्रधारा, तुझ्या सुंदर चित्रपटाला लांछन आणणारीं असलीं भेसूर चित्रें रंगविण्यांत तुझी कुशलता तरी कोणती ? दुर्देवी अमृतरावा, तुझ्या चरित्राचा पूर्वार्ध संपला. उत्तरार्धांत शिक्षेचा दंड हातीं धरून, जगाला अनीतीचा परिणाम दाखीव. सरस्वती, धर्मभगिनी! हा अमृतराव आतां तुझ्याच पवित्र सांवलीचा आश्रय धरणार. स्त्रीच्या दिखावू विनयाल भुरळून तिच्यावर अंधविश्वास टाकणाऱ्या पुरुषांनो, माझी ही दुर्दशा पहा व डोळे उघडा. भोळ्या पुरुषांनो, एखाद्याला आपला मित्र म्हणवून त्याच्यावर विश्वास टाकण्यापूर्वी त्याची कसून कसून परिक्षा करा, नाहिंपेक्षां तुमच्याहि कपाळीं **हाच परिणाम!**

( पडदा पडतो. )

## प्रवेश तिसरा.

**स्थल:**—इनामदाराच्या चुलत्याच्या वाड्याबाहेरील जागा.

( नं. २ इनामदार येतो. )

**२ इना०**—सारखी खानेसुमारी करून चुलत्याचा वाडा सांपडला ! पण हें काय ? इकडे तर मनुष्याची सांवलीहि दिसत नाहीं. त्या टारगटांनीं मला बनविलं तर नाहीं ना ? हो, या पिसाट लोकांचा कांहीं भरंवसा देतां येत नाहीं. आपण आपलं कांहीं वेळ इकडेच थांबावं. कोणी बाहेर आल्यावर नीट चवकशी करून नंतर आंत प्रवेश करावा. हो काय नेम, बरं तर बरं नाहिंपेक्षां साठमारीचा प्रसंग यायचा. श्रीहरी ! ( एका बाजूला बसतो. दुसऱ्या बाजूनें रेणुका येते. )

**रेणु०**—( एकीकडे ) काय बाई, आज किती दिवस झाले, यांचा म्हणून कांहीं पत्ता नाहीं. इनाम गांवीं अजून करताहेत तरी काय ? वाड्याकडे तरी जाऊन येऊं का—( इनामदारास पाहून ) पण हे कोण ? ( जवळ जाऊन ) इश्श ! असं काय तें बसायचं ?

**२ इना०**—म्हणजे ? आमच्या बैठकीवर हा आणखी कोण श्रीहरी आला ?

**रेणु०**—बाई, बाई, बाई, बाई ! आज हें आहे तरी काय ? सोन्याची कडी न् आंगठ्या अन् काय न काय ! एवढं हातभर सोनं आणलंत तरी कोठून ? खरे ग बाई माझे शूरबाजी, लाथ मारतील तिकडे पाणी काढतील !

**२ इना०**—म्हणजे, इकडे लाथांचा पाहुणचार मिळणार कीं काय ? श्रीहरी !

**रेणु०**—पण असं बावरल्यासारखं काय पहायचं तें ? मी आपणास ओळखणार नाहीं असं का आपल्याला वाटलं होतं ? पण मी कसली ? काळोखांत देखील ओळखीन कीं, आमचेच !

**२ इना०**—( तिला दूर करून ) अरेच्चा, श्रीहरी, श्रीहरी, श्रीहरी !

**रेणु०**—जा गडे, मेली थट्टा थट्टा ती किती करायची ! कायग बाई कडक ऊन ? असल्या आगींतून यायला एवढी कसली घाई लागली होती ? कसापण चेहरा अगदीं खरबुजी झाला आहे आणि कपाळावरनं घामाचे ओहोळ पण किती वाहत आहेत—

(पदरानें पुसूं लागते, तो तिला दूर ढकलतो.) चला, घरांत चला. पाणी देतें, हातपाय धुवा; इतक्यांत ऊन ऊन सांजा करते, दोन घांस खा ह्मणजे बरं वाटेल.

**२ इना०**—जरा दुरून बोलायची मेहरबानी होईल का ?

**रेणु०**—इश्श !

**२ इना०**—अहो, तुमच्या मनांत आहे तरी काय ?

**रेणु०**—( थट्टेनें ) मनांत होय ? जा गडे, पुरे आतां हें सोंग. पुनः किनई कध्धीं कध्धीं म्हणून आपलं मन दुखविणार नाहीं. ( त्याच्या सलकड्यांना हात लावून ) काय पण सोनं पिंवळं जर्द आहे. हात नाहीं का दुखत ? मी चढविते बापडी एकदोन हातांत-( काढूं लागते. )

**२ इना०**—अहो, श्रीहरी हा वेड्यांचा दवाखाना आहे कीं, ठगांचा अड्डा आहे ?

**रेणु०**—प्राणपति.

**२ इना०**—( मोठ्यानें ) श्रीहरी !

**रेणु०**—हा कोठला श्रीहरी ?

**२ इना०**—अरेच्चा ! दुरून बोलना.

**रेणु०**—अहो, पदर पसरतें, नाक घांसतें, पाया पडतें. अपराध पोटीं घालून क्षमा करा. असं काय रागवायचं तें ?

**२ इना०**—बायको आहे कीं, बायकोचं सोंग आहे ?

**रेणु०**—पायाची दासी आहे.

**२ इना०**—छे बुवा, या बायका फार निलाजऱ्या दिसतात.

**रेणु०**—पतीपुढें कसली आली आहे मेली लाज ?

**२ इना०**—बाईसाहेब, आपला पति कोण ?

**रेणु०**—कोण म्हणजे, जा गडे, आज मनांत योजलं आहे तरी काय ?

**२ इना०**—अहो तुमचा पति कोण, गळीं कोणाच्या लागतं, अंगाला काय बिलगतां, नाक काय मुरडतां, मुरका काय मारतां, आहे काय आणि नाहीं काय. श्रीहरी, श्रीहरी, श्रीहरी !

**रेणु०**—छे बाई, आतां बोलूं तरी काय ?

**२ इना०**—श्रीहरी !

रेणु०—आला मेला पुनः श्रीहरी.

२ इना०—वेडीच दिसते. पुरे झाली चुलत्याची भेट ( जाऊं लागतो, ती याला अडविते. )

रेणु०—हें काय गडे असं ?

१ इना०—भारीच बेशरम !

रेणु०—घरांत चला परत आतां.

१ इना०—श्रीहरी, श्रीहरी, श्रीहरी !

रेणु०—अरे देवा, लक्षण कांहीं बरं दिसत नाहीं. आतां हांक तरी कोणाला मारूं ? धांवा हो धांवा, कोणी तरी इकडे लवकर धांवा.

( एक गृहस्थ धांवत येतो. )

गृह०—काकू, काकू, काय झालं ?

रेणु०—इकडे वेड लागलं हो वेड !

गृह०—इनामदार, असे टकमक काय पहातां ?

२ इना०—हे लोक आहेत तरी कोण ?

रेणु०—ऐकलं का, म्हणते आंत चला. अंथरूण पसरतें. थोडं अंग टाका डोकीला तेल चोळतें म्हणजे मेंदू थंड होईल.

२ इना०—ही लांब मला भाजून खाणार कीं, कच्चा खाणार ?

गृह०—इनामदार, हे काय वेडेचार मांडले आहांत ? जा, थोडी झोंप घ्या म्हणजे डोकं निवळेल.

२ इना०—अहो, पण इकडे कोणाचं खवळलं आहे ? श्रीहरी ! तुम्ही माणसं आहांत कीं, भूतं अहांत ? ही वाई तर शुद्ध डांकीण दिसते. ( रेणुका त्यास ओढूं लागते. ) अंगाला विलगूं नको म्हणतो ना ?-श्रीहरी ! कोण कोडगी-श्रीहरी श्रीहरी, श्रीहरी !

रेणु०—हा पहा आला पुनः श्रीहरी.

गृह०—काकू, हा ओळखलं का श्रीहरी ! अहो हा श्रीहरीचा उन्माद आहे.

रेणु०—अरे देवा आतां करूं तरी काय, बोलावूं तरी कुणाला ? फुटलं हो माझं कपाळ फुटलं !

**गृह०**—इनामदार असे पहातां काय ? सांगा पाहूं मी कोण तो ? मोजा वरं माझ्या हाताचीं बोटें ! हं–दंगामस्ती कराल तर श्रीमुखांत भडकवून घ्याल.

**रेणु०**—नका हो नका पायां पडतें. असलं कांहीं भलतं सलतं करूं नका. चला आंत चला, मला भय वाटतं.

**१ इना०**—श्रीहरी, जळो तें प्रेम !

**गृह०**—हं, काकू, ऐका.

**रेणु०**—अहो आंधीं यांना धरा. हें पहा पळूं लागले.

**गृह०**—इनामदार, गडबड बंद करा. काकू ओरडत काय राहिलांत ? या अशा गच्च धरून रहा. एकं पाऊल हालूं देऊं नका. आत्तां उन्माद उतरतों. ( आंत जातो. )

**२ इना०**—आई जगदंबे ! साष्टांग प्रणिपात घालतों. सोड मला.

**रेणु०**—थांबा, काय चालविलेलें आहे कोण जाणें !

( गृहस्थ हातांत दोर घेऊन येतो. )

**गृह०**—हं इनामदार, बोला कीं, आंवळूं मुसक्या.

**२ इना०**—श्रीहरी ! ( पळून जातो. )

**रेणु०**—अहो ! धांवा हो धांवा–

**गृह०**—काकू, तुह्मी जा वाड्यांत. मी आतां इनामदारांना घेऊन येतों.

( जातात. )

---

## प्रवेश चौथा.

### स्थल:—सरस्वतीचें घर.

( अमृतराव व सरस्वती येतात. )

**अमृत०**—सरस्वती !

**सरस्व०**—तोच, तोच प्रेमळ शब्द !

**अमृत०**—सरस्वती, मी बोलूं लागलों म्हणजे तूं हें असं काय म्हणत असतेस ? माझ्या वर्तनांत तर कांहीं चुकत नाहीं ना ? सांग–संकोच धरूं नकोस. मुली-

सारखी तूं माझी कळकळ वाळगावीस आणि माझ्या हातून तिचा उलट मोबदला मिळावा म्हणजे उपकाराची अपकारानेंच फेड करण्यासारखी नव्हे का ?

**सरस्व०**—नाहीं महाराज. आपण बोलूं लागला म्हणजे ज्या उदार महात्म्यानें या माझ्या घरांत देह ठेवला त्याची आठवण होऊन हृदय भरून येतं. महाराज, आपली वाणी, आपली दृष्टि, आपली वृत्ति अगदीं त्यांच्यासारखीच भासते.

**अमृत०**—माणसासारखीं माणसें पुष्कळ असतात म्हणून एकाचे गुण दुसऱ्यांत कोठून सांपडणार ?

**सरस्व०**—मला चुडेदान देणाऱ्या त्या थोर पुरुषाच्या आत्म्याला शांति मिळावी म्हणून तुळशी मायीला एकशेंएक प्रदक्षणा घालायला मी एक दिवसहि चुकत नसतें. महाराज, भर तारुण्य, विपुल संपत्ति, निर्मळ कीर्ति सर्व कांहीं अनुकूल असतां परोपकारार्थ त्यांनीं आपला देह ठेवला. सुंदर फुलावर देवहि टपून बसलेला असतो ना ?

**अमृत०**—यांत सुंदर काय कीं, कुरूप काय ? ज्यानें सर्व जातीचीं फुलें निर्माण केलीं, त्याच्या ठिकाणीं भेदाभेद नाहीं. सरस्वती, या क्षणभंगुर जीवितांत सुखाची अपेक्षा करणेंच मुळीं वेडेपणा आहे.

१६ **पद** ( सखि शामसुंदर. ) चाल.

**सुख जाण चंचल मान अखिल संसार । नकळत विधि**
**लिखित गहन परिहार ॥ धृ० ॥ विषय विभव खरतम ।**
**बुध गणिती गरल सम । सतत असती अविकार ॥ १ ॥**

**सरस्व०**—महाराज, आपण मला आपली मुलगी समजता ना ? मग ज्या प्रेमळ बापानें मुलीची कळकळ बाळगावी, त्या बापाच्या जन्मवृत्ताला तिनं पारखं असावं हें त्या मुलीचं दुर्भाग्यच नव्हे काय ?

**अमृत०**—यांत कसलं भाग्य आणि दुर्भाग्य ! कुठें तरी जन्माला यावं, चार दिवस **कष्ट** करून पोटाला खावं—आणि शेवटीं मातींत मिसळून जावं, हाच ज्यांचा जीवनक्रम त्याचं वृत्त तें कसलं ? खरं पहातां, तुझी माझी आजन्म ओळख नाहीं. मी कोणी लुटारू किंवा दरोडेखोर याचीहि तूं चवकशी केली नाहींस.

K. V. Datar



वाटेंतील एक प्रवासी चार घटकेकरतां दारीं आश्रय मागतो काय व तूं मला आपला पिता मानतेस काय, सारंच विचित्र !

**सरस्व०**—महाराज, ज्या दिवशीं आपले पाय या घराला लागले त्याच-वेळीं माझा तो सौभाग्यदाता धर्मबंधू घरीं आला आहे कीं, काय असा भास होऊन मन आनंदीत होत आहे.

१७ पद ( किती वरंगजन. ) चाल.

**शुभ पदा बघुनि या सुख होतें । बंधुसखा जणुं येइ गृहातें ॥ ध्रु० ॥ ईश जगीं या पतितोद्धारा । सज्जनवेशें धरि अवतारा । दावि स्वभावें सत्यपथातें ॥ १ ॥**

**अमृत०**—जगाच्या पाठीवर कुठेंतरी भटकणारा मी एक प्रवासी पण तूं कांहीं विलक्षणच माया लाविली आहेस. परमेश्वर, माझ्या हातून तुझ्या उपकाराची किंचिततरी फेड करो म्हणजे झालं !

**सरस्व०**—नाहीं–आपल्याकडून मी कशाचीहि अपेक्षा करीत नाहीं. दुस-ऱ्याच्या उपयोगी पडणें हाच खरा मोक्ष असा आपल्या थोर उदाहरणानें माझ्या त्या मृतबंधूनें धडा घालून दिल्या दिवसापासून ही सरस्वती आपल्या कर्तव्याला एक क्षणहि विसंबत नसते.

**अमृत०**—आणि म्हणूनच अशा सुशील मुलीच्या सहवासांत आयुष्याचे उर-लेले चार दिवस सुखासमाधानानें घालवावेत असा मी विचार ठरविला आहे.

**सरस्व०**—अहा, मग आम्हा उभयतांना किती तरी आनंद होईल. महाराज, तिकडील प्रकृति अझून नीट सुधारली नसल्यामुळें तिकडल्या स्वभावाचा आप-ल्याला अनुभव नाहीं. आपला हा विचार ऐकून त्यांना मोठं समाधान वाटेल.

**अमृत०**—सुशील मनाचीं माणसं दुसऱ्याच्या सुखानेंच सुखी होत असतात.

**सरस्व०**—महाराज, माझ्या हातून कांहीं अपराध घडल्यास मला नकळत निघून तर जाणार नाहीं ना ?

**अमृत०**—असल्या सुशील मुलीचा सहवास टाकून जगांत पवित्रता तरी कुठें आढळणार ?

१८ पद ( पियासंग खेलोरी. ) चाल.

**धन्य तोचि गमला । सतिसहवासें कठिण घोर**
**जनपथ हा तरला, स्वार्थभाव सहजीं हरला ॥ धृ० ॥**
**साधोनि प्रपंच बरवा, स्वपदा अनुसरला सुधामया**
**जगतीं स्वात्मसुखा जिंकाया विनटला ॥ १ ॥**

बरं पण तुझ्या मृतबंधूच्या मुलाविषयीं कांहीं सांगणार होतीस तें काय ?

**सरस्व०**—काल आपण बाहेर गेल्यावर, त्यांचा तो मुलगा आपल्या म्हाताऱ्या नोकरासह इकडे आला आणि ज्या जागेवर त्याच्या उदार बापानें आपला देह ठेवला, तीवर दुःखाश्रूंचा अभिषेक करून धाय धाय रडत परत गेला.

**अमृत०**—( श्वास टाकून ) बालपण कठीण आहे. पण हा गलबला कसला ?

**सरस्व०**—थांबा, मी पाहून येतें. ( जाते. )

**अमृत०**—भोळी विचारी. हा वृद्ध इतर कोणी नसून प्रत्यक्ष अमृतरावच आहे याची हिला काय कल्पना !

( सरस्वती, मनोहर व मंगल येतात. )

**सरस्व०**—( आनंदानें ) ऐकलंत का महाराज, माझ्या त्या मृतबंधूचे उपकार स्मरून विचारे गोरगरीब त्यांच्या या मुलाला कृतज्ञतेनें आशीर्वाद देत होते.

**अमृत०**—( स्वगत ) हृदया, तुझ्या जीविताचा अंकुर दुरूनच पहा.

**सरस्व०**—महाराज, चेहरा पाहिलात का किती प्रेमळ व उदार आहे तो ?

**मंग०**—बापाच्याच वळणावर गेला आहे.

**मनो०**—हे वृद्ध गृहस्थ कोण ?

**अमृत०**—बाळ, मला आपल्या बापासारखाच समज.

**मनो०**—माझ्या बाबासारखी तुमची वाणी ममताळू आहे खरी; पण ते तुमच्यासारखे म्हातारे नव्हते.

**मंग०**—मनोहर, वृद्ध माणसांना भलतं सलतं उत्तर देऊं नये.

**अमृत०**—छे, छे, बापाचा अभिमान असणें हा कांहीं मुलाचा दोष नव्हे. पण कायहो हा मुलगा असा निस्तेज का ? प्रकृति बरी नाहीं वाटतें ?



सरस्वती:-प्रेमळ व उदार आहे तो-     [ अं. २ पृ. ४८

स्वस्तिक वाचनालय,

**मंग०**—कसली प्रकृति विचारतां महाराज ? माझे धनीसाहेब आम्हाला सोडून गेल्या दिवसापासून हा मुलगा सारखा झुरणीस लागला आहे !

**अमृत०**—( मनोहराच्या पाठीवर हात फिरवीत स्वगत ) प्रारब्धा, काय तुझा हा विचित्र खेळ !

**मनो०**—वृद्धबाबा, तुम्ही माझ्या पाठीवर हात फिरवितांच मला बाबांची आठवण झाली हो ! त्यांचे हात असेच गोड लागत. माझे बाबा, मला कुठें हो भेटतील ?

**अमृत०**—तुझे बाबा—( गहिंवरतो. )

**मनो०**—( रडत ) तीच-तीच ही माझ्या बाबासारखी लाडकी हांक ! बाबा, बाबा-( त्याला मिठी मारतो. )

**मंग०**—नारायणा, हा प्रसंग पहाण्यापेक्षां डोळे का झांकत नाहींस !

**सरस्व०**—महाराज, आपणहि काय असे व्याकुळ झालांत ? या मुलाकडे पहाहो.

**अमृत०**—( स्वगत ) हृदयाचे घाव तुला कसे कळणार ! ( उघड ) मनोहर, रडूं नकोस बाळ, तुझे बाबा जरी दूर झाले आहेत तरी ते तुझ्या जवळच आहेत बरं.

**मनो०**—( गहिंवरून ) बाप नसलेल्या मुलाचं दुःख तुम्हाला कसं कळावं !

**अमृत०**—तें मला कळतं बरं बाळ. मनोहर, तुझ्या बापाला सुख व्हावं असं तुला वाटतं ना ?

**मनो०**—तें कसं बरं वाटणार नाहीं.

**अमृत०**—तर मग आजपासून बापाकरतां रडणार नाहीं असा निश्चय कर. नाहिंपेक्षां असाच जर मुळमुळूं रडत बसलास तर तुझ्या बाबाला दुःख होईल.

**मनो०**—मंगलहि मला असेंच सांगतात. पण मी तरी काय करूं ! पोरक्या मुलाच्या यातना दुसऱ्यांना कशा दिसाव्यात !

**अमृत०**—पण बापाच्या सुखाकरतां त्या विसरल्या पाहिजेत.

**सरस्व०**—ऐकलंस ना मनोहर, महाराज काय सांगतात तें ?

**अमृत०**—मंगलबुवा, आजपासून तुमचा मनोहर मुळींच रडणार नाहीं आणि तुम्ही देखील आतां माझ्यासारखे वृद्ध झाला आहांत तेव्हां या जगाच्या चंचल घडामोडीकडे लक्ष न देतां या मुलावर विशेष लक्ष देऊन रहा.

मंग०—महाराज, मला म्हाताऱ्याला या मुलाशिवाय आतां काय उरलं आहे. याच्या हातून तरी मला मूठमाती मिळो म्हणजे झालं !

अमृत०—परमेश्वराची काय इच्छा असेल ती खरी !

सरस्व०—मंगलबावा, या मुलाला रोज इकडे घेऊन याल काहो ? अमृतरावांच्या पुण्यायीनें तरी माझ्या भाग्याला थोडं बहुत यश आल्यास पहातें.

अमृत०—येतील वरं सरस्वती.

मंग०—वरं येतो महाराज. मुलगा अजून जेवला नाहीं.

सरस्व०—खरंच का ? मंगलबुवा, तर मग आधीं आंत चला. मुलाला थोडं खाऊं घालते नंतर जा.

अमृत०—जा मनोहर आनंदानें जा. ( सर्व जातात. ) परमेश्वरा, कुठें ही पावित्र्याची देवता आणि कुठें ती नरकांतील उनाडमैना ! सरस्वती, तूं कोण, कुणाची, चार दिवसाचा तुझा माझा सहवास पण थोर दिलाचीं माणसें आपल्या सहवासानें नरकालाहि स्वर्गरूप आणितात. साध्वी, तुम्हा सर्वांना एका क्षणांत मी हर्षानें वेड लावलं असतं पण हर्षातिरेकानें जर तुमच्या हातून हा अज्ञानवेष किंचित् बाहेर पडला तर त्या दोन दुरात्म्यांकरतां योजिलेला मार्ग मला निराळाच आंखावा लागेल; करतां कांहीं दिवस असाच धीर धरून या दुर्दैवी अमृतरावाला क्षमा करा. दुर्दैवी पुरुषानों, जगांतील सर्व ऐश्वर्यांत सद्गुणी स्त्रीच्या प्राप्तीलाच खरी पुण्यायी लागते.

१९ पद ( त्यजरे मना. ) चाल.

धारिरे मना सदा तूं ध्यानिं सुधा छंद । होसी पात्र
सतिसहवासा घेसि तरिच सुखकंद ॥ धृ० ॥
जरि दुर्भाग्यें तुजला । लाभे दुर्धर अबला । तोडि
त्वरित भवबंध ॥ १ ॥

( जातो. )

## प्रवेश पांचवा.

२७७ ७१२५

### स्थल—इनामदाराचें घर.

( नं. १ इनामदार येतो. )

१ इना०—तिला चुलत्याकडे पिटाळून या नाटक कंपनींत पुळ्खा झोडीत डुडबुडी म्यानेजरी करीत राहिलों आहे. आज वॉरफंडाकरतां स्पेशल खेळ आहे, तेव्हां कोणी पहाणार नाहीं, म्हणून हळूंच वाड्याकडे आलों व मिशीवर दहा वेळां कलप चढविला. पण काजळी धरेल तर शपथ ! या एका एका कलपांचा नमुना बघतां बघतां तोंड काळं व्हायची वेळ आली आहे. लोक तरी काय टारगट असतात हो, केस जरा कुठें रुपेरी चमकूं लागले कीं, म्हातारा म्हातारा म्हणूं लागतात. पण मी विचारतों, केसावर काय मोठंसं आहे. आजकालच्या पंचविशीच्या तरुणावर जर साठ वर्षाचा म्हातारा ताण करतो, तर दुष्यारंगावर काय आहे ? खरो-खर गुलागुलीत चेहऱ्याच्या प्रदर्शनाकरतां मिशीला फारकत देण्याची सुधारकी तऱ्हा फारच धूर्तपणाची ? पांढुरक्या केसावर काळ्या रोगणाचे थरचेथर बसविण्या-ऐवजीं साफ वोडंती केली कीं, तरुणचे तरुण व वयावर पांघरूण ! खारकी गालाला एखाद्या पोमेडचा गिलावा दिला कीं, पोंवळी ओठाचा तरणाबांड. पंच-विशी पाहून घ्या ! लोक म्हणतात इनामदार दिवसेंदिवस तुमच्या तारुण्याला बहर येत चालला आहे ! का येणार नाहीं ? तारुण्य तारुण्य म्हणजे असा काय मोठा बागुल-बोवा आहे ? पडीत घराला डागडुजी करून रंग चोपडला कीं, जसं तें नवं करकरीत बनतं, तसें वंगभस्मादिक मधुचूर्ण बडवीत तारुण्याचे चाळे करीत राहिलं कीं वाटले ती तरुणी—( मंजुळा येते. ) हं !

मंजु०—का निघायचं ना ?

१ इना०—( स्वगत ) कसा आहे काजळी प्रभाव !

मंजु०—चला गडे आतां लवकर. किती दिवस असं कोंडून रहायचं ? माझ्यानें धीर काढवत नाहीं.

१ इना०—( स्वगत ) आहे, इनामदार आहे. शेवटीं बायकाहि घराकडे धांवत येऊं लागल्या. पण ही आहे कोण ? घरची कीं, दारची ?

मंजु०—हें पहा, गा वाड्यांत आतां आपणाला पाणि घोटायलाहि रहायचं नाहीं. आत्ताच्या गाडीनें चला पाहूं कसें ?...

१ इना०—( स्वगत ) म्हणजे, आमच्या उचलबांगडीची तयारी आहे कीं, काय ?

मंजु०—असं काय तें ! बोलत कां नाहीं ? हें पहा मीं कांहीं ऐकायची नाहीं. हाताला धरून अश्शी फरफटत नेईन.

१ इना०—( स्वगत ) स्त्रीहृकाचा काल आहे, कांहीं वावगं नाहीं.

मंजु०—भारीच बाई मुखदुर्बळ. मी काय बडबडते तें तरी ऐकू येतं का ?

१ इना०—भलतंच, सालुंकीच्या मंजुळवाणीला कोणाचे कान लांब होणार नाहींत ? ( स्वगत ) आहे, इनामदार आहे !

मंजु०—मग हा सांवाचा अवतार सोडा गडे आतां आणि चला पाहूं मी सांगते तिकडे.

१ इना०—पण अशी घाई का, आतां आहेच ! पण जरा बसाल तर खऱ्या.

मंजु०—नकोग बाई ते बसणं ! चातकी सारखी वाट पाहून पाहून जीव नकोसा झाला !

१ इना०—( थट्टेनें ) अरेरे ! केवढा मी नष्ट, खष्ट पापी, चांडाळ—

मंजु०—चला बोलूं नका माझ्याशीं.

१ इना०—अरेवा, ही तर खराच प्रेमरस पाघळूं लागली. पण चोपरसाचा तर बेत नाहींना ?

मंजु०—छे बाई, असा अंत तरी किती पहाणार ? निघा म्हणतेना, कीं मी जाऊं आपली ? पण मग नाहीं हो ऐकायची.

१ इना०—( स्वगत ) हं, इनामदार पहाता काय—( पडद्याकडे पाहून ) अरे बापरे, अग पळ पळ, ती पहा तुझी माझी खानेसुमारी आली. छे, तुला लपवूं तरी कुठें, आसपास कचरापेटीहि दिसत नाहीं. पण ही आलीच. मागच्या दारानें पळ काढावा. ( पळून जातो. रेणुका येते. )

मंजु०—अहो असे पळता काय,—कोण ग बाई तूं ?

रेणु०—अस्सं ! तूंच का ती ?

मंजु०—होय मीच बरं ती. एवढी बारीकसी चवकशी ? पण हे का हिला भ्याले ?

रेणु०—काय मेली निलाजरी आहे. करून सवरून वर आणखी हात फिरवीत आहे.

मंजु०—मग तुला भिते कीं काय ! अशी पुरुषाच्या मागें लागायला मेले तुझी लाज कुठें गेली ?

रेणु०—( पदर खोंचीत ) थांब हं, चांगलीं खेटरं मोजून सांगते.

मंजु०—मग माझे हात कांहीं झडले नाहींत. चांगलीच आठवण देईन.

रेणु०--काय मेला न्याय आहे पहा, माझ्याच घरांत दिवसाढवळ्या धुडकूस घालून मलाच गोष्टी सांगू लागली आहे.

मंजु०—मग कांहीं कमी करीन की, काय ? झिंज्या धरून लाथेसरशी बाहेर काढीन.

रेणु०—मेले दुसऱ्याच्या नवऱ्याला चेटुक करणारी तूं आहेस तरी कोण कैकाडीण ?

मंजु०—आणि तूं ग कोण घिसाडीण ?

रेणु०—सांगू का कोण ती ?

मंजु०—सांग हं !

रेणु०—कोण मेली सातमुलखाची खुळी.

मंजु०—आतां का बसलीं दांतखिळी ?

रेणु०—भ्यालेच तुला.

मंजु०—न भिऊन सांगतेस कुणाला ?

रेणु०—अगदींच मेली निलाजरी.

मंजु०—म्हणून आलीस अशी दारीं.

रेणु०—म्हणे दुसऱ्याचं घर.

मंजु०—( तिचे कान धरून ) कुणाचं ग घर?

रेणु०—( तिचा बुचडा धरून ) माझं बरं माझं, राहील का आतां आठवण !

मंजु०—आधीं घराबाहेर होतेस कीं, देऊं आठवण.

रेणु०—तूं का मला घराबाहेर काढणार ?

**मंजु०**—मग काय कमी करणार ?

**रेणु०**—चांगली खेटरपूजा करून घेतल्यावांचून का तूं सुधी जाणार ?

**मंजु०**—आणि दोन लाथा खाल्यावांचून का तूं तोंड काळं करणार?

**रेणु०**—अस्सं का ?

**मंजु०**—होय का ? ( आंत जाते. एक मुलगा येतो. )

**मुल०**—अहो काकू, इनामदार रस्त्यांतून पळत काय सुटले आहेत. काय, झालं काय ?

**रेणु०**—खरंच का ?

( दोघे जातात. मंजुळा हातांत मुसळ घेऊन येते. )

**मंजु०**—ये अवदसे ये. नवऱ्याची चांगली भेट करविते. ( इकडे तिकडे पाहून ) केलंन् मेलीनं तोंड काळं. बाजारबसवी कोठली !

( एक गृहस्थ हातांत चाबूक घेऊन रागानें येतो. )

**गृह०**—इनामदार असा कीं, तिसमारखां असो चांगला सरळ करतों. विनाशकाले विपरीत बुद्धि.

**मंजु०**—अगबाई, हें कोण ?

**गृह०**—काय हो, इनामदार कुठं आहेत ? विनाशकाले विपरीत बुद्धि.

**मंजु०**—का बरं, काय काम आहे ?

**गृह०**—विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर द्या अधिक चवकशीचं काम नाहीं. विनाशकाले विपरीत बुद्धि.

**मंजु०**—म्हणजे ?

**गृह०**—तुमच्या पुढें मी कांहीं जबानी द्यायला आलों नाहीं, मला इनामदार पाहिजे, मला इनामदार पाहिजे, मला इनामदार पाहिजे. विनाशकाले विपरीत बुद्धि.

**मंजु०**—अगबाई असं काय त्यानीं कुणाचं घोडं मारलं ?

**गृह०**—घोडं मारलं असतं तरी पत्करतं पण हें मी कसं सहन करूं ? सूड, सूड, भयंकर सूड !

**मंजु०**—अहो पण काय तें नीट सांगाल कीं, थै थै नाचूं लागाल ?

**गृह०**—थै थै नाचायला पायांत चाळ बांधले नाहींत. हें पहा मी मोठा बाईट माणूस आहे. सात वर्षें तुरुंगांत होतों तरी कुणाचं फट् म्हणून घेतलं नाहीं.

१९०.७१२३.४४



**मंजु०**—अहो हात जोडतें. काय तें नीट सांगा.

**गृह०**—काय सांगूं, कसं सांगूं आणि किती सांगूं? सर्वांगाचा भडका उडाला आहे. कांहीं वयाची लाज? इनामदारी चांगली जिरवितों. बोला कुठें आहेत इनामदार?

**मंजु०**—छे बाई, तुम्हीतर मला भंडावूनच सोडलंत.

**गृह०**—विनाशकाले विपरीत बुद्धि.

**मंजु०**—यांच्यापुढें आतां काय डोकं फोडूं?

**गृह०**—डोकं फोडण्याचं काम नाहीं. विनाशकाले विपरीत बुद्धि त्याला तुम्हीतरी काय करणार! आमचीला भररस्त्यांत धक्का मारून पळून जातो काय? काय समजला आहे. या चाबकानें पाठ लाल करीन तेव्हांच सोडीन.

**मंजु०**—देवा, देवा, हे सांगतात तरी काय? अहो, नुकतेच ते इकडून गेले आणि त्यांचा स्वभाव नाहींहो तशांतला.

**गृह०**—त्यांच्या इनामदारीणच तुम्हीं. तुम्हाला तुमच्या डोळयांतलं मुसळ कसं दिसणार पण मी वेड्यासारखा तुमच्यापुढें व्याख्यान झोडीत काय बसलों. वाटेंतच गांठतों. जातो कुठे? विनाशकाले विपरीत बुद्धि. (जातो.)

**मंजु०**—देवा आतां करूं तरी काय? आज किती दिवस झाले हे आपले उभ्या उभ्या येतात अन् निघून जातात. यांनीं हें योजलं आहे तरी काय? आणि या वाड्यांत मला अशी कोंडून ठेवणार तरी किती दिवस!

(जाते.)

---

## प्रवेश सहावा.

### स्थल—दिवाणखाना.

(रघुनाथ व मालती.)

**माल०**—(आकाशाकडे पहात) तो पाहिलात का केवढा मोठा तारा पहातां पहातां गळून पडला! रघुनाथराव,आपल्या प्रभावळींत असतांना तो कितीतरी तेजस्वी होता पण तेथून निसटतांच तेजोहीन झाला.

**रघु०**—दुबळ्या मनाची अशीच स्थिति होत असते.

**माल०**—काय हीं दुबळ्या मनाचीं लक्षणें ! जीविताचा आधार सुटला म्हणजे अशीच नाहीं का स्थिति होत?

१० पद ( मिलजाना राम ) चाल.

**पति जातां कालगेहा। देहा सुखदा भासे वास न हा ॥ धृ० ॥ परम मंगल पतिपद पावन। कांता शुभदा नोहे पति० ॥ १ ॥**

**रघु०**—कांहींतरी विषय डोक्यांत घेऊन स्वतः बरोबर दुसऱ्याच्या आनंदाचा मात्र वरचेवर विरस करीत असतेस. असले हजारो तारे उगवले काय कीं, गळाले काय, दोन अंतःकरणाच्या जिवाभावाच्या मिळवणींत प्रत्यक्ष ईश्वरालाहि ढवळा-ढवळ करतां येत नाहीं.

**माल०**—नाहीं रघुनाथराव, ही जिवाभावाची मिळवणी एका ईश्वरीयोजनेनेंच घडत असते. पति मृत झाला असतां पुनः अंतःकरणाची जुळवणी करणें पाप नव्हे का ?

**रघु०**—यांत पापपुण्याचा काय संबंध ? घर बांधणारा आपल्या सुखसोयी-प्रमाणें जशी घराची रचना करून घेतो, त्याचप्रमाणें ही पापपुण्याची घोरपड रूढी प्रवर्तकांनीं समाजाच्या कपाळीं चिकटविली आहे. कायद्याच्या कलमाप्रमाणें पाप पुण्याची व्याख्या वेळोवेळीं बदललीच पाहिजे.

**माल०**—नाहीं, तसेंच जर असतं तर जगानें सतीचे गोडवे गायले नसते.

**रघु०**—गोडवे गायला काय खरचतं. शेंपाचशें पानाचीं एखादी अचरट कादं-बरी रेखाटणें आणि नसत्या गोष्टीचे गोडवे गाणें सारखंच आहे. मालती, पातिव्रत्य शरिरावर नसून मनावर आहे. स्पर्शास्पर्श म्हणजे भ्रष्टाकार या कल्पनेंत जर जग वांवरूं लागेल तर दिवसांतून छपन्न वेळां शरिराचे भाग छाटून काढावे लागतील.

**माल०**—नवलपरीचंच ऐकतें.

**रघु०**—डोळे झांकून चालणाराला सर्व नवलपरीचंच वाटतं. सारख्या पांच भावाबरोबर विलास करणारी द्रौपदी शास्त्रकारांनीं महापतिव्रता म्हणून डोकीवर नाचविली; मग आम्हाला तो कसला आला आहे भ्रष्टाकार ?

**माल०**--असेल बाई, पण माझी मात्र खुनी माणसासारखी स्थिति झाली आहे खरी!

**२१ पद ( दिलदिवाना. ) चाल.**

**कल्पना या अशुभ नाना करिति हृदया व्याकुला।**
**खिन्न भासे धरणि सारी कंप शरिरा दाटला ॥ धृ० ॥**
**अशनिं पानीं शयनिं भुवनीं भास पतिचा भीषणा।**
**करित हृदया गलितधैर्या काळ प्रतिसा पातला ॥ १ ॥**

**रघु०**--दुबळ्या मनाचीं माणसं स्वतः गुडघ्यांत माना खुपसून दुसऱ्याला अपशकून करीत असतात. मालती, तुझं मन जर इतकं दुबळं असेल तर येथूनच आपल्या सहवासाला अंतर देऊं या. माझ्यापासून तूं हजारों कोस जरी दूर असलीस तरी तूं सुखी आहेस, एवढ्या आनंदांत मी स्वताला मोठा भाग्याचा समजेन.

**माल०**--आपला सहवास सोडून जर मी सुखी होण्यासारखी असते तर पतिनिधनाबरोबरच निराळा मार्ग स्वीकारला असता. रघुनाथराव, सतीधर्म जरी माझ्या हातून पाळला गेला नाहीं, तर हाडींमासीं खिळलेली सतीधर्माची कल्पना कशी बरं एकाएकीं नाहींशी व्हावी?

**रघु०**--म्हणून एकानें दुसऱ्याच्या पापाचं प्रायश्चित्त भोगावं की, काय?

**माल०**--पण तुमच्या सुखाकरतां मी काय कमी करीत आहे? कोणत्याहि रीतीनें मला सुख होत नाहीं त्याला मी तरी काय करूं!

**रघु०**--काय करूं, कसं करूं असला फुसका मंत्र जपणारी गचाळ माणसं मला मुळींच खपत नाहींत. मालती, जनापवादाला दूर झुगारून राजरोषपणें प्रेमाची माळ गळीं अडकवायला जो मी छातीठोक तयार झालों, त्या माझ्या प्रेमाची चांगलीच कदर राखलीस म्हणायची?

**माल०**--असं काय तें रागवायचं!

**२२ पद ( जयमनमोहन ) चाल.**

**कुमुदिनी डोलत चंद्रविकासी। बघुनि शशीच्या हास्य मुखासी। परि बुडता तो विकल उदासी ॥ धृ० ॥**

**महापतित मी दीन अनाथा। कोप न व्हावा मजवरि आतां। करा सदय मन शमवुनि भ्रांता। होय तरी मग सहज विलासी ॥ १ ॥**

**रघु०**—अगदींच म्याड ! मालती, तुझ्या मनाची भीति दूर करण्यासारखा मी एक अवलिया गांठला आहे.

**माल०**—( आश्चर्यानें ) कोण अवलिया ?

**रघु०**—काल एक फकीर दृष्टीस पडला म्हणून सहज त्याच्याकडे पाहूं लागलों तों काय चमत्कार ! त्यानें मला जवळ बोलाविलें व माझ्याकडे आपली भेदक दृष्टि लावून एक दोन गोष्टी तंतोतंत सांगितल्या.

**माल०**—अग बाई, असा तो आहे तरी कोण ?

**रघु०**—त्याला हकीमसाहेब म्हणतात. मंत्र, तंत्र, सामुद्रिक इत्यादि कलेंत फार निष्णात आहे. गडी अगदीं म्हातारा दिसतो. पण तरुणाहूनहि गुलजार व तरतरीत बोलण्यांतहि तितकाच गोड ( पडद्याकडे पाहून ) अरे वा, नांव काढायचा अवकाश. आलाच श्रीमंत ( अमृतराव गळ्याभोंवती सर्प गुंडाळून हकीमाच्या वेशांत येतो. ) या हकीमसाहेब, आपलीच हकीगत सांगत होतों. आहांत खरे बुवा शतायुष्यी !

**अमृत०**—मला म्हाताऱ्याला आतां शतायुष्यी होऊन कोणत्या तरुणीला नादीं लावायचं आहे ! महाराज, आपणासारखे थोर पुरुष फार दिवस जगले तर बऱ्याच कुटुंबाचा तरी उद्धार होईल.

**रघु०**—( स्वगत ) वर्मीच घाव दिला !

**माला०**—( स्वगत ) या हकीमाला पहातांच तेच माझ्या समोर आहेत असं का बरं वाटू लागलं आहे !

**अमृत०**—कायहो, या बाईसाहेब अशा का ? ह्या पहा कसल्यातरी आठवणीनें यांचा चेहरा भयभीत झालेला दिसतो.

**माल०**—( स्वगत ) अरे देवा, यानीं माझ्या मनांतलं ओळखलं कीं काय ?

**रघु०**—आपल्या गळ्याभोंवतालचं हें सर्पाचं वेष्टण पाहून कोणत्या कोंवळ्या मनाच्या स्त्रीची भयभीत स्थिति होणार नाहीं ?



अमृतराव:-वाहवा, काय पण हात आहे!

[ अं. २ पृ. ५९

**अमृत०**--बाईसाहेब, यांत एवढं भिण्यासारखं काय आहे ? हा सगळा विश्वासाचा प्रभाव आहे. अहो, नुसत्या फुत्कारानें हत्तीसारख्या प्रचंड प्राण्यांना एका क्षणांत काळाच्या मगरमिठींत धाडण्या इतका हा विषारी खरा पण विश्वासानें कंठीं धरतांच आपली विषारी वृत्ति विसरला पण तींच आम्ही माणसं, एखाद्याची मान हातीं यायचा आवकाश कीं, मुरगळलीच म्हणून समजा ! ( स्वगत ) पापी !

**माल०**—( स्वगत ) याचा प्रत्येक शब्द माझं हृदय चिरून काढीत आहे.

**रघु०**—हकीमसाहेब, हा विषारी विषय या आमच्या आनंदभुवनांत काय करायचा आहे. एखादा गमतीचा विषय काढा.

**अमृत०**—का बरं ? विषारी विषयाची बाधा विषारी मनाला. तुम्हा आम्हा साफ दिलाच्या माणसांना हो त्यांत काय ? खरं कीं, नाहीं बाईसाहेब ?

**माल०**—( स्वगत ) मला हें असं काय होत आहे ( थर थर कांपूं लागते. )

**अमृत०**—अहो या बाईसाहेब अशा थर थर काय कांपूं लागल्या ?

**रघु०**—नुकताच हिच्या कुटुंबांतील एक माणूस निवर्तला आहे. तेव्हांपासून हिची अशी स्थिति होत असते. हकीमसाहेब त्याचं पिशाच्च तर हिला छळीत नसेल ना ?

**अमृत०**—काय पिशाच्च ? म्हणजे तुम्ही देखील भूताखेतावर विश्वास ठेऊं लागला कीं, काय ?

**रघु०**—प्रसंग आला कीं, प्रत्येकजण अंगारेधूपारे शोधूं लागतो.

**अमृत०**--मोठंच आश्चर्य ? पण या बाई तर फार सच्छिल दिसतात. यानांही कोठून भुताखेताची बाधा होणार ?

**रघु०**—तें तर खरंच पण सहज प्रश्न केला.

**अमृत०**—छे, छे, प्रश्नानें कांहीं मोठंसं बिघडलं नाहीं. ( मालतीस ) बरं, बाईसाहेब हात करा पाहूं पुढें-अहो उजवा नको, तो लग्नाच्यावेळीं करावयाचा असतो-डावा करा ( हात घेऊन स्वगत ) जारिणी, तोच हा स्पर्श आज मला विषासारखा दाह देत आहे. ( उघड ) वाहवा, काय पण हात आहे-हजारांत सांपडणें दुर्मिळ-रावसाहेब पाहिलीत का ही रेषा, लाखांत एखादीच्या हातावर सांपडल्यास महाभाग्य ! फक्त द्रौपदीच्या हातावर होती असं ग्रंथांत नुसतं वर्णन आहे.

**रघु०**—पण द्रौपदीसारखं मन मात्र खंबीर नाहीं.

**अमृत०**—( स्वगत ) हृदया, विवेक सोडूं नकोस ( उघड ) कायहो, एक दोन दिवसांत या नदीकाठीं, डोंगरावर किंवा एखाद्या बागेंत गेल्या होत्या का ?

**माल०**—होय, बागेंत गेले होते.

**अमृ०**—मग भीति वाटण्यासारखी तिकडे एखादी गोष्ट घडली होती का ? नीट आठवण करा-बाकी हात सांगतच आहे.

**माल०**—( आठवण करीत ) तसं कांहीं घडलं नाहीं पण—

**रघु०**—पण काय त्याच्या आठवणीनें नव्हती का भ्यालीस !

**अमृत०**—बरोबर, बरोबर हातच सांगत आहे. कोणातरी मृतमाणसाचा भास होऊन या जरूर भ्याल्या असल्या पाहिजेत—रेषाच उमठली आहे

**माल०**--( भीतीनें ) थोडासा भास झाला होता.

**अमृत०**--कोणाचा बरं भास झाला होता ?

**माल०**--माझ्या मृतपतीचा.

**अमृत०**—( मोठ्यानें ) मृतपतीचा ! ह्मणजे तुह्मी विधवा अहा कीं, काय ? छत ! मला नाहीं खरं वाटत. अहो, सौभाग्याची रेषा तर तुमच्या हातावर इतकी ठसठसीत उमटली आहे कीं, तुह्मी अखंडसौभाग्यवतीच असला पाहिजे.

**रघु०**--शाबास, हकीमसाहेबांनीं बरोबर परिक्षा केली.

**अमृत०**--पतिसुख जर यांच्या कपाळीं ढळढळीत दिसत आहे तर परिक्षा करायला हो काय कठीण ! रावसाहेब, तुह्मी कांहीं ह्मणा यांचं एक लग्नतरी झालं नसावं किंवा यांचा पतितरी जिवंत असावा.

**रघु०**--जवळजवळ तोच प्रकार.

**अमृ०**--( हात पहात गंभीरपणें ) तरीच--

**रघु०**--( मध्येंच ) हकीमसाहेब, तरीच काय ?

**अमृत०**--एका मृतमनुष्याची आशा यांच्या ठिकाणीं गुंतल्यामुळें ( मालतीस ) हं, भिण्याचं कारण नाहीं-समजला का रावसाहेब, पिशाचरूपानें यांच्या सभोंवतीं घिरट्या घालीत आहे.

**माल०**--( भीतीनें ) अरे देवा--

---

**अमृत०**--हं, भिऊं नका. बाईसाहेब, मी विचारतों त्या एका एका प्रश्नाचं सरळ उत्तर द्याल तर माझ्या मंत्रप्रभावाचा तुम्हाला अनुभव येईल. पण उगाच माझी विद्या अजमावून पहाण्याचा मात्र प्रयत्न करूं नका.

**रघु०**--छे, छे, वैद्यापुढें रोग लपवून कसं चालणार. हकीमसाहेब खुशाल वाटेल तो प्रश्न विचारा.

**अमृत०**--हं, बाईसाहेब, माझ्या दृष्टीला दृष्टि भिडवा व विचारतों त्या एका एका प्रश्नाचं सरळ उत्तर द्या.

**माल०**—( स्वगत ) देवा, नाहीं यांच्या दृष्टीला दृष्टि भिडवत !

**अमृत०**—( हात पहात ) काय हो तुमचं लग्न झालं होतं का ?

**माल०**—होय.

**अमृत०**—तर मग नवऱ्यावर तुमचं प्रेम असलंच पाहिजे. खरं की, नाहीं—हं संकोच धरूं नका—खरं बोला ( स्वगत ) हृदळ, कोणत्या मुखानं उत्तर देणार ? ( उघड ) का, उत्तर का देत नाहीं—समजलों—बरं तुमच्या पतीचं तरी तुमच्यावर प्रेम होतं का ?

**माल०**—होय.

**अमृत०**—तुमच्या पतीनें तुमच्यावर आपला पूर्ण विश्वास टाकला होता ना ?

**माल०**—होय.

**अमृत०**—मग तुम्ही तो राखलात का—नाहीं म्हणून चक्क सांगा. हातावरून स्पष्ट कळतच आहे—हं, माझ्याकडे पहा.

**रघु०**—हकीमसाहेब, तिचा चेहरा पहा, भीतीनें अगदीं पांढरा फटफटीत झाला आहे.

**अमृत०**—भर्योंच बोलूं नकाहो—बाई, बोला तुमचा पति तुमच्या सुखाकरतां रात्रंदिवस झटत होता का ?

**माल०**—होय.

**अमृत०**—त्याला तुम्ही जिवकीप्राण होता ना ?

**माल०**—होय.

**अमृत०**—मग तुम्ही प्रामाणिकपणानें वागलात का—हं, आतां गप्प बसून कसं चालणार—बोला कायतें स्पष्ट—पण तुमची मुद्राच काय तें सांगत आहे—बाईसाहेब, ज्यानें तुम्हाला आपल्या जीविताचा आधार केला होता, त्याचा जर तुम्ही विश्वास-

घात केला, तर त्याचा आत्मा तुमच्या समोर आल्यावांचून कसा राहील ? ( दचकून ) हँ पिशाच्चा, दूर उभा रहा.

**माल०**—( ओरडत ) रघुनाथराव, वांचवा हो वांचवा ( भयभीत होते रघुनाथ तीस सांवरण्यास जातो. अमृतराव त्यास आडवितो. )

**अमृत०**—खबरदार, विषारीदंशानें बेहोश झालेला तिच्या पतीचा मृत आत्मा तुझ्यासमोर उभा आहे तो दिसत नाहीं काय ?

**रघु०**—हकीमसाहेब हिची स्थिति पहाहो.

**अमृत०**—नादान्, अविचार करूं नकोस. यावेळीं हिच्या मृत पतीचा आत्मा हिच्या देहांत संचारला आहे. स्पर्श करशील तर प्राणाला मुकशील.

**रघु०**—कोण, अमृतराव ?

**अमृत०**—होय-तोच. ऐक, कान उघडे करून ऐक.

**माल०**—( वरळते. ) नका, माझ्याकडे असे डोळे फाडून पाहूं नका-तुमच्या डोळ्यांतून इंगलासारख्या या कसल्या ठिणग्या निघूं लागल्या-मला त्या भाजून कीं हो काढीत आहेत. अरे देवा! आपली मुद्रा किती क्रूर झाली--पाया पडते हो-काळजाचे लचके तोडूं नका. मी पापी, अमृत टाकून विष प्यालें. आपला विश्वासघात केला नरकाची वाट धरली. पण आपण थोर, दयावंत स्वर्गीचे देव आहांत. माझ्यावर दया करा. आपल्या पायाची शपथ घेऊन सांगतें, ज्या दिवशीं माझं पाऊल वांकडं पडलं त्या वेळेपासून हृदयाला विंचू डसले आहेत, जीव सारखा तडफडत आहे ! माझ्या सारख्या पापिणीवांचून माझ्या मनस्थितीची कशी कुणाला कल्पना होणार-नर्कवासांतील यातनाहि इतक्या भयंकर नसतील-नाथ, नका माझ्या पापी मुखांतून त्या पवित्र नांवाचा उच्चार झालेला पाहून तिरस्कारानें तोंड फिरवूं नका-मला अग्नीच्या भडक्यांत लोटून जाऊं नका-माझ्या दुष्कर्माचे भेसूर देखावे दाखवूं नका-माझ्या सारख्या पापिणीच्या कपाळीं—

**अमृत०—हाच परिणाम !**

( पडदा पडतो. )

**अंक दुसरा समाप्त.**

—०—

# अंक तिसरा.

## प्रवेश पहिला.

स्थल:—दिवाणखाना.

( रघुनाथ व त्रिंबकराव. )

**रघु०**—काय म्हणतोस, माझी निंदा ?

**त्रिंब०**—होय रावसाहेब. खोटं कशाला सांगू. अमृतरावांनीं गरिबांना दिलेल्या रकमा आपण वसूल करीत आहांत,म्हणून त्या सर्वांनी जी कांहीं आपली निर्भत्सना चालविली आहे ती कांहीं विचारूं नका. मंगल व हकीम मनोहराला असें कांहीं वेडं वांकडं शिकवीत होते कीं, माझ्याच्यानें पुढें एक शब्दहि ऐकवेना मी तसाच आपल्याकडे आलों.

**रघु०**—आणि मालतीही त्यांच्यांत होती म्हणतोस ?

**त्रिंब०**—मी दाराआड उभा असल्यामुळें माईसाहेब निटशा दिसल्या नाहींत. पण असाव्यातशा वाटतात.

**रघु०**—हरकत नाहीं, तूं असाच त्यांच्या पाळतीवर रहा व काय काय हालचाली चालतात त्या मला त्वरित येऊन कळवीत जा.

**त्रिंब०**—बरं आहे रावसाहेब. ( जातो. )

**रघु०**—( रागानें ) तर मग या हकिमाला वाड्यांत आणून मी स्वतःच माझ्या मानेवर समंध बसवून घेतला. माझ्या व्यवहारांत ढवळाढवळ करणारा हा कोण आणि त्या थेरड्याला तरी एवढी उठाठेव कशाला ? त्या पोराचे कान भरवून माझी बाजू खाली पडेल अशी कां त्याची कल्पना आहे ? पण हा रघुनाथ कांहीं कच्चा

[library stamp]

दिलाचा नाहीं. परिस्थितीचे कान धरून तिला पायाजवळ कशी वांकवावी, हा गुरु-मंत्र तो चांगला शिकला आहे. असले छपन्न भुरटे जरी एकत्र झाले, तरी मालतीला माझ्या मुठींतून सोडविण्याची एकाची छाती नाहीं. तो बहिरीससाणा मंगल, आज बरेच दिवस माझ्यावर आपली करडी नजर रोंखून त्या पोराच्या कानांत विष ओतीत आहे. ओंत म्हणावं किती विष ओततोस तो ! तुम्हा सर्वांचे विखारी डोळे अलग बाहेर काढण्याइतकीं माझीं नखें तीक्ष्ण असेपर्यंत मी घालीन तो चारा निमुटपणें चघळीत तुम्हा सर्वांना माझ्या नजरेच्या रोंखानुसार पाऊस टाकलं पाहिजे आणि जर कांहीं कमी अधिक हालचाल करूं लागाल—

( मालती येते. )

**माल०**—काय झाऊं असं रागवायला ?

**रघु०**—राग ? छे बाईसाहेब, रागाचा अधिकार आपला ! माझ्या सारख्या फटिंगाचा राग काय कीं, विराग काय; दोहोंची किंमत सारखीच !

**माल०**—असं काय भलतंच बोलायचं ! काय तें नीट सांगायचं.

**रघु०**—जो खरोखरच झोंपी गेला आहे त्याला जागा करणं कठिण नसतं पण ज्यानें झोंपेचंच सोंग घेतलं आहे त्याला कोण जागा करूं शकणार ?

**माल०**—रघुनाथराव, ते जिवंत होते, त्यावेळीं माझ्या हातून किती जरी अपराध घडले तरी उलट माझीच समजूत करण्याकरितां तुम्ही एकांत प्रसंगाची वाट पहात असा आणि आतां रागावांचून एक क्षणहि जात नाहीं ना ?

**रघु०**—चोवीसतास पुरुष आपल्यामागें गोंडा घोळीत रहावे असं तुझ्यासारख्या सुखवस्तु स्त्रियांना वाटत असतं. पण मालती, मी त्यांतला नव्हे. शिवाय आयुष्यभर जर प्रेमाचेच उत्सव करीत बसलों तर संसारांतील इतर कर्तव्यें तरी कधीं पार पडणार ?

**माल०**—खरं आहे ! जिच्या एका शब्दा करतां चातकासारखे अधिर होत असा तीच आतां कसपटासमान वाटावी यांत नवल नाहीं.

### २३ पद ( बोले राजा ) चाल.

का विधाता निर्मि अशा युवा । यम तोहि कसा धरी रुसवा ॥ धृ० ॥ महा खरी जगिं या अभागिणी । अजवरी का जगलें नकळे । सुखाचा न साचा विसावा जिवा ॥ १ ॥

**रघु०**—अग मी तो काय आणि तुला सुख देणार काय ? तुला सुख देणारे तुझे जिव्हाळ्याचे चिरंजीव, मंगल, हकीमासारखे सल्लामसलतगार आहेतच जवळ.

**माल०**—हें काय भलतंच बोलायचं ! असं झालं तरी काय ?

**रघु०**—तें तुझें तुला ठाऊक. मालती, तुझ्या प्रेमाचा मी कितीजरी भुकेला असलों तरी तुझो एक कपर्दिकाहि मी विषासमान समजतो.

**माल०**—मग मी कधीं काय तुह्मांला ह्मणालें ?

**रघू०**—ती लवकरच पाळी येणार आहे. तूं इतकी मनोदुर्बल असशील ही मला कल्पनाहि नव्हती. पण कांहीं असो. कोठून तरी तूं सुखी असलीस ह्मणजे झालं.

**माल०**—माझा एक क्षणहि सुखांत जाऊं नये, असंच जर असेल तर त्याला तुह्मीतरी काय करणार !

**रघु०**—डोळ्याला असा पदर लावल्यानें कृतीवर पांघरून पडत नसतं. मालती, काल रात्रीं तुमचीं काय खलबतं चालली होती ती मला कळलीं नाहींत अशी का तुझी कल्पना आहे ? वा, हकीमानं लवकरच डोकीवर हात ठेवला म्हणायचा !

**माल०**—म्हणजे, यांत हकीमाचा काय संबंध ?

**रघु०**—तो समंध मी स्वतःच घरांत घुसवून घेतला आहे. मालती, तुझ्या वेड्या खंडोबानें प्रसंगीं अनेकांना दिलेल्या रकमा तुझ्या पोराच्या हिताकरतां वसूल करूं लागलों त्यांचें आभार मानण्या ऐवजी तुम्हीं सर्वांनीं माझी निर्भत्सना चालविली आहे याचा अर्थ काय ? तो थेरडा तरी कोणत्या घमेंडीत आहे ?

**माल०**—देवा शपथ, यांतलं एक अक्षर देखील मला माहीत नाहीं.

**रघु०**—काल रात्रीं तूं त्यांच्या बैठकींत नव्हतीस ?

**माल०**—काय या तुमच्या संशयाला म्हणूं ! मनोहराला थोडा ताप आला होता म्हणून उभ्या उभ्या त्याच्या खोलीकडे गेले होतें.

**रघु०**—अगदीं खरं सांगतेस ?

**माल०**—तुमच्या पाया शपथ यांत एक अक्षरहि खोटं नाहीं.

**२४ पद ( क्यों करत मोरे ) चाल.**

**ह्या मुळिं न मज दोषा । रोषा ॥ ध्रु० ॥ सत्य वदे**
**या स्मरुनि पदाला । कोप वृथा हा न करा आतां ।**
**तोडा सत्वर संशयपाशा ॥ १ ॥**

**रघु०**—तें कांहीं असो. त्या हकिमालाच वाड्यांत येण्याचा पहिल्यानें प्रतिबंध केला पाहिजे.

**माल०**—मला देखील त्या हकीमाची फार भीति वाटते. आमच्या वाड्यांत येऊं नकोस असं का वरं त्याला सांगत नाहीं.

**रघु०**—( स्वगत ) तें माझं मलाचं ठाऊक आहे. ( उघड ) मालती, दुसऱ्याला सांगण्यापेक्षां आपल्या पोराचेच कान उपटले पाहिजेत.

**माल०**—मग बोलावूं का त्या कारट्याला ?

( मनोहर येतो. )

**मनो०**—काय आज्ञा आहे आईसाहेब ?

**रघु०**—( स्वगत ) कसं आहे इरसाल कारटं !

**माल०**—मनोहर, रघुनाथराव काय सांगतात तें ऐकलंस का ?

**मनो०**—आई, माझे कान अझून आंखूड आहेत तेव्हां तुमचं स्वगत भाषण कसं बरं ऐकूं यावं ?

**रघु०**—का, आहे कीं, नाहीं लहान तोंडीं मोठा घांस ?

**मनो०**—घांसाइतकं तोंड परमेश्वरच देत असतो. तुमच्या आमच्या हातीं काय आहे ?

**रघु०**—कारट्या, थट्टेतहि ज्याला तुझ्या बापानें प्रत्युत्तर केलं नाहीं त्याला तूं टिचभर पोर शहाणपणा शिकवूं लागलास काय ?

**मनो०**—वयावर काय आहे अण्णासाहेब ?

**माल०**—कारट्या, शुद्धीवर आहेस का ?

**मनो०**—आई, शुद्धीवर आहे म्हणूनच शुद्ध बोलत आहे.

**रघु०**—मूर्खा, तुझ्या हिताकरतां रात्रंदिवस झटतों आहे, त्याचे हे उपकार फेडीत आहेस वाटतं ?

**मनो०**—एका देवावांचून कोणी कोणाचं हित करीत नाहीं, असं बाबा मला नेहमीं सांगत तें मग खोटंच का ?

**माल०**—कारट्या, रघुनाथरावांसमोर कधीं उभा देखील रहात नव्हतास तोंच आज वाटतील तशीं उत्तरं द्यायला तुला झालं तरी काय ?

**मनो०**—आई, कांही झालं नाहीं म्हणूनच बाबांना अझून विसरलों नाहीं.

**रघु०**—कशी आहे लहान मूर्ति ! मूर्खा, दुसऱ्यांच्या शिकवणीनें जो असा उद्दाम होत चालला आहेस, तेव्हां उद्यां खाकेंत चौपदरी अडकविणार कीं काय ?

( अमृतराव येतो. )

**अमृत०**—रावसाहेब, नशिबीं जर चौपदरी असली तर कुबेरी तरी कशी टिकणार ? मुलावर का उगाच रागावतां ? बिचारा तापानें फणफणला आहे !

**रघु०**—( स्वगत ) आला लुडबुड करायला ! ( उघड ) हकीमसाहेब, नशिबाकडे नुसतं बोट करून कसं चालेल ? याच्या बापाची आज्ञा नको का मला पाळायला ?

**अमृत०**—अलबत् ! मनोहर, सांग पाहूं तुझ्या बाबांची आज्ञा रावसाहेबांना.

**रघु०**—( स्वगत ) हें जळतं घर मी कोठून विकतं घेतलं !

**मनो०**—बाबा स्वप्नांत येऊन मला म्हणाले; मनोहर, तूं जर माझा खरा मुलगा असशील तर अनाथ कुटुंबांना दिलेल्या पैशांपैकीं एक पै देखील परत घेऊं नको. ऐकलीस ना आई, बाबांची आज्ञा ?

**रघु०**—असल्या फुसक्या स्वप्नानें तुझे भिकेचे डोहाळे पुरे करण्या इतका मी मूर्ख नाहीं. मित्रवचन मला पाळलंच पाहिजे.

**अमृत०**—जाऊं द्या रावसाहेब. पोरहट्ट आहे. पुरवा याची एवढी हौस ! तुम्हाला तरी तेवढ्यानें काय कमी पडणार आहे ?

**रघु०**—वा, हकीमसाहेब तुम्ही देखील पोराला चांगलीच बुद्धि शिकवूं लागला.

**अमृत०**—अहो शिकविण्यानं काय होतं ? तेथें पाहिजे जातीचें, येरा गवाळाचें काम नोहे !

**रघु०**—( स्वगत ) या रामोशाला आतां सांगूं तरी काय ?

**अमृत०**—काय समजला ना रावसाहेब ? अहो, हें असं चालायचंच ! डोकींत राख घालून काय भागतं ? ( स्वगत ) कशी होळी भडकली आहे !

**रघु०**—हकीमसाहेब, जाऊं द्या. या किरकोळ घरगुती बाबी आहेत. तुमच्या मेंदूला कशाला उगाच त्रास ?

**अमृत०**—छे, छे, रावसाहेब माझा मेंदू चांगला तोफेच्या गोळ्या सारखा भक्कम आहे, त्याची नको आपल्याला काळजी. अहो, आपल्या घरांत घुसलेला समंध पार हुसकावून लावण्याचा जर मी मक्ता घेतला आहे तर तुमच्या प्रत्येक बाबतींत मन घातल्या वांचून हो कसं चालेल ? खरं कीं, नाहीं बाईसाहेब ?

**माल०**—होय.

**रघु०**—( स्वगत ) पक्का निगरगट्ट !

**अमृत०**—रावसाहेब, एका बाईसाहेबाच्याच मानेवरला समंध उठवून भागलं नाहीं. तुमच्यावरहि त्याची छाया पडली आहे.

**रघु०**—( स्वगत ) सध्यां तुझी छाया पडली आहे खरी !

**अमृत०**—काय समजला ना रावसाहेब ?

**माल०**—खरंच का ? मग आतां कसं करणार ?

**अमृत०**—हं ! त्यांत काय एवढं मोठं ! अहो, असले छपन्न खवीस एका मनोहराच्या हातून हुसकावून लावीन इतकं माझ्या मंत्रांत सामर्थ्य आहे.

रघु०—वा, याची आम्हाला प्रचिती आल्यावांचून का आपल्या नादीं लागलों ? पण म्हटलं या पोराला एव्हांपासूनच थोडी मर्यादा असलेली बरी.

अमृत०—वा, आम्ही थोर जर वाटतील तशा उड्या मारूं लागलों तरी हीं विचारीं पोरंतरी कशीं कोंडवाड्यांत कोंडून रहातील ?

रघु०—( स्वगत ) कसा आहे वेरड !

मनो०—अण्णासाहेब, या पोराकरतां कशाला उगाच कष्ट घेतां ? खुला म्हणून द्या सोडून !

रघु०—वा, अशान तुझ्या बापाचा विश्वासघात नाहीं का होणार ?

अमृत०—जाऊंद्या हो रावसाहेब. आई जन्म देते म्हणून कर्मतर देत नाहीं ना ?

मनो०—अण्णासाहेब, तसीच जर पाळी आली तर लबाडीच्या साखरपोळी-पेक्षां भिकेची झोळीच मी सुखाची मानीन.

रघु०—( त्वेषानें ) मन्या, कोणापुढें आज तूं हें तोंड सोडलं आहेस ? पोर समजून हा वेळपर्यंत ऐकून घेतलं पण आतां जर एक शब्द उच्चारशील तर घशा खालींच दांत उतरीन.

मनो०—बाप नसलेल्या मुलाला वाटेल त्यानें चुरडावं त्याची कोण दाद घेतो ?

अमृत०—हं, हं मनोहर, रावसाहेबांना असलं उत्तर ! घे, घे, थोबाडींत मारून घे, जाऊंद्या रावसाहेब पोर आहे.

रघु०—( स्वगत ) बरं आहे.

मनो०—आई, जातों मी. माझ्यानें उभं रहावत नाहीं. तूं माझ्या करतां दुःखि कष्टि होऊं नकोस. दुर्दैवीच मी ! त्याला तूंतरी काय करणार ? (जाऊं लागतो.)

अमृत०—अरे थांब, थांब, एकटा जाऊं नकोस. मी तरी तुला खोलीपर्यंत पोंहचवितों. पोरगं तापांत आहे रावसाहेब !

( दोघे जातात. )

रघु०—( रागानें ) एकूण, हा कुऱ्हाडीचा दांडा गोतालाच काळ झाला !

माल०—तो कसा ?

**रघु०**—कपाळ तुझं !

**माल०**—मग मी काय करूं म्हणतां ?

**रघु०**—तूं काय करणार. हृदयाच्या बुडाशीं भिनलेलं विष, डोळ्याचं पातं लवतं न लवतं इतक्या अवधींत मी वाहेर काढतो.

**माल०**—म्हणजे ?

**रघु०**—म्हणजे ? ( ओंठ चावून ) म्हणजेच ! ( रागानें जातो. )

**माल०**—काय हे माझ्या जन्माचे खेळ चालले आहेत ! ज्यांच्या नादानें भ्रष्ट झालें—स्वैरिणी बनलें—तेच मी आधीन होतांच मला बटकी सारखी वागवूं लागले. प्रत्यक्ष पोटचा गोळा तोहि माझा तिरस्कार करूं लागला. सती-धर्माचा जर मी धिकार केला नसता तर आज माझ्याकडे वांकड्या नजरेनं कोणा-च्यानें पहावलं नसतं पण आतां वाटेंतील एखाद्या पोरानं माझ्याकडे बोट करून व्यभिचारीण म्हणावं ! कोणत्या सुखाकरतां मी नरकांत तोंड विटाळलं ! देवा, जगांत असतील नसतील त्या हालअपेष्टा आम्हा स्त्रियांवर टाक पण कुमार्गाकडे जाण्याची कुबुद्धि आम्हाला देऊं नको. रात्रंदिवस मनाचें समाधान करीत आहें, पण हृदयाला काय वेदना लागल्या आहेत त्या कोण जाणूं शकणार ?

**२५ पद—( रेनका सपना ) चाल.**

**यातना दारुणा । छळिति मना भावना ॥ ध्रु० ॥**
**अनल घोर या हृदयीं भडके । सुख न गमे जीवना ॥१॥**

( जाते. )

---

## प्रवेश दुसरा.

### स्थळः—रस्ता.

( नं. १ इनामदार भयभीत असा प्रवेश करतो. )

**१ इना०**—( पडद्याकडे पाहून ) अरे बापरे, बोळांबोळांतून लपत छपत पळत सुटलों म्हणून बचावलों ! नाद्दिपेक्षां झाली होती हवापालट ! हा रध्या पक्का बेरड ! माझ्या हातून वाटतील तशीं खोटीं नाटी कामें करवून शेवटीं माझ्यावरच उलटला.

आतां हें सुदर्शन चक्र टळणार कसं ? (पडद्याकडे पाहून ) आला कीं, काय? छे, आतां लपूं तरी कुठें—त्या सरकारी बेलिफाला थोडी बहुत जरी माझी चाहूल लागली तरी कुत्र्यासारख्या हुंगत हुंगत माग काढीत येईल आणि माझी उचलबांगडी करील. किती मी मूर्ख, तिला चुलत्याकडे पाठवून नाटकं न् तमाशे धुंडाळीत बसलों आहे. पण आतां अटकेची पाळी आली आहे तिची काय वाट ? हा इनामदार एक पळ जरी सात्रकारी तुरुंगांत बसला तरी ऐटीचा भोपळा—

( गोपाळ येतो. )

**गोपा०**—नमस्कार इनामदार.

**१ इना०**—अरे बापरे ! ( पळूं लागतो. )

**गोपा०**—इनामदार, असे पळतां काय ?

**१ इना०**—कोण गोपाळ ?

**गोपा०**—पण इनामदार असे घाबरीफाइड कशानं झाला ?

**१ इना०**—छेरे ! पण तूं कुठें मध्येंच, आज खेळ नाहीं वाटतं ?

**गोपा०**—मुक्काम हलायचा आहे.

**१ इना०**—एवढी घाईशी, उत्पन्न वगैरे ठीक झालं ना ?

**गोपा०**—आणि न का होईना ! तें उत्पन्न आणि ते मालक, काय वाटेल तो धिंगाणा घालोत. आमच्या पगाराच्या पुड्या उशाजवळ येतात तेव्हांच आम्ही तोंडाला रंग फांसतों. नाहिंपेक्षां पथारी असतेच पाठीवर बांधलेली.

**१ इना०**—मजा आहे बुवा, एखाद्या राजाचीहि तबियेत संभाळावी लागत नसेल इतकी तुमची मिजास राखावी लागते.

**गोपा०**—इनामदार, तुम्हासारखे आमचे पाठिराखे असतांनाहो आम्ही काय या नाटक कंपन्यांची पर्वा करतों.

**१ इना०**—चढीव—चढीव—हरबऱ्याच्या झाडावर चढीव ! बरं पण जेवण वगैरे केलंस कीं नाहीं ? उगाच पित्त भडकायचं !

**गोपा०**—तुमच्या पंक्तीचा लाभ सोडून जेवण ? वा ! मग कमाल झाली माझ्या अकलेची !

१ इना०—( स्वगत ) आली पुनः ऐटीची होळी. ( उघड ) गोपाळ, आमचं कुटुंब गेलं आहे आजोळी. तेव्हां मी खाणावळींत जेवतों. हें पहा, ती मोतीचौकांतील खाणावळ तुला आहे ना ठाऊक, तिकडे जा व जेव. इतक्यांत मी तिकडे येऊन पैसे चुकवितों.

गोपा०—भलतंच, तुह्माला घेतल्यावांचून आपण नाहीं बुवा तोंडांत पाणि घालणार !

१ इना०—( खूष होऊन ) असला छटेल पोर आहेस, एकदां खुलवूं लागलास कीं, काय करशील तितकं थोडं. वरं आतां जा. वेळ होतो. उगाच डोकं दुखूं लागेल. मला फार जरूरीचं काम आहे. उभ्या उभ्या उरकून येतों.

गोपा०—( लडिवाळपणें ) इनामदार, मी नाहीं जाऊं देणार !

१ इना०—वा, खूपच रंगांत आलास.

गोपा०—इनामदार, कांहीं कामाकरतां आलों आहे.

१ इना०—आधीं जेव जा. मग आहेच काम.

गोपा०—काम पूर्ण केल्यावांचून आपण नाहीं बुवा जेवणार. ( लडिवाळपणानें ) इनामदार, मला दहा रुपयांची फार नड आहे.

१ इना०—आतां बोललों तर उगाच डोकींत राख घालूं लागशील. तुह्मां लोकांना धोरण ह्मणून बिल्कूल नसतं, तहान लागली कीं, विहीर शोधूं लागतां, एक दिवस आधीं आला असतास तर काय बिघडलं असतं ! नुकताच एक जण दोन हजार रुपये घेऊन गेला ( स्वगत ) कपाळ माझं !

गोपा०—अहो, एकजण दहा हजार रुपये घेऊन गेला असेल त्याचं मला काय ! मला आपले दहा रुपये मिळाले पाहिजेत. इनामदार, माझा तसा हक्क आहे.

१ इना०—मग नाहीं कोण ह्मणतो ! गोपाळ, वायकोचं लुगडं फाटलं तरी तिकडे ढुंकून पहात नसतो पण तूं शब्द टाकलास कीं, नाहीं ह्मणवतच नाहीं.

गोपा०—इनामदार, आह्मी देखील तुमच्याकरतां मागें पुढें पहात नसतों बरं ! मग काय करता ना काम ?

१ इना०—नाहिंपेक्षां मला तूं कोरडाच सोडणार? वरं आधि जेव जा, मी तिकडे येतों.

गोपा०—पण लवकर येतां ना? मी नाहीं हो तिष्ठत वसणार !

१ इना०—किती किती नखरे करशील ! वरं जा, डोकं चढेल. ( तो जातो. ) आता काय दांत पाडून देऊं?

( एक भिकारीण येते. )

भिका०—दादा, पोटाला एक पैसा. देव भलं करील.

१ इना०—( रागानें ) अग चल हट. मोठी आली आहे आशिर्वाद द्यायला? इकडे मी कोणत्या फिकिरींत आणि हिला सुचलं आहे पोट.

भिका०—दादा, अनाथ रंडकी मुंडकी आहे हो ! दोन दिवस पोटांत अन्न नाहीं, उभं देखील रहावत नाहीं.

१ इना०—मग आडवी हो. वापानें ठेवला आहे का पैसा? शिंच्या ब्यादी उठतां सुटतां लागतात तोंड पसरायला? काम करायला काय होतं? चालती होतेस कीं, देऊं कमरेंत लाथ !

भिका०—बावा मोठा पुण्यवान दिसतोस, तरी वरं सारं पिकलं आहे.

१ इना०—अग जा जा मोठी आली आहे ! भिकारी तर भिकारी आणि वर शिर जोरी. इकडे आमचं उठलंय बिऱ्हाड आणि यांचं सुठल्य् वऱ्हाड ! पण मी उभा काय राहिलों. या पोराला गुंगारा दिला पाहिजे. हो, पण तें पांखरू कोठलं आमच्या वाड्यांत शिरलें आहे? हळूंच वाड्याकडे जावं.

( जातो. नं. २ इनामदार येतो. )

२ इना०—वस्स, पुरे झाली ही भाऊबीज ! तिला घेऊन आपला रस्ता सुधारावा. श्रीहरी, श्रीहरी, श्रीहरी !

( त्रिंबकराव व बेलिफ येतात. )

त्रिंब०—अहो बेलिफसाहेब, पाय उचला हे पहा इनामदार उभे आहेत.

बेलि०—( इनामदारास ) काय हो इनामदार आपणच का?

२ इना०—( त्रासानें ) हो, काय आहे म्हणणं ?

बेलि०—( कागद पुढें करून ) ही रकम मोजणं !

२ इना०—श्रीहरी, हे लोक आहेत तरी कोण ?

बेलि०—इनामदार सरकारी बेलिफाचा खोळंबा होत आहे. मुकाट्यानें रकम मोजा नाहिंपेक्षां तुरुंगांत चला.

२ इना०—महाराज, ही ठकबाजी शिकलात कुठें ? हुकूम कसला, देणं कुणाचं मागता कोणा जवळ, आहे काय आणि नाहीं काय ?

बेलि०—इनामदार, सभ्य वाटला होता पण पक्के बनला आहांत. सरकारी हुकूमालाहि तुम्ही धाब्यावर बसवूं लागला तेव्हां तुमची छाती तरी काय म्हणावी ?

२ इना०—मग भितों कीं काय ? सरकाराचे दोन चवल लागत नाहीं.

बेलि०—त्रिंबकराव—

त्रिंब०—राव काय करा उचल बांगडी. सरकारी हुकूम आहे.

बेलि०—हो हो आहे म्हणजे काय आहेच !

( गोपाळ येतो. )

गोपा०—( हात जोडून ) खूप केलीत इनामदार, आम्हाला खाणावळीची वाट दाखवून चांगलाच गुंगारा दिलात.

२ इना०—मला आतां वेड न लागो म्हणजे झालं !

त्रिंब०—काय हो तुमचं पण घेणं आहे वाटतं ?

गोपा०—अगदीं प्रत्यक्षच जरी नसलं तरी आहेच म्हणाना ! पण तुम्हीं कोण ?

बेलि०—मी सरकारी बेलिफ आहे. इनामदारावर जप्तीचा हुकूम आहे.

गोपा०—काय जप्तीचा हुकूम ? हत् तुमचे इनामदार ! पोकळच सारी ऐट. फुकट गाडीभाड्यांत पैसे घालविले. बघतां काय, ओढा तुरुंगाकडे !

बेली०—इनामदार चला तुरुंगांत.

२ इना०—श्रीहरी, वाड्यांत चला पैसे देतों. श्रीहरी, तूंचि आतां माझा कैवारी !

( जातात. )

## प्रवेश तिसरा.

### स्थल—एक खोली.

( मनोहर तापानें पडला आहे; जवळ मंगल आहे. )

**मनो०**—मंगल, माझ्या इतका सुखी मुलगा असेल का हो ?

**मंग०**—बोलूं नको म्हणतों ना ? स्वस्थ झोप.

**मनो०**—बोलूं नको, माझे बाबा मला लवकरच भेटणार तेव्हां मी हर्षानें बोलूं नको तर काय करूं ? मंगल, बाबांनीं मला एक सुंदर गाणं शिकविलं होतं, तें आठवतं का हो तुम्हाला ?

**मंग०**—तूं स्वस्थ पडतोस कीं, मी जाऊं आपला ?

**मनो०**—जाऊन, जाऊन कुठें जाल ? बाबाकडेच ना. मग तुमच्या मायेच्या मी त्यांना कितीतरी गोष्टी सांगेन. त्या ऐकून त्यांना फार आनंद होईल. पण तें गाणं आठवाहो !

**मंग०**—देवा, तुला तरी हें कसं पहावतं ।

**मनो०**—मंगल, आठवलं हो आठवलं ! मी म्हणतो हं. तुम्ही ऐकता ना-ऐका हं—

**१६ गाणें.**

**अशाश्वत काया । तोडि भवमाया बंध हा । फुलें फुललीं नवीं खुललीं । तोंचि वातें सहज गळलीं । दिलीं ज्यानें त्याहि नेली । हानि अमुची यांत कसली ? ॥ १ ॥**

किती पण गोड गाणं ! बाबा रोज मला याचा अर्थ शिकवीत असत.

**मंग०**—बाळ, तुला एवढं शहाणपण तरी आलं कोठून ?

**मनो०**—शहाण्या बापाच्या मुलाला शहाणपण शिकवावं का लागतं ? पण मला जरा उठवून बसवा पाहूं.

**मंग०**—मग मी जाऊं का ?

**मनो०**—जाता ? जा वापडे ! तुम्ही तरी का माझा त्रास सोसावा ? पण खरंच आज मला फार बरं वाटतं. उठवून बसवाच तुम्ही ! ( मंगला त्यास उठवून बसवितो. ) कसे पण तुमचे हात फुलासारखे मऊ लागले.

**मंग०**—मनोहर, आज तुला कसं वाटतं वाळ ?

**मनो०**—फार चांगलं वाटतं. पण आईला बोलाविलंत का ?

**मंग०**—( स्वगत ) कसली आई, राक्षशीण ! ( उघड, ) मनोहर, आज तुला आईची का वरचेवर आठवण होत आहे. तुला काय वाटतं वाळ ?

**मनो०**—मंगल, तिच्या पोटीं मी जन्म घेतला आहे, तिला विसरून कसं वरं चालेल ! देवालातरी तें कसं आवडेल ?

**मंग०**—मग पुनः बोलवायला जाऊं का ?

**मनो०**—जाल तर वरं होईल. तिच्या पायावर मस्तक ठेऊन तिचा मला आशीर्वाद घेऊं द्या. मी जर असाच निघून गेलों तर आईला दुःख होईल. वावाहि माझ्यावर रागावतील. जाहो जा, तुमच्या पाया पडतों. आईला घेऊन लवकर या. ( टकमक पहात ) ऐकलात का हा मंजुळ शब्द. देवाच्या राज्यांत असलेच शब्द असतात वरं ! सुगंध पण किती गोड ! जिकडे तिकडे फुलंच फुलं ! एका आनंदावांचून तिकडे कांहीं देखील नसतं ( एकदम ) मंगल, मंगल ते पहा माझे वावा ! काय हें त्यांचं तेज-जाहो जा आईला घेऊन लवकर या-पण हें काय-आईचं नांव ऐकतांच वावा जाऊं लागले-वावा, थांवा हो थांबा-तुह्माला डोळेभर तरी पाहूं द्या-गेले-गेले-गेले ! ( मूर्छित पडतो. मालती येते. )

**माल०**—मनोहर.

**मंग०**—माईसाहेव, पोराकडे पहाहो.

**माल०**—औषध दिलंत का ?

**मंग०**—आधीं पोर बेशुद्ध पडला आहे तो पहा.

**माल०**—बेशुद्ध पडायला काय झालं ? आजाऱ्याजवळ वरदळ नको ह्मणून रघुनाथरावांनीं तुह्माला हजार वेळां ताकीद दिली तरी चोवीस तास तुह्मी आपले

त्याच्या उशाशीं डोकं टेकून बसलेले असतां. तुह्मीच कांहीं तरी भीति घातली असाल झालं. जा बाहेर जाऊन बसा.

**मंग०**—बरं आहे माईसाहेब.

**मनो०**—बाबा—

**माल०**—( जवळ जाऊन ) मनोहर.

**मनो०**—( डोळे उघडून ) कोण–आई! ( तिला मिठी मारतो. )

**माल०**—मनोहर, का बोलाविलेंस !

**मनो०**—का बोलाविलें ! आई, या गरीब मुलाला अगदींच विसरलीस ना ? विसर बापडी ! पण तुला विसरून देव मला कसा थारा देईल ?

**माल०**—मनोहर, मी तुला नाहीं बरं विसरलें. आज रघुनाथराव एक नवीन औषध आणणार आहेत. तूं किनई आतां लवकरच बरा होशील.

**मनो०**—बरा होऊन तुला त्रास होण्यापेक्षां मेलों तर तूं सुखी नाहीं का होणार ?

**माल०**—छे वेड्या ! असं भलतं सलतं बोलूं नये ! आईला मुलगा कधीं नकोसा होतो का !

**मनो०**—पण तुला नकोसा झाला आहे. आई, मुलगा कसा जरी असला तरी आई त्याला दूर लोटीत नसते. मग तूंचना मला जन्म दिलास ? कष्ट सोसून तूंचना मला वाढविलास ? मग तुझी ती माया कुठें गेली ? मायेचा पान्हा कसा आटला ? आई–आई, हा पोटचा गोळा कसा ग तुला नकोसा झाला !

**माल०**—( गहिंवरून ) नकोरे माझ्या हृदयावर असे घाव करूंस ?

**मनो०**—आई, तूं मला जन्म दिला आहेस. एका शब्दानेंहि तुझं मन दुखविण्याचा माझा धर्म नाहीं पण तुझ्या दुःखानें दुःखी व सुखानें सुखी होण्याचा मात्र माझा अधिकार आहे.

**माल०**—बाळा, तुझी आई म्हणवून घेण्याची देखील माझी पात्रता नाहींरे !

**मनो०**—आई, माझ्या हातून कांहीं अपराध घडले असल्यास मी लहान समजून मला क्षमा कर. माझ्यावर रागावूं नकोस, लाथेनें दूर लोटूं नकोस, हृदयाच्या कोनाकोपऱ्यांत असलेल्या मातृप्रेमाच्या दृष्टीनें एकवार आपल्या मनोहराकडे पहाग. म्हणजे आई तुझ्या हृदयाला मायेचा पान्हा फुटेलग !

**माल०**—आतां सर्व जन्मभर जरी रडत बसलें तरी माझ्या हृदयाला कशाचा पान्हा फुटणार !

**मनो०**—आई, तुझा तूंच काय तो विचार ठरीव. मी काय, बाबांकडे चाललोंच आहे. पण पुनः तुझी भेट होणार नाहीं म्हणून तुझ्याकरतां जिव घुटमळत आहे.

**माल०**—देवा, कसं चोहिंकडून कपाळ फुटलं !

**मनो०**—नको, रडूं नकोस. तुझ्या डोळ्यांतलि अश्रु माझ्याच्यानें पहावत नाहींत. घे–माझा मुका घे. मला हृदयाजवळ ओढ. आई, एकवार ममतेनें मला कुरवाळग !

**माल०**—( त्याला हृदयाजवळ धरून ) बाळा—

( रघुनाथ येतो. )

**रघु०**—चांगला इलाज चालला आहे. मालती, तूं इतकी गांवढळ असशील याची मला कल्पनाहि नव्हती. आजाऱ्याला एक शब्दहि बोलूं देऊं नका, अशी डॉक्टरांची सक्त ताकीद असतां मायेचा पान्हा फोडायला तुला हीच वेळ सांपडली वाटतं ?

**माल०**—नाहिं हो रघुनाथराव. आज पोराचीं चिन्हं कांहीं निराळीच दिसतात !

**रघु०**—आपल्यासारख्या भित्र्याभागुबाई भेटल्यावर चिन्हं का निराळीं दिसणार नाहींत ? तूं जा बाहेर, मी पाहातों कशी काय चिन्हं आहेत तीं ! डॉक्टर इतक्यांत येतील. त्यांच्या दृष्टीला जर आपण सारेजाण पडलों तर ते रागावतील.

**माल०**—पण मी जवळ असलें म्हणून काय बिघडतें ?

**रघु०**—( कठोरपणें ) सांगितलेलें ऐकावं. चल जा—

**माल०**—मनोहर, मी जातें हं डॉक्टर आतां येतील भिऊं नकोस.

**मनो०**—जा–आई स्वस्थ जा;

( मालती मनोहराकडे पहात दुःखानें जाते. )

**रघु०**—मनोहर, अरे, असा रडतोस काय ? दुखणं दुखणं तें काय मोठंसं चुटकीसरशी हुसकावून लाऊं. बरं थोडा उठून बसतोस का ?

**मनो०**—नको–मला स्वस्थ पडूं द्या.

**रघु०**—बरं बरं अम्मळ डोळा लागला म्हणजे हुषारी येईल ( त्यास पांघरूण घालतो व एकीकडे ) पोरा, तुला अक्षयचा आराम वाटावा असाच डोस आज



Photos by G. G. Virkar Nasik. अमृतराव:–सैतान! [ अं. ३ पृ. ७९

आणला आहे. तूं जिवंत असेपर्यंत मालतीचं मन केव्हांहि स्थिर रहाणार नाहीं तेव्हां बापाच्या सोबतीला तुला पाठविलाच पाहिजे. ( इकडे तिकडे पाहून ) पूर्ण झोंप लागली आहे. आसपासहि कोणी दिसत नाहीं ( विषाची कुपी एका हातांत व टेबलावरील औषधाची कुपी एका हातांत घेऊन ) हें विष औषधांत मिळविलें कीं बींन बोभाट बेडा पार ! दुर्दैवी पोरा, तुझ्यासारख्या कांट्याला जगांत थारा नसतो तो हरएक युक्तीनें अस्सा—( विष ओतूं लागतो तोंच अमृतराव प्रवेश करतो. )

**अमृत०**—सैतान !

( रघुनाथाच्या हातांतील कुपी पडते व तो भ्रमिष्ट होतो. )

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश चवथा.

दिवाणखान्यांतील एक भाग.

( रघुनाथ भ्रमिष्ट वृत्तींत मालतीचा हात धरून येतो. )

**माल०**—रघुनाथराव—

**रघु०**—( भयभीत ) सांग-सांग तो अमृतरावच नव्हता ना? मग त्याचा भास का झाला? तापलेल्या तेलासारखे त्याचे शब्द का प्रखर लागले—चल मला घेऊन कुठेंतरी दूर चल-तळीं पाताळीं नेऊन ठेव-खोल खोल दरींत लपीव-माझ्या-च्यानें इकडे रहावत नाहीं-माझा तो गळा दाबील ग !

**माल०**—कोण तुमचा गळा दाबणार ? असं काय भ्रमिष्टासारखं करायचं!

**रघु०**—( तिचा हात झिडकारून ) दूर, चांडाळणी दूर. अंगाला स्पर्श करूं नको-तो तुझ्यावरहि झडप घालील—काळीज फाडील—लचके तोडील-पण माझ्या हाताकडे काय अशी क्रूर दृष्टीनें पहात आहेस? आणि हे विषाचे डाग कोठले-पहा, पहा तुझ्या डोळ्यांत विष-मुखांत विष, अधरांत विष! सारं विष, विष, विष-मनोहर चांगला आहे ना-तें विष त्याच्या शरिरांत-नको मृताच्या आत्म्या माझ्याकडे डोळे फाडून पाहूं नकोस !

**माल०**—रघुनाथराव, वल्लभा—

**रघु०**—पापिणी, नको–नको–पुनः तो उच्चार करूं नकोस ! तो पहा, कसा खवळलेल्या नजरेनं पहात आहे–जा जा आधीं मनोहराकडे जा–त्याच्या आजूबाजूला विषाचा थेंब सांडला असल्यास पुसून टाक ( ऐकून ) ऐक, त्याचं विवळणं ऐक जा जा तें विष त्या पोराचं काळीज भाजून काढील ( तिचा हात धरून ) पण थांब तुझ्या हातांत काय–विषाची कुपी–दे दे दूर फेंकून दे–ती तुझा, माझा सर्वांचा घात करील.

**माल०**—नका हो नका असं कांहीं तरी वरळूं नका. मला भीति वाटते.

**रघु०**—भीति, भीति–चल कुठें तरी दूर चल. इकडे आतां सुख नाहीं. सारं पारडं फिरलं–घर फिरलं–वासे फिरले–पण तूं अशी थरथर कांपत का आहेस–विष नाहिं ना पोटांत गेलं ?

**माल०**—कोठलं विष ! हा कसला भ्रम पडला ?

**रघु०**—मी असा गाफील कसा राहिलों–माझी अक्कल कुठें गेली–पण बरं झालं एक हत्या चुकली–पण खरीच चुकली ना–मालती बांध ग बांध माझे डोळे पदरानें गच्च बांध–तो पहा धांवत येऊं लागला–घे, घे, त्याच्या हातांतील तें विष घे–विषाचा दाह माझ्या शरिरांत भडकला ग ?

**माल०**—आतां करूं तरी काय ! कोणाला हांक मारीन म्हटलं तर यांना सोडून जाऊं तरी कशी ?

**रघु०**—नको, मला सोडून जाऊं नकोस–तो माझ्या घशांत विष ओतील–काळजाला भोंकें पाडील–माझा प्राण घेईल–( तिचा हात धरून ) अरे बापरे ! तुझे हात कसे विषानें भरले–हें पहा बोटावाटे सारखं विष गळत आहे–पण मनोहराला याचा स्पर्श झाला नाहींना–गरीब पोर तडफडून तडफडून मरेल ग !

**माल०**—हकीमसाहेबांना तरी हांक मारतें.

**रघु०**—नको, नको नको, त्या हकीमाची आणि माझी आतां भेट होऊं देऊं नकोस. जा, वाड्याचीं एकूण एक दारं बंद कर. कुलपं घाल.

**माल०**—देवा, यांना झालं तरी काय ?

**रघु०**—मनोहराला पाहून आलीस का–तो चांगला आहेना ? पण चाललीस कुठें ? विषानें भरलेले हात घेऊन का त्या पोराकडे जाणार ? चूप, हा पहा हकीमाचा शब्द ऐकूं येत आहे. लपीव, लपीव, मालती मला कुठें तरी लपीव.

**माल०**—हकीमाची आज तुम्हाला इतकी भीति कां वाटत आहे ?

**रघु०**—भीति–आधीं मनोहराच्या खोलींत जा आणि कुपी दूर फेंकून दे.

**माल०**—कसली कुपी ? कसलं विष–चला तुम्हाला त्याच्या खोलींत नेतें म्हणजे संशय दूर होईल.

**रघु०**—नको त्या खोलीचं आतां नांव नको–माझं नरडंच फोडील–पण हा पहा आला–माझा गळा दाबला–मालती पळ पळ– ( निघून जातो. )

**माल०**—रघुनाथराव, रघुनाथराव—

( जाते. )

---

## प्रवेश पांचवा.

### स्थळ—नं. १ इनामदाराचा वाडा.

( रेणुका व लुगडीवाला येतात. )

**रेणु०**—छे बाई ! तुम्हीं हें सांगतां तरी काय ?

**लुग०**—म्हणजे, माल देऊन पैशाकरितां एक वर्ष थांबून शेवटीं मीच खोटा ? वा, काकू इनामदारांची जागा चालवूं लागला वाटतं !

**रेणु०**—अहो, तुम्ही जर भलतं सलतं सांगूं लागला तर तुम्हांला म्हणूं काय ?

**लुग०**—बरोबर. ससा आला आहे आतां तुमच्या हातीं तेव्हां तुम्हीं पारधीं का बनूं नये ? पण हा लुगडीवाला साऱ्या मुलखाची खरवड आहे. भर रस्त्यांत गारद करायला डरणार नाहीं.

**रेणु०**—अहो, त्यांचं डोकं नाहीं ठिकाणावर, कुठें गेले आहेत त्याचा पत्ता नाहीं म्हणून मी सारखी शोधतें आहे आणि तुम्हाला शिव्या द्यायला ते आले तरी केव्हां ?

**लुग०**—पैशाचा कायदा केलांत तेव्हां.

**रेणु०**—पण तुमचे पैसे मी त्यांच्या जवळ ठेऊन गेलें होतें मग तुम्हाला मिळाले नाहींत हें सांगता तरी काय !

**लुग०**—मग सरकारी खजिन्यांत साऱ्या मुलुखाच्या ठेवी ठेवल्या जातात त्यांचा मला काय उपयोग ? काकू, तुम्ही चांगल्या इनामदारीण म्हणून इतके दिवस मुरवत ठेवली. पण तुम्ही यजमानावरहि ताण करूं लागला.

**रेणु०**—हें पहा तुम्हीं माझें उगाच डोकें पिकवूं नका. माझा आधीं जीव उडाला आहे आणि त्यांत तुमची आणखी भर नको.

**लुग०**—मग मला काय त्याचे उपकार सांगता ? हरामाचा माल नव्हता. चांगलं धनवट दिलं होतं. मुकाट्यानें रुपये मोजा. नवरा दिवसा ढवळ्या घरांत पाखरं आणून मजा मारतो आहे आणि वायको नवऱ्याची तरफदारी करीत गांव हिंडत आहे.

**रेणु०**—काय पांखरू ?

**लुग०**—हो हो, साधं नव्हे लक्का कवुतर ! मी काय साधा भोळा, वायद्याप्रमाणें पैशाला आलों, तो इकडे इनामदार कवुतराला उडविण्याच्या रंगांत ! त्या दीड दमडी—

( मुंजुळा वाड्यांतून वाहेर येते. )

**मंजु०**—( रागानें ) कोणरे मेल्या दिड दमडी !

**रेणु०**—ही मेली आहेच का अजून वाड्यांत ?

**लुग०**—का काकू, अस्सलपेक्षां कशी आहे नकल ?


**मंजु०**—मेल्या, आलास का पुन्हां तोंड दाखवायला ?

**लुग०**—काकू, पटली का खूण ?

**रेणु०**—हीच ना ती ?

**लुग०**—ती का ही ती तुम्हीच पाहून घ्या. वाकी तुमच्या नाकावर इनामदारांनी चांगलीच सवत गांठली.

**मंज०**—मेल्या—



फोटोग्राफर जी. जी. वीरकर, नाशिक

**इनामदाराः–श्रीहरी !**

[ अ. ३ पृ. ८३

K. V. Datar



लुग०—हं, आतां तें विसरा. आज काकू हजर आहेत. वेडांवाकडा शब्द काढाल तर जिभलीच उपटून काढीन.

मंजु०—देवा, देवा, हे मेले लोक आहेत तरी कोण ?

( नं. २ इनामदार, बेलीफ व त्रिंबकराव येतात. )

२ इना०—श्रीहरी, श्रीहरी, श्रीहरी !

रेणु०—( त्यास एका बाजूनें विलगते ) अहो हेच हो ते !

मंजु०—( दुसऱ्या बाजूनें ) अहो तेच हो हे !

२ इना०—श्रीहरी, श्रीहरी, श्रीहरी !

बेलि०—इनामदार, आला तुमचा वाडा. मोजा आतां रकम.

रेणु०—प्राणपति.

२ इना०—श्रीहरी !

मंजु०—प्राणनाथ.

२ इना०—श्रीहरी !

लुग०—इनामदार.

२ इना०—श्रीहरी !

त्रिंब०—अहो ! हें आहे काय ?

२ इना०—श्रीहरी !

मंजु०—अवदसे, या लोकांचीतरी कांहीं लाज धर. अशी अंगाला काय बिलगतेस ?

रेणु०—अहो, पहातां काय काढा या चेटकीला माझ्या वाड्याबाहेर.

२ इना०—श्रीहरी, श्रीहरी, श्रीहरी !

त्रिंब०—या सगळ्या लोकांना वेड लागलं कीं काय ?

( नं. १ इनामदार पडद्याकडे पहात येतो. )

१ इना०—पड, पड चांगला ठेंचाळून पड ! पाठलाग करतो आहे ! पण हा इनामदार अस्सा—( तोंड फिरवितो त्यास पाहून सर्वजण आश्चर्यचकित होतात. )

सर्व०—अँ ! .

बेलि०—त्रिंबकराव, हीं काय भूताटकी ?

लुग०—अहो, इनामदार हें कीं हे ?

रेणु०—( जवळ जाऊन ) अगबाई, ते हे कीं हे ते ?

मंजु०—हे कीं हे ?

लुग०—सारेच हे !

रेणु०—अहो, तुम्हीच ना ते ?

मंजु०—( १ इनामदारास ) अहो, तेच ना तुम्ही ?

१ इना०—विचारी मना तूंचि शोधोनि पाहे !

लुग—अहो, अप्पासाहेब इनामदार हे कीं, हे ?

२ इना०—कोण—अप्पा ?

१ इना०—कोण नाना ?

२ इना०—भले बंधुराज !

१ इना०—कधीं आला महाराज ? ( भेटतात. )

मंजु०—भावोजी का हे ? अगबाई !

रेणु०—जाऊबाई. ( दोघी भेटतात. )

लुग०—अहो, हा आहे काय ब्रम्हघोंटाळा ?

त्रिंब०—अहो गृहस्थ, आमचे इनामदार तुम्ही कीं, तुम्ही ?

१ इना०—दोघेहि.

त्रिंब०—ते कसे काय बुवा ?

२ नं०—अहो आम्ही जुळे भाऊ. लहानपणापासून आमची भेट नाहीं, म्हणून हजारों कोसांवरून धांवत आलों पण जन्माची आठवण राहिली. नको हा गांव आणि नको ती भेट !

लुग०—वाहवा, मग हा एक लहानसा फार्सच उडाला.

मंजु०—जाऊबाई पदर पसरतें. विसरा वरं सारं.

रेणु०—काय बाई घोंटाळा माजला हा !

१ इना०—अप्पा, तुझ्या कर्तबगारीचीं मला चांगलीच फळें भोगावी लागलीं बाबा. वा चांगलंच नांव गाजविलं आहेस.

२ इना०—( ढोंगीपणानें ) नाना, माझ्या करतां कायरे तुझे हाल झाले !

त्रिंब०—एकूण यांच्या चेहऱ्याच्या सारखेपणामुळें बरीच गम्मत उडाली म्हणायची ?

वेलि०—चेहऱ्यापेक्षां नांवाची ऐटच यांना विशेष नडली.

त्रिंब०—अहो नं० २ इनामदार तुम्ही देखील आपलं व्यक्ति नांव छपवून जिकडून तिकडून थपडा सोशीत कसे राहिलात ?

१ इना०—हूँ, श्रीहरी !

लुग०—या श्रीहरीनेंच यांच्या नांवाची वाजविली भेरी.

वेलि०—( नं. १ ) अहो इनामदार, पोकळ ऐटी करतां काय हे आपल्या जन्माचे धिंडवडे करून घेतलेत ? लोकांनीं आपल्याला इनामदार म्हणावं म्हणून घरदार साफ धुतलंत, कर्जबाजारी झालांत, नानातऱ्हेचे तमाशे केलेत पण शेवटीं काय मिळविलंत ?

लुग०—पोकळ शिक्का !

त्रिंब०—इनामदार, तुमच्या वेडेपणाचीं फळें तुमच्या बंधूराजांना आणि बिचाऱ्या या साध्वींना भोगावीं लागलीं.

लुग०—अहो, यांच्या एकट्याच्याच वेडेपणामुळें का ह्मणतां ? हे श्रीहरी पण सांबाचेच अवतार !

वेलि०—इनामदार, बेगडी ऐटीनें किंवा पदव्यानें जगांत मोठेपणा येत नसतो. मन थोर ठेऊन सदाचारानें वागलं कीं, मोठेपणा पायाजवळ चालत येतो.

१ इना०—कान चांगले उपटले गेले. यापुढें असल्या पोकळऐटीचं नांवहि

नको. या पोकळ मोठेपणाच्या फाजील महत्त्वाकांक्षेमुळें मी काय केलं आणि काय नाहीं तें माझ्या मलाच ठाऊक !

२ इना०—अप्पा, चल तुझं काय काय देणं आहे तें मला सांग मी तें चुकवितों. आणि या पुढें तूं या गावांत राहूं नकोस. आपण सर्वजण सुखानें एकत्र राहूं. परमेश्वरानें मला विपूल दिलं आहे.

१ इना०—नाना, तुझ्या इच्छेच्या बाहेर मी नाहीं, मला देखील आतां या गांवांत पाणि घोंटणें नको. गृहस्थहो, आपल्या घरांतील भिंतीवर सुवर्ण अक्षरांनीं लिहून ठेवा कीं, अंगीं योग्यता नसून जे या नकली मोठेपणाच्या नादीं लागतात त्यांची शेवटीं अशीच स्थिति होते.

इना०—बरं चला, सारेजण आंत चला. ह्मणजे काय देणं घेणं असेल त्याचा निकाल लाऊं.

( जातात. )

---

## प्रवेश सहावा.

—:०:—

### स्थलः—सरस्वतीचें घर.

( अमृतराव व मंगल मनोहराला सरस्वतीच्या घरांत नेतात व अमृतराव व सरस्वती प्रवेश करतात. )

अमृ०—( दुःखानें ) सरस्वती, मनोहराला तुझ्या पायावर घातला आहे त्याला आपला मुलगा मान, भाऊ समज किंवा परमेश्वराचा एक प्राणी म्हणून याच्यावर मायेचं पांघरूण घाल.

२७ पद ( चरण चपल ) चाल.

**हरित प्रखर रविकर ताप जाण। धरि सतत सांवली**
**सुखदा करि जन प्रमुदित तरुवर जवळी ॥ धृ० ॥**

**सुजनवास सुखनिवास मधुसंगें मधु हांसवी खुलावित**
**जलधर वसुमति सगळी ॥ १ ॥**

**सरस्व०**—महाराज, असे परक्यासारखे काय बोलूं लागला? आपला शब्द ह्मणजे परमेश्वराची पवित्र आज्ञा समजून ती मस्तकीं धारण करण्यांत ही सरस्वती स्वतःला धन्य मानते. शिवाय "नको नको" अशी आकाशवाणी जरी झाली तरी माझ्या उपकारदात्याच्या अंकुराला उरापोटाशीं धरायला ही सरस्वती कशी कृतघ्न होईल!

**अमृत०**—तुझ्या थोर मनाची मला खात्री आहे. पण विपरीत प्रसंगानें माझं मन बावरल्यामुळें मी काय बोलत आहे तेंच मला कळत नाहीं, त्याची मला क्षमा कर.

**सरस्व०**—महाराज, त्या मुलाची अशी कशानें अवस्था झाली? जाईच्या फुलासारखा टवटवीत चेहरा किती सुकून गेला आहे.

**अमृत०**—अग्नीच्या प्रखर ज्वाळांचा चोहिंकडून भडिमार झाल्यावर सरस्वती कोणतं फूल टवटवित राहील? अंगावर शहारे आणणारा त्या मुलाच्या बावतींतला प्रकार जर तूं ऐकशील तर नीच हृदयाच्या क्रूरतेची तुला परमावधीच कळेल.

**सरस्व०**—असा त्या बापड्यावर प्रसंग तरी कोणता आला होता?

**अमृत०**—आईच्या दुराचरणानें बिचाऱ्या मुलावर कोणता प्रसंग येणार नाहीं? सरस्वती, तूं ऐकलं नाहींस कीं, आपल्या जाराचं मन राखण्याकरतां कैक आयांनीं आपल्या अर्भकांच्या नरड्यांना नखं लाऊन त्यांचा प्राण घेतला आहे—आपलं पाप बाहेर फुटूं नये म्हणून कित्येक जणींनीं आपल्या बालकांना सुरीनें कंठस्नान घातलं आहे आणि कैक जणींनीं तर सरस्वती त्यांचीं डोकीं ठेंचून मातृप्रेमाचा कळस उभारला आहे! मग सांग, या मुलावरहि असाच एखादा प्रसंग आला असल्यास नवल तें कोणतें?

**सरस्व०**—तर मग त्या मुलाचा प्राण वांचवून या सरस्वतीवर आपण केवढे थोर उपकार केलेत.

**अमृत०**—तूं शहाणी आहेस. स्त्री हृदयाची कोमलता तुझ्यांत पूर्ण भरलेली आहे. तुझ्या दृष्टींत अमृत संजिवनी ओंतलेली आहे; तेव्हां तुला मी अधिक सांगण्याचें कारण नाहीं. सरस्वती, तो मुलगा तुझ्या ओटींत टाकला आहे. तो सनाथ असून आज अनाथ झाला आहे. बापाच्या झुरणीस लागला आहे. त्याला तुझ्या सारख्या साध्वीच्या एका कळवळयावांचून दुसरी दिव्य औषधी नाहीं. सरस्वती, माझ्या आशेचा, माझ्या जीविताचा, माझ्या सर्वस्वाचा तो भार तुझ्या स्वाधीन केला आहे. त्याला नीट जप, कसलीहि आठवण होणार नाहीं असं वर्तन ठेव. बापड्याला जीवदान दे. सरस्वती तुझे उपकार—( गहिंवरतो. )

**सरस्व०**—पण आपण दुःखाचे हुंदके काय देऊं लागला ? डोळ्यांत पाणि का आलं ? दृष्टि व्याकुळ का झाली ?

**अमृत०**—भग्न हृदयाचं चित्र तुला कसं दाखवूं !

**सरस्व०**—अरे देवा, नकाहो नका दुःखाचे असे हुंदके देऊं नका. अंतःकरणांतील गुपित काय तें सांगा. या मुलीला एवढी भिक्षा घाला.

**अमृत०**—हृदयाच्या कोनाकापऱ्यांतून निघालेला हा दुःखाचा हुंदका, आंतड्या पिळून बाहेर पडलेला हा मायेचा उमाळा, सरस्वती, छाती फाडून निघालेला हा हृदयाचा कळवळा, बापाच्या मायेचा आहे ग ! अशी भांबावूं नकोस. दृष्टि विव्हल करूं नकोस. माझ्याकडे नीट पहा, सरस्वती, सरस्वती तुझ्या पुण्यायीनें उद्धारलेला हा इतर कोणी नसून तुझा धर्मबंधू-( वेष काढतो. )

**सरस्व०**—( बावऱ्यावृत्तीनें ) कोण ?-माझा सौभाग्यदाता !

**अमृत०**—होय, तुझ्यासारख्या साध्वीच्या सहवासांत आयुष्य अमृतमय व्हावं, अशी ईश्वरी इच्छा असल्यामुळें सत्त्याच्या परमेश्वरानें मला जिवंतच ठेवलं.

**सरस्व०**—देवा, देवा मला आतां खास वेड लागणार ! महाराज, नका हो नका-या भोळ्या सरस्वतीला फसवूं नका. पुण्यलोकीं गेलेला तो आत्मा पुनः या हतभागिणीला कोठून दिसणार ! ( नीट पाहून ) पण होय. तोच चेहरा, तीच दृष्टि, तेंच तेज, देवा ! देवा ! मला आतां वेडच लागणार. महाराज, मंगल वाद्यें तरी

चोळावतें, गोरगरिबांना अन्नदान करते, गौरीमायीची पूजा बांधते, सुवासिनींच्या खणानारळांनीं ओट्या भरते, आनंदी आनंद करते—

**अमृत०**—थांब, अशी बेहोश होऊं नकोस. माझा खरा वेष एवढ्यांतच बाहेर फुटतां कामा नये. एका विशिष्ट कार्याकरतां तो मला संभाळला पाहिजे.

**सरस्व०**—महाराज, हा सर्व विलक्षण प्रकार पाहून माझं मन गोंधळलं आहे हो. या वहिणीला आपल्या सुख-दुःखाची नाहीं का वाटेकरीण करणार?

**अमृत०**—अशी उतावीळ होऊं नकोस. स्वस्थपणानें सर्व कांहीं सांगतों. ( गहिंवरून ) ताई—

**सरस्व०**—( गहिंवरून ) दादा—

**अमृत०**—(गहिंवरून) 'दादा.' ऐका, विश्वांतील यच्चयावत् प्राण्यांनो, नवजीवन देणारी सुशिल वहिणीच्या मुखांतील ही प्रेमळ हांक ऐका व तिच्या प्राप्ती करतां पुण्याच्या गांठी बांधा!—ताई, आयुष्यांतील कांहीं कांहीं प्रसंग प्रथमतः जरी जड भासतात तरी त्यांतच भावी हित सांठलेलं असतं.

**सरस्वः**—दादा, मनोहराला घेऊन येतें. विचारा हर्षानें वेडा होईल ( जाऊं लागते. )

**अमृतः**—थांब, हळूहळूं त्याच्या दृष्टीस पडलं पाहिजे. नाहींपेक्षां त्याच्या कोंवळ्या मनावर भलताच परिणाम होईल! ( पडद्याकडे पाहून ) पण हे पहा मंगल आले.

( मंगल येतो. )

**मंग**—हकीमसाहेब ( दचकून ) कोण? कोण माझे धनीसाहेब? देवा, मी स्वप्नांत तर नाहीं?

**अमृतः**—मंगल, असे गोंधळूं नका. तुमच्या एकनिष्ठ वृत्तीनें स्वप्नसृष्टि नाहींशी करून सत्यसृष्टि निर्माण केली! हा तुमचा अमृतराव मेला नसून जिवंतच आहे.

( दोघेहि भेटतात. )

**मंग**—देवा! देवा! काय मी हें ऐकतों? सत्याच्या ईश्वरा! या ब्रह्मानंदांतच

या म्हाताऱ्याला ब्रह्मसमाधी दे. या म्हाताऱ्याचं उरलेलं आयुष्य माझ्या राजहंसाला दे !

( पडद्यांत ' मंगल ' असा शब्द ऐकूं येतो. )

**सरस्व०**—दादा, हा मनोहराचाच नव्हे का शब्द ?

( मनोहर येतो. )

**मनो०**—मंगल.

**अमृत०**—मनोहर !

**मनो०**—( आश्चर्यानें ) कोण बावा ? ( मिठी मारतो.)

**मंग०**—देवांनो ! असे पहात काय राहिलात ? पुष्पवृष्टि करा, माझ्या राजाला आशीर्वाद द्या.

**मनो०**—बाबा, इतके दिवस कुठें होतात हो ?

**अमृत०**—तुझ्याच जवळ होतों बाळ.

**मनो०**—मग मला कसे दिसला नाहींत ?

**मंग०**—तरी गुलामाला मी सांगत होतो; अहो, माझी मनोदेवताच मला कांहीं निराळं सांगत होती.

**सरस्व०**—दादा, आजचा हा सणाचाच दिवस नव्हे का ? मग कांहीं गोडधोड तरी करतें. ( जाते.)

**अमृत०**—मंगल, आज माझा अज्ञातवास संपला ! त्या दोन दुरात्म्यांना आतां ओळख दिली कीं, बहुरूप्याचं कार्य संपलं ! नंतर या साध्वीच्या मंगल सहवासांतच आपण आपला जन्म समाजसेवेंत घालवूं. परमेश्वरा—

**२७ पद** ( बाल मुवा ) चाल.

**दावि मना मार्ग सोपा दयाघना देवा ॥ ध्रु० ॥ घडो**
**अनुदिनी जनपदसेवा। सुजन सुयोग जिवा या विसावा ॥ १ ॥**

( जातात. )

---

स्वस्तिक वाचनालय ... ठाणे

## प्रवेश सातवा.

**स्थळ**—दिवाणखाना.

( मालती हताश वृत्तींत येते. )

**माल०**—देवा ! या हृदयांत धडाडलेल्या ज्वाला, प्राणांताची जाणीव करून देणारा हा हृदयाचा ठोका, कधींहि शांत होणार नाहींका ? पतंग सुखाच्या मोहानं दिव्यावर झडप घालून मुक्त तरी होतो ! पण मी चांडाळीण, अग्नीच्या भडक्यांत होरपळत, तळमळत, पिजत-कुजत मरणार काय ?-हाय ! हें मी काय केलं ! पापाच्या राशी शिरावर घेऊन कोणतें सुख मिळविलं ! शील विटाळलं ! कुळ बुडविलं ! व्यभिचाराची माळ गळीं घातली ! देवा, मी हें कोणाकरतां केलं ? रघुनाथरावाकरतां ? मग या हृदयांत धडाडलेल्या ज्वाला कोठून आल्या ? हा प्राणांताचा हृदयाला बसणारा ठोका तरी कशा करतां ! नाहीं-त्यांचीहि आतां मला भीति वाटूं लागली ! त्यांना वेड लागलं-मी आतां काय करूं-कुलस्त्रीधर्माकडे किंचित् दुर्लक्ष होतांच कोण ही माझी दुर्दशा झाली ! माझ्या आयुष्याचं शीड फाटलं ! सुकाणूं तुटलं ! सुखाचं जहाज खडकावर आदळून आपटून त्याच्या चिंधड्या झाल्या ! आतां या बुडत्या जिवाला आधार तरी कोणाचा ? पुण्यवानलोक, ब्रम्हसमाधी ह्मणून मृत्यूला ईश्वरी प्रसाद मानतात, पण माझ्यासारख्या पाप्यांना त्या मृत्यूची कल्पनाहि अकाळ विकाळ भासते ? नाहीं, नाहीं ! देवा, या व्यभिचाराच्या दारुण भावना, मनाच्या ह्या असह्य यातना, आणि हृदयाच्या ह्या प्राणांतिक वेदना मला सहन होत नाहींत. मी आतां करूं तरी काय ? सुखाला मुकलें ! धर्माला बुडविलं ! समाजाला पारखी झालें! हें काळं तोंड मी लपवूं तरी कुठें !—पण माझा मनोहर कुठें आहे ? मंगलानें माझ्या लाडक्याला नेलं तरी कुठं ? मी त्याला शोधूं तरीं कुठें ( अमृतराव हकीमाच्या वेशांत येतो. ) कोण हकीमसाहेब-माझा मनोहर कुठें आहे हो ?

**अमृत०**—एकूण, मनोहराची आठवण आहे अजून ?

**माल०**—सांगा. तुमच्या पाया पडतें. माझ्या मनोहराची मला भेट करवा.

**अमृत०**—थांबा, अशा अधिर होऊं नका. बाईसाहेब, आज एकटा मनोहरच काय, तुम्हाला तुमची सर्व माणसं भेटवितों.

**माल०**—ह्मणजे-पण तुमची दृष्टि का अशी कठोर झाली ! माझ्याकडे असे तिरस्कारानें काय पाहूं लागला ! तुमचा हेतू मला सुधा दिसत नाहीं हो !

**अमृत०**—तुमच्यासारखीं सुधीं माणसं भेटल्यावर त्यांच्या नेत्रांत झणझणीत अंजन घातल्यावांचून परमेश्वराचातरी सुधा हेतू जगाला कसा पटणार !

**माल०**—नका, हकीमसाहेब, तुमच्या पायां पडतें. माझा मनोहर मला दाखवा. माझा असा विश्वासघात करूं नका !

**अमृत०**—छे, बाईसाहेब तुमचा विश्वासघात करायचा नसून विश्वासघाताचा परिणाम किती भयंकर असतो, तो आज तुह्मांला पटवून द्यायचा आहे व परमेश्वराची मला तशी आज्ञा आहे.

**माल०**—काय, तुमच्यावर मी विश्वास टाकला त्याचंच का हें फळ !

**अमृत०**—बाईसाहेब, तुमच्या पतीनेंहि तुमच्यावर असाच विश्वास टाकला होता नां ? मग त्याचा विश्वासघात करतांना त्याच्या अंतःकरणाला काय वेदना होतील याचा तुह्मीतरी किंचित् विचार केला होतात काय ? दुसऱ्यानें आपल्याला चांगुलपणानें वागवावें अशी इच्छा करण्यापूर्वी आपणहि नको का चांगुलपणा दाखवायला ? परदुःख शीतल मानून कसं चालेल ? बाईसाहेब, परमेश्वराची न्यायी दृष्टि इतकी चपल आहे कीं, कोणालाहि ती चुकवितां येत नसते. आघाताबरोबरच प्रत्याघात जन्माला येतो.

**माल०**—पण मी तुमच्यावर कोणता आघात केला आहे !

**अमृत०**—तुह्मी जर निरपराधी असता तर प्रत्यक्ष परमेश्वरालाहि तुमच्या समोर एखादा वेडावांकडा शब्द उच्चारण्याची छाती झाली नसती. पण तुह्मी महा अपराधी आहांत, ह्मणूनच सत्याच्या दरबारांतून अमृतरावाच्या आत्म्याचा मला हुकूम झाला आहे कीं, पतिद्रोही, पुत्रद्वेषी, शीलघातकी मालतीचा न्याय कर. नाहिंपेक्षां परमेश्वराचा तूं मोठा गुन्हेगार ठरशील. मग सांगा मी करीत आहे याला अन्याय ह्मणतां येईल का ?

**माल०**—पण तुम्ही माझ्यावर हे कसले खोटे आरोप ठेवीत आहांत ? मी कोणाचा विश्वासघात केला आहे ?

**अमृत०**—तो माझ्या तोंडूनच ऐकण्याची जर तुमची इच्छा असेल तर त्याला माझी ना नाहीं. सांगा, पति जिवंत असतां त्याच्या अन्नावर पोसलेल्या एका पाजी कुत्र्याला आपला देह भ्रष्ट करूं देतांना आपल्या शीलाचा विचार केला होतात का ? पति मेला अशा समजूतीनें का होईना त्याच्या निधनाचे दहा दिवस पुरे झाले नाहींत तोंच शुभ्र चांदण्यांत विहार करतांना पतीची मूर्ति दृष्टिसमोर आणिली होतीत का ? सोन्यासारखा एकुलता एक मुलगा तोहि आपल्या क्षुद्र वासने पुढें तुम्हांला नकोसा झाला हं ! मालती, तुझे अपराध इतके अघोर आहेत कीं, तुझ्या शिक्षेची इयत्ता ठरविण्याकरतां जगांतील यच्चयावत् न्यायाधिशांची परिषदच भरवावी लागेल.

**माल०**—हकीमसाहेब, मी सर्वस्वी निरापराधी आहे हो !

**अमृत०**—तूं निरापराधी असतीस तर बिचाऱ्या अमृतरावाचं जीवन सुधामय झालं असतं. पण तूं पतिघातकी, कुलटा, पिशाच्चिणी आहेस. तुझ्यासारख्या स्त्रीला जगांत वावरूं देणं म्हणजे समाजाला स्वैर वळण लावण्या सारखंच आहे. मालती पाप उघडकीस येणार नाहीं, अशा समजुतीनें जरी तें सात पडद्या आड लपून केलं तरी त्याचा स्फोट झाल्या वांचून रहात नाहीं. मनुष्याची इच्छा असो वा नसो पापाचा घडा पूर्ण भरला म्हणजे निसर्गच आघाताला प्रत्याघात देत असतो. मालती, भोळा अमृतराव मेला, त्याला आपलं बदकर्म कळलं नाहीं, आपल्या सुखा आड आतां कोणी उरला नाहीं, अशा मनोराज्यांत भावीसुखाचे तुम्ही कितीतरी डोलारे उभारले असाल: पण परमेश्वरानें निर्माण केलेल्या या जगांत द्यावं तसं घ्यावं हा न्याय तंतोतंत भरला आहे. दुसऱ्या करतां खाडा खणणारा आधीं स्वतःच आंत उतरत असतो.

**माल०**--( खवळून ) पण माझ्यावर अशी सत्ता चालविणारे तुम्ही आहांत तरी कोण ?

**अमृत०**—मी कोण, हें पहाण्याची तुझी इच्छा आहे काय ? तर पहा डोळे उघडून पहा–( वेश टाकतो. मालती गर्भगळित होऊन खालीं पडते. )

**माल०**—म-हा-राज-द-या-


**अमृत०**—( लाथेनें दूर ढकलून ) तुझ्या सारख्या व्यभिचारणीवर दया केल्यास साध्वीच्या हृदयांतील दयासिंधू आटून शुष्क होईल. जगांतील गृहस्थाश्रम वंद करावे लागतील. चांडाळणी, तूं माझा जीवनवृक्ष इतका छेदून टाकला आहेस कीं, वाघ जसा सावजाच्या शरिराचा एक एक लचका तोडून त्याचा खेळत खेळत प्राण घेतो, त्याहून क्रूरमार्गानें जरी मी तुझ्या नरडीची हाडें कडाकड पिंजून टाकलीं तरी तुझ्या अपराधाची भरपायी होणार नाहीं. पण पापिणी, प्राण हरण करून कृष्णकर्माच्या आठवणी नाहींशा करणें म्हणजे खरा सूड नव्हे. तर-जिवंत रहा व दुसऱ्याचा नाश केल्यानें हृदयाला काय वेदना होतात त्याचा अनु-भव घेत सडून मरून मर.

**माल०**—महाराज; आपण जिवंत होता हें कायहो मला माहीत ? त्या चांडाळानं—

**अमृत०**—चूप, पति मरण पावल्यावर त्याच्या मागें गिधाडांनीं देहावर झडप घातली असतां आनंदानें त्यांना लचके तोडूं देणें म्हणजे कुलस्त्रीचा धर्मच समज-तेस वाटतं ! पण तूं त्याहि पूर्वी भ्रष्ट झाली होतीस. मालती, ती सर्व हकीगत सांगण्याची माझी इच्छा नाहीं. पण मी मेलों नाहीं व अमृतरावाचं पिशाच्चहि नाहीं एवढं मात्र खास ! पापिणी, जिला तळहातावर नाचविली, हृदयाशीं धरिली, एकजीव मानिली, ती नरकांतील तूं हडळ कुणिकडे आणि जिची माझी चार दिव-साची ओळखं ती साध्वी सरस्वती कुणिकडे ? धर्मानें भगिनी मानलेल्या त्या साध्वीच्या पुण्यायीनेंच माझ्या वृत्ति मावळल्या, मनोहराचे प्राण वांचले व कुल-स्त्रीचा पुण्यप्रभाव कळला.

**माल०**—माझा मनोहर कुठं आहे ?

**अमृत०**—तुझा पापीस्पर्श त्या निष्कलंक बालकाला आतां स्वप्नींहि शक्य नाहीं. अवदसे, तुमच्या सुखा आड येणारा तो कांटा होता म्हणून त्याच्या औषधांत विष मिळविण्यापर्यंत तुमची मजल पोंहचली हं ! चांडाळणी, सुदैवानें मी जिवंत राहून जर तुमच्या पाळतीवर नसतों तर तें बिचारं पोर तुम्हा राक्षसांच्या आहारीं निरर्थक बळीं पडलं असतं पण सत्याचा पाठिराखा परमेश्वर !



मालतीः-सुटलें! चांडाळाच्या हातून सुटलें! [ अं. ३ पृ. ९५

K ! 80 ...



**माल०**—महाराज, माझ्यावर दया करून एकवार माझ्या मनोहराची मला भेट करवा आणि नंतर आपल्या पवित्र लाथेनें हे पापी हृदय तुडवून तुडवून त्याचा चुऱ्हाडा करा. या वेदना माझ्याच्यानें आतां सहन करवत नाहींत.

**अमृत०**—नाहीं, शिक्षेचा अधिकार माझा नाहीं ! तो जर मी हातीं धरला असता तर आघाताला प्रत्याघात देतांना माझाहि अधःपात झाला असता, पण माझ्या विवेकानें तुम्हांला तुमच्या पापाचं प्रायश्चित्त देऊन माझा जीवनमार्ग सुधामय केला.

**माल०**—मग मी अशी तडफडून तडफडून मरणार ना ? या यातनांतून तुम्ही नाहिंना मला सोडविणार ?

**अमृत०**—तुला सोडवायला तुझं कर्मच तुझ्या समोर राहील.

( रघुनाथ भ्रमिष्ट वृत्तींत विषाची कुपी घेऊन येतो. )

**रघु०**—मालती, घे, हें अमृत घे. किती पण गोड. ( पितो ) अहा, घशाखालीं जातांच किती पण मला स्फुरण चढलं. आतां मी काळालाहि भीत नाहीं. पण तूं आहेस कुठें ? ये, लवकर ये. एकदां संपलं कीं, जन्मभर रडत बसशील. काय, तुला नको हें अमृत ! पण माझ्या सहचारिणीला दिल्यावांचून मी कसा राहीन ? मी एकटाच प्यालों म्हणून रागावलीस वाटतं–छे–छे ! ( मालती कुपी घेते. )

**अमृत०**—दुरात्म्या, द्यावं तसं घ्यावं हा सृष्टीचा न्याय कसा तंतोतंत भरला आहे तो पहा.

**रघु०**—विष, माझी विषाची कुपी ?

**माल०**—काय विष ? ( पिते ) सुटलें ! चांडाळाच्या हातून सुटलें !

**रघु०**—मालती, कुठें गेलीस ? तुला आतां अशी मगरमिठी मारणार—

**अमृत०**—सैतान, दूर हो.

**रघु०**—( खालीं पडून तळमळत ) अंगाचा भडका उडाला ! हृदयाची होळी पेटली. या भेसूर प्रदेशांत मला कोणी आणलं–अरेरे, डोळ्यांत तापलेल्या सळ्या भोसकल्या, मस्तकावर घणाचे घाव घातले ! काळ पुरुषांनों, माझे असे हाल करूं नका.

मित्रद्रोहाच्या वणव्यांत भाजून काढूं नका–कोण हे भेसूर देखावे–माझी कोणी स्मृति नाहींशी करा–मेंदू बाहेर काढा. डोळे गच्च बांधा–कोण अमृतराव–काय हें अक्राळ विक्राळ स्वरूप–पिशाच्चा, मला असा फरफटत ओढूं नकोस. अरेरे! शरिरांतून रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या, काळजाच्या चिंधड्या झाल्या, मस्तकाच्या ठिकऱ्या उडाल्या, अंधार, अंधार, अंधार ! ( मरतो. )

**माल०**—( तडफडत ) पापाचं प्रायश्चित्त मिळाळं! चांडाळाच्या हातून सुटलें! ( अमृतरावाच्या पायाजवळ जायला प्रयत्न करते ) महाराज, दया करा. जवळ या, आपल्या पायाचं दर्शन घेत घेत मला मरूं द्या ? करा—माझ्यावर एवढी दया करा ह्मणजे पुढील जन्मीं तरी माझा उद्धार होईल. यमदूतांनो, माझे असे हाल करूं नका, मला अग्नीच्या भडक्यांत लोटूं नका, माझ्या काळजाला चरके देऊं नका. व्यभिचार–अगाई, हे सर्प किती, एक—दोन—मोजवत नाहींत–डसले–काळजाला डसले–पाणि, पाणि, पाणि ! ( मरते. )

**अमृत०**—जा, पापी आत्म्यांनो! आपल्या कर्माचीं फळें भोगायला जा. तुमचा आत्मा शुद्ध होऊन त्याला शांति मिळो अशी परमेश्वराची मी प्रार्थना करतों. जगा, अविचारानें कुमार्गाकडे जाण्याचा कधीं काळीं जर तुला मोह उत्पन्न झाला तर हें चित्र डोळ्यापुढें आण व सावध हो, नाहींपेक्षां तुझ्याहि कपाळीं **हाच परिणाम !**

( पडदा पडतो. )

**अंक तिसरा समाप्त.**

**समाप्त.**

अ. क्र.
बा. क्र. २६८
वि. नाटक.